CMYK

सोलापूर

तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, ७ डिसेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक २२ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विचारपुष्प

आपण हिंदू राष्ट्राचे भाग आहोत. मग आपण कुठेही राहात असो, कोणत्याही धर्माचे, पंथाचे असो, कोणतीही पूजा पद्धती असो, दरिद्री असो वा धनी, श्रीमंत असो वा गरीब, परंतु आपण सर्व हिंदू राष्ट्राचे भाग आहोत. आपले हिंदू राष्ट्र एक विराट पुरुष आहे आणि आपण सर्व त्याचा भाग आहोत.

बाबासाहेब आपटे
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

जिल्हा दूध संघ संचालक मंडळ बरखास्तीवर ६ महिन्यांत निर्णय द्या : उच्च न्यायालय

*** सहकार मंत्र्यांना दिले आदेश; गेल्या वर्षभरापासून अपील होते प्रलंबित**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ डिसेंबर -

सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाच्या संचालक मंडळ बरखास्तीच्या निर्णयावर सहा महिन्यांच्या आत कारवाई पूर्ण करा, असे आदेश उच्च न्यायालयाने सहकारमंत्र्यांना दिले आहेत. दूध संघ बचाव कृती समितीच्या वतीने यासंदर्भात न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. विद्यमान अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांचे संचालक मंडळ उपनिबंधकांनी बरखास्त केले होते. राज्याच्या सहकारी संस्थांच्या सहनिबंधकांनी हा आदेश रद्द ठरवला. सहनिबंधकांच्या निर्णय विरोधात गेल्या वर्षभरापासून सहकारमंत्र्यांकडे अपील प्रलंबित आहे.

सोलापूर जिल्हा सहकारी दूध संघाचे तात्कालिक संचालक मंडळ पुणे विभागाचे उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी बरखास्त केले होते. यासंदर्भात संघाची सभासद संस्था असलेल्या मोहोळ तालुक्यातील विरवडे येथील चंद्रभागा दूध उत्पादक संस्थेने तक्रार दाखल केली होती. संघाचे वाढलेले कर्ज, वाढलेला तोटा, बेकायदेशीर नोकर भरती यासह इतर गंभीर बाबींमुळे सहकार कायदा कलम ७८ अन्वये मार्च महिन्यात हे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते.

दरम्यान, राज्याचे सहनिबंधक शहाजी पाटील यांनी उपनिबंधकांच्या आदेशाला स्थगिती दिली व त्यानंतर त्यांनी उपनिबंधकांची कारवाईच रद्दबादल ठरवली. सहनिबंधकांच्या या निर्णयाच्या विरोधात चंद्रभागा संस्थेच्या वतीने सहकारमंत्र्यांकडे अपील दाखल करण्यात आले. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून यासंदर्भात सुनावणी झाली नसल्याने संस्थेने उच्च न्यायालयात धाव घेतली. यासंदर्भात सुनावणी पूर्ण झाली असून उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठाने निकाल जाहीर केला आहे. संस्थेच्या वतीने ॲड.गुरुबाळा बिराजदार यांनी काम पाहिले.

जागा विक्रीसाठी सहकार विभागतूनच सहकार्य

राज्याच्या सहकारी संस्थांचे सहनिबंधक शहाजी पाटील यांनी जिल्हा सहकारी दूध संघाच्या संचालक मंडळ बरखास्त करण्याच्या उपनिबंधकांच्या निर्णयाला रद्दबातल केले होते. संस्थेचे भाग भांडवल शून्यावर आले असून संस्थेवर ६० कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. अशी परिस्थिती असताना सहकार कायद्यानुसार संस्थेवर अवसायक नेमणे बंधनकारक असतानाही सहनिबंधकांनी संचालक मंडळाला अभय दिले. गेल्या वर्षभरात संघाच्या संचालक मंडळाकडून संघ सुरु करण्यापेक्षा संघाच्या जागा विक्रीसाठीच जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचा आरोप होत आहे, याला सहकार विभागातूनच सहकार्य मिळत असल्याचीही चर्चा आहे.

आज सायंकाळपर्यंत परतावा द्या

केंद्र सरकारचा इंडिगोला दणका ● अव्वाच्या सव्वा तिकीट दर आकारणीला चाप

पुढील दोन दिवसांमध्ये प्रवाशांचे सामान पोहचविण्याचे निर्देश

◆ **नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

प्रवाशांना वेठीस धरणाऱ्या इंडिगो कंपनीला केंद्र सरकारने शनिवारी दणका दिला. प्रवाशांनी रद्द केलेल्या तिकिटांचा परतावा रविवारी सायंकाळपर्यंत द्या. त्याचप्रमाणे प्रवाशांचे साहित्य पुढच्या दोन दिवसांत त्यांना सोपवा, असा आदेश नागरी उड्डयन मंत्रालयाने दिला. इंडिगो कंपनीने उड्डाणे रद्द केल्यामुळे हजारो प्रवाशांना फटका बसला आहे.

देशातील सर्वांत मोठी विमान कंपनी इंडिगोने शनिवारी पाचव्या दिवशी ८०० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द केल्याने सेवेत व्यत्यय आला आहे. परतावा प्रक्रियेत कोणताही विलंब झाल्यास किंवा पालन न केल्यास त्वरित नियामक कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्रालयाने दिला आहे.

रद्द झालेल्या किंवा विस्कळीत झालेल्या सर्व उड्डाणांसाठी परतावा प्रक्रिया रविवारी रात्री आठ वाजेपर्यंत पूर्ण करावी लागेल, असे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. उड्डाण रद्द झाल्याने ज्या प्रवाशांचा प्रवास रद्द किंवा प्रभावित झाला, त्यांच्याकडून कोणतेही पुनर्निधारण शुल्क आकारू नये, असे यात म्हटले आहे.

शनिवारी विविध विमानतळांवर ८०० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द करण्यात आली. इंडिगोला समर्पित प्रवासी समर्थन आणि परतावा सुविधा कक्ष स्थापन करण्याचा निर्देश देण्यात आला आहे. या सेलना बाधित प्रवाशांशी सक्रियपणे संपर्क साधण्याचे आणि परतावा तसेच पर्यायी प्रवास व्यवस्था वारंवार पाठपुरावा न करता प्रक्रिया केल्या जातील, हे सुनिश्चित करण्यास सांगितले आहे. विमान परिचालन पूर्णपणे स्थिर होईपर्यंत स्वयंचलित परताव्यांची प्रणाली सक्रिय राहील, असे निवेदनात म्हटले आहे. उड्डाण रद्द झाल्यामुळे किंवा विलंब झाल्यामुळे प्रवाशांपासून वेगळे केलेले सामान पुढील ४८ तासांच्या आत प्रवाशांपर्यंत पोहोचवले जावे, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

विमानभाडे मर्यादा लागू

इंडिगोने अनेक विमाने रद्द केल्याने अनेक मार्गांवर विमान तिकिटांचे दर वाढले होते. त्यामुळे सरकारने शनिवारी विमानभाडे मर्यादा लागू केल्या. देशातील सर्वांत मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगोने कर्मचाऱ्यांच्या अडचणींमुळे सलग पाच दिवसांपासून शेकडो उड्डाणे रद्द केली आहेत. ◀(वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली माहिती

विमान कंपन्यांमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, या सर्व घडामोडींवर पंतप्रधान कार्यालयाची करडी नजर आहे. या घडामोडींबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सविस्तर माहिती देण्यात आली. सध्या पंतप्रधान कार्यालय इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पिटर एल्बर्ससोबत संवाद साधत आहे. उड्डाणे लवकरात लवकर सामाय करा, असा कठोर संदेश एल्बर्स यांना देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सरकारने निर्धारित केलेले कमाल दर

अंतर (किमीत)	दर (रुपयांत)
५००	७,५००
५०० ते १०००	१२०००
१००० ते १५००	१५०००
१५०० अधिक	१८०००

उद्यापासून हिवाळी अधिवेशन

आजच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार ● दोन्ही सभागृहात विरोधीपक्ष नेताच नाही

◆ **नागपूर, ६ डिसेंबर**

येत्या ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच रविवार, ७ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता रामगिरीवर विरोधकांसाठी तसेच विधिमंडळातील सदस्यांसाठी चहापानाचा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केला आहे. विरोधकांसाठी चहापान आयोजित करण्याची विधिमंडळाची परंपरा आहे. परंतु, विरोधक नेहमीप्रमाणे चहापानावर बहिष्कार घालत असतात. ही परंपरा यंदाही कायम असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे विधिमंडळाच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात विरोधी पक्ष नेताच नाही. त्यामुळे विरोधी पक्षनेत्याविनाच सभागृहाचे कामकाज चालणार आहे की, नव्याने विरोधी पक्षनेत्यांची निवड होणार आहे, हा औत्सुकतेचा विषय आहे.

८ डिसेंबरपासून महाराष्ट्राच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. राज्याची उपराजधानी नागपुरात हे अधिवेशन पार पडणार असून राज्य सरकारसह विरोधक या अधिवेशानासाठी सज्ज झाले आहेत. सोमवारपासून सुरू होण्याऱ्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्याची पद्धत आहे. पण विरोधकांकडून मात्र या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घालत अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच राज्य सरकारविरुद्ध बिगुल वाजवला आहे. नागपुरात गुलाबी थंडी असताना राजकीय वातावरण तापल्याचे चिन्ह आहे.

हे अधिवेशन प्रारंभी दोन आठवड्यांचे ठेवण्यात आले होते. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीची ३ डिसेंबरची मतमोजणी रद्द करून ती उर्वरित निवडणुक पार पडल्यानंतर २१ डिसेंबरला घेण्याचे निर्देश दिले. त्यामुळे आचारसंहिता ही २१ डिसेंबरपर्यंत कायम राहणार आहे. परिणामत: हिवाळी अधिवेशनावर आचारसंहितेचे सावट राहणार आहे. त्यामुळे संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या झालेल्या बैठकीत अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत घेण्याचे ठरले. ◀(तभा वृत्तसेवा)

हिवाळी अधिवेशन

विरोधकांची धार बोथट

हिवाळी अधिवेशनात मांडण्यासाठी विरोधकांकडे विविध मुद्दे आहेत.मात्र,विधिमंडळाच्या विधानपरिषद व विधानसभा या दोन्ही सभागृहात विरोधीपक्ष नेते नसल्याने विरोधकांच्या सरकारवरील टीकेला धार राहणार नसल्याचे सत्ताधारी नेते सांगत आहेत. ■

महत्त्वाचे

जानेवारीत होणार 'परीक्षा पे चर्चा' नोंदणी सुरू

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वार्षिक 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाची नववी आवृत्ती जानेवारी २०२६ मध्ये आयोजित केली जाईल. यासाठी नोंदणी ११ जानेवारीपर्यंत खुली आहे. 'परीक्षा पे चर्चा' नवव्या पर्वात येणार आहे. भारत आणि विदेशातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक पंतप्रधानांशी परीक्षेच्या ताणावर चर्चा करण्यासाठी संवाद साधतील आणि परीक्षा हा जीवनाचा अविभाज्य भाग किंवा उत्सव म्हणून साजरा करतील, असे अधिकाऱ्याने सांगितले. सहभागींच्या निवडीसाठी १ डिसेंबर ते ११ जानेवारी दरम्यान माय जीओव्ही पोर्टलवर बहुपर्यायी प्रश्नांसह ऑनलाईन स्पर्धा आयोजित केली जात आहे. 'परीक्षा पे चर्चा' या मालिकेचे आठवे पर्व या वर्षी १० फेब्रुवारी रोजी प्रसारित झाले. राष्ट्रीय राजधानीतील सुंदर नर्सरी येथे एका नाविन्यपूर्ण स्वरूपात हा संवाद आयोजित करण्यात आला होता. ■

महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर लोटला भीमसागर

मुंबई : भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी जमले होते. बाबासाहेबाचा जयघोष करीत राज्याच्या कानकोपऱ्यातून अबाल वृद्ध भीमसैनिक याठिकाणी जमले आहेत. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विविध राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकाऱ्यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केले. ग्रंथप्रदर्शन, एक वही एक पेन अभियान राबविण्यात आले. अभिवादनासाठी आलेल्या अन्वयांचे गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या वतीने सर्व आवश्यक सोयी सुविधा पुरवण्यात आल्या होत्या.

अर्थसंकल्पापूर्वी सरकार कस्टम प्रणालीत बदल

नवी दिल्ली - अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी घोषणा केली आहे की, कस्टम प्रणालीमध्ये लवकरच अनेक मोठे बदल केले जातील. ही सरकारची पुढील सर्वात मोठी सुधारणा असेल. याचा उद्देश नियम सोपे करणे आहे, जेणेकरून व्यवसाय आणि व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही. गेल्या दोन वर्षांत ड्युटी दर हळूहळू कमी करण्यात आले आहेत आणि आता जे आयटम्स अजूनही उच्च ड्युटी असलेले आहेत, त्यांच्यावरही लक्ष केंद्रित केले जाईल. ही सुधारणा अर्थव्यवस्थेला मजबूत करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे, जिथे पारदर्शकता वाढेल आणि अनुपालन सोपे होईल.

'बांगलादेशी घुसखोर जन्म प्रमाणपत्र घोटाळा' पुस्तिकेचे प्रकाशन

मुंबई - किरीट सोमय्या यांची राष्ट्राप्रती निष्ठा वाखाणण्याजोगी असून बाळासाहेब ठाकरे यांनी वाचा फोडलेल्या बांगलादेशी-रोहिंग्यांच्या मुद्द्याला खऱ्याअर्थाने मार्गी लावण्याचे मोलाचे काम केले.असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शनिवारी केले. माजी खा. सोमय्या यांच्या 'बांगलादेशी घुसखोर जन्म प्रमाणपत्र घोटाळा' या पुस्तिकेचे प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

बडोद्याचा मुंबईवर ५१ धावांनी विजय

सोलापूर - येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर काल पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र मुंबई व बडोदा राज्याच्या १५ वर्षाखालील मुलींच्या प्रत्येकी ३५ षटकांच्या सराव सामन्यात आज मुंबईने बडोदावर ५१ धावांनी विजय मिळविला.

सकाळी नाणेफेक जिंकून मुंबई संघाने क्षेत्ररक्षण स्वीकारले. बडोदा संघाने निर्धारित ३५ षटकात ६ बाद १९९ धावा केल्या. त्यांच्याकडून जानवी पाटील ७१ न्यासा ठाकूर ३० धावा केले तर मुंबई कडून स्वास्ति शिंदे, काव्या भागवत यांनी प्रत्येकी १ बळी घेतले. ३ गडी धावबाद झाल्या. प्रत्युत्तरदाखल मुंबई संघ निर्धारित ३५ षटकात ९ बाद १४८ धावाच करू शकला. मुंबई कडून सिद्धी आरेकर ४४, मुद्रा खेडेकर २८ धावा केल्या तर बडोदा कडून वैभवी देवकते देवी खरादे यांनी प्रत्येकी २, द्रव्या पारीख न्याशा तिवारी यांनी एकेक बळी मिळवला व ३ खेळाडू धावबाद झाल्या. पंच म्हणून सुहेल मुनशी, नवीन माने व गुणलेखक म्हणून प्रसाद शावंतुल यांनी काम पाहिले. उद्या महाराष्ट्र विरुद्ध बडोदा असा सामना होणार असल्याचे जिल्हा संघटनेच्या वतीने कळविण्यात आले.

भारतीय जनता पार्टी : भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, अजित गायकवाड, वंदना गायकवाड, प्रा.नारायण बनसोडे, दशरथ कसबे आदी उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर स्मारक वर्षात पूर्ण करु

मुख्यमंत्री फडणवीस यांचा मानस ● चैत्यभूमीवर महामानवाला वाहिली आदरांजली

◆ **मुंबई, ६ डिसेंबर**

मुंबईच्या इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे कार्य प्रगतिपथावर असून, पुढील महापरिनिर्वाण दिनापर्यंत पूर्ण करण्याचा मानस असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राच्या प्रगतीचा पाया घातल्याचे नमूद करून बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे.

नुकतेच अमेरिकेच्या न्यूजर्सीचे गव्हर्नर महाराष्ट्रात आले होते. तेव्हा त्यांनी न्यूयार्कसह इतर शहरात वीजेची प्रचंड टंचाई जाणवत असल्याचे सांगितले. कारण आमच्याकडे स्टेट ग्रीड असून, नॅशनल ग्रीड नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. त्यावेळी अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला जे समजले नाही. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना किती आधी कळाले. यावरून ते किती द्रष्टे होते याची कल्पना येते. ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, ऊर्जामंत्री असताना राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना बाबासाहेबांनी आणली आणि ती वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले. ◀(तभा वृत्तसेवा)

महापरिनिर्वाणदिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली अर्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवर

पंतप्रधान म्हणतात, धर्मग्रंथापेक्षा संविधान महत्वाचे

माझ्याकरता कुठल्याही धर्मग्रंथापेक्षा भारताचं संविधान महत्वाचं आहे. कारण हे संविधानच प्रत्येक भारतीयांचं कल्याण करु शकते, असे आपल्या देशाचे पंतप्रधान नेहमी म्हणतात, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ■

तिसरा वन डे जिंकून भारताने मालिका जिंकली

द. आफ्रिकेचा ९ विकेट्सने पराभव; जैस्वालचे शतक, कुलदीप अन् प्रसिद्धच्या प्रत्येकी ४ विकेट्स

विशाखापट्टणम -

विशाखापट्टणम येथे झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ९ विकेट्सने पराभव केला. टीम इंडियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेला फक्त २७० धावा करता आल्या. भारताने ४० व्या षटकात लक्ष्य गाठले, फक्त एक विकेट गमावली. तिसरा वन डे जिंकून भारताने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.

डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी स्टेडियमवर पाहुण्या संघाकडून क्विंटन डी कॉकने शतक झळकावले. कर्णधार टेम्बा बावुमाने ४८, देवाल्ड ब्रेव्हिसने २९ आणि मॅथ्यू ब्रेइट्झकीने २४ धावा करून संघाला २७० धावांपर्यंत पोहोचवले. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. २७१ धावांच्या लक्ष्याचा सामना करताना, यशस्वी जयस्वाल आणि रोहित शर्मा यांनी भारताला दमदार सुरुवात दिली. त्यांनी १५५ धावांची भागीदारी केली.

रोहित ७५ धावांवर बाद झाला, हा मालिकेतील त्याचे पहिले अर्धशतक होते. त्यानंतर यशस्वीने १११ चेंडूत त्याचे पहिले एकदिवसीय शतक झळकावले. विराट कोहलीनेही त्याच्या पाठोपाठ फक्त ४० चेंडूत अर्धशतक झळकावले.

दोघांनीही ४० व्या षटकात विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेसाठी केशव महाराजने एकमेव विकेट घेतली. दोन्ही संघांमधील पाच सामन्यांची टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून सुरू होईल.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्वाचे...

सीईओंच्या आश्वासनानंतर ग्रामसेवकांचे आंदोलन मागे

सोलापूर, दि. ६ डिसेंबर -

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी कर्मचारी युनियनच्या माध्यमातून सुरू केलेले असहकार आंदोलन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर मागे घेतले असल्याची माहिती युनियनचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ यांनी दिली. ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्ह्यातील ग्रामसेवकांनी २४ नोव्हेंबरपासून असहकार आंदोलन सुरू केले होते.ग्रामसेवकांच्या तक्रारी अर्जानंतर जिल्ह्यातील ग्रामसेवकांच्या प्रश्नासंदर्भात तोडगा काढण्यासाठी गुरुवारी मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, पंढरपूरचे गटविकास अधिकारी अमोल जाधव यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत चौकशी समितीतील सदस्यांसह युनियनचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ यांच्या उपस्थितीत गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस युनियनचे जिल्हा कार्याध्यक्ष नारायण ढवळे, सरचिटणीस दयानंद पाटील, किसन माळी, दादासाहेब अडसूळ, कैलास कोरके, विजयसिंह माने-देशमुख, संजय शिंदे आदी उपस्थित होते. सदर बैठकीत ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या आस्थापनाविषयक प्रलंबित बाबींवर चर्चा करण्यात आली. प्रलंबित प्रश्नावर येत्या पंधरा दिवसात कार्यवाही करण्याचे आश्वासन यावेळी जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आले. त्यानंतर ग्रामसेवकांचे असहकार आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली.

लोकविकास स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन

वेळापूर, दि.६ डिसेंबर-

वेळापूर येथील लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक अश्विनी शिंदे व लोकविकास ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक अमोल पांढरे, अजित बनकर , विजया चापले यांच्या हस्ते झाले. इयत्ता चौथी मधील संस्कृती पांढरे, स्वरित बनकर यांनी तसेच सहशिक्षिका राणी शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कोमल चव्हाण व आभार प्रदर्शन वैशाली आदलिंगे यांनी केले. राहुल बनकर,अमोल साठे,सिनाप्पा शेंडगे, सचिन साळुंखे, तेजस्वी पिसे, प्रज्ञा गिरमे, श्रद्धा आडसुळे,ज्योती गाडेकर, पूजा कुदळे आदी शिक्षक उपस्थित होते.

मंद्रूपमध्ये वीरभद्रेश्वर यात्रा उत्साहात

सोलापूर, दि. ६ डिसेंबर..

येथील वीरभद्रेश्वर यात्रेनिमित्त मंद्रूप येथील मुख्य रस्त्यावरून देवाच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. वीरभद्रेश्वर मंदिरापासून गावतलावाजवळील अग्निकट्टापर्यंत पुरवंतसह सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. गुरूवारी पहाटे श्रीस रूद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर सकाळपासून दर्शनासाठी भक्तांची गददृ दिसून आले. त्यानंतर आरती करून मिरवणूकीस सुरूवात करण्यात आली. गावातील मुख्य ठिकाणी पुरवंतानी कला सादर केला. दुपारी बारा वाजता अग्निकट्टा येथे पालखी आल्यानंतर पूजा करून अग्निमहोत्सव करण्यात आला. यावेळी भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

कुबेर कॉम्प्लेक्स परिसरातून दुचाकी चोरी

सोलापूर, दि.६ डिसेंबर-

विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीची घटना उघडकीस आली आहे. तानाजी लिंबराज पाटुळे (वय ३८, रा. स्वामी विवेकानंद नगर भाग-२, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर गाडी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते १२.३० दरम्यान कुबेर कॉम्प्लेक्स, विजापूर रोड येथे ही घटना घडली. पाटुळे यांनी त्यांची काळ्या रंगाची हिरो पॅशन प्रो मोटारसायकल (एमएच १३ डीएन ५७११) हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. मात्र, संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने सुमारे २५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेची नोंद ४ डिसेंबर रोजी करण्यात आली असून पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल फुटाणे करीत आहेत.

शासकीय हमीभाव मका खरेदी ऑनलाईन नांव नोंदणी साठी मुदतवाढ

पंढरपूर,दि.६ डिसेंबर -

शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर हमीभावाने मका विक्री करण्यासाठी पंढरपुर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी दि.१५ डिसेंबर अखेर आपली मका ऑनलाईन नांव नोंदणी पंढरपूर तालुका सह. खरेदी विकी संघ लि., नवी पेठ, पंढरपूर येथे करावी.ऑनलाईन नांव नोंदणी शिवाय शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर मका विक्री करता येणार नाही. तरी तालुक्यातील जास्तीत-जास्त शेतकरी बंधुनी याचा लाभा घ्यावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजुबापू गावडे यांनी केले आहे. सभापती गायकवाड यांनी सांगितले की, शासनाचे हमीभाव खरेदी योजने अंतर्गत ३० नोव्हेंबर अखेर मका उत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर ७/१२ उतारा, मका पिकाची नोंदीसह, आधारकार्ड व बैंक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे जमा करून ऑनलाईन नांव नोंदणी करणेसाठी वरील कालावधी निश्चित केला होता. मुदत वाढ मिळावी म्हणून मागणी केलेली होती. या मागणी प्रमाणे राज्य शासनाने दि. १५ डिसेंबर पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. मक्यासाठी हमीभाव रू.२४००/- प्रति क्विंटल आहे.

कारखानदारांचे ऊस दराबाबत अद्यापही मौनच

शेतकरी संघटनेच्या आंदोलनालाही न जुमानता हंगाम सुरुच

तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि. ६ डिसेंबर-

यंदाचा ऊस गळीत हंगाम सध्या जोरात सुरु आहे. माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारांनी ऊस दराबाबत अद्यापही मौन बाळगले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ३० नोव्हेंबरपर्यंत दर जाहीर करण्याचा अल्टीमेटम दिला होता पण एकाही कारखानदाराने ऊस दर जाहीर ने केल्याने शेतकऱ्यांतून नाराजी आहे.

तालुक्यात पाच साखर कारखाने आहेत. चांदापुरी येथील ओंकार साखर कारखाना वगळता बाकीचे सर्व साखर कारखाने दिग्गज नेत्यांचे आहेत. ते कारखाने अतिशय जुने आहेत. यामुळेच शेतकऱ्यांना या सर्वच साखर कारखान्याकडुन चांगल्या दराची अपेक्षा आहे. पण हे कारखानदार शेतकऱ्यांना दराबाबत न्याय देतच नाहीत. एकाही कारखानदाराने ऊस दर जाहीर न करता काही कारखान्यांनी २८०० तर काहींनी २८५० एवढाच पहीला हप्ता दिला आहे. शेतकरी संघटनेची ३४०० रुपये पहीली उचल द्यावी अशी मागणी आहे पण एकाही कारखानदाराने दर न जाहीर करता शेतकऱ्यांना पहीला हप्ता थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला

आहे. माळशिरस तालुक्यातील सहकार महर्षी व सदाशिवनगर येथील शंकर सहकारी कारखाना हे दोन्ही अतिशय जुने व मोहीते-पाटील यांचे साखर कारखाने आहेत. माळीनगर येथील कारखाना गिरमे यांचा सर्वात जुना, श्रीपुर येथील साखर कारखाना परिचारक यांचा तर चांदापुरी येथील ओंकार साखर कारखाना बोत्रे-पाटील यांचा आहे. सर्वच कारखाने अतिशय दिग्गजांचे आहेत. हे सर्व कारखानदार वेगवेगळ्या राजकीय पक्षात असले तरी दर देताना यांची चांगलीच मिलीभगत आहे. माळशिरस तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा म्हणून जोरदार प्रयत्न आहे पण आंदोलनाला शेतकऱ्यांचा म्हणावा असा प्रतिसाद नाही ही खरी शोकांतिकाच आहे. माळशिरस तालुक्यात पाच साखर कारखाने आहेत. ऊसाचे क्षेत्रही मोठे आहे. पण कारखानदार चांगला दर देत नसल्यामुळेच माळशिरस तालुक्यातील ऊस सातारा, पुणे, सांगली या शेजारच्या जिल्ह्यातील कारखान्यास मोठ्या प्रमाणावर जात आहे. शेजारच्या सर्वच जिल्ह्यात ३४०० ते ३५०० रुपये एवढा दर आहे. यामुळेच गेल्या चार-पाच वर्षापासून माळशिरस तालुक्यातील ऊस मोठ्या प्रमाणात शेजारच्या जिल्ह्यात गाळपास जात आहे. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांना टनामागे पाचशे ते सहाशे रुपये जास्त मिळतात. माळशिरस तालुक्यातील अनेक शेतकरी सध्या तालुक्यातील एकाही कारखान्यास ऊस न देता शेजारच्या जिल्ह्यातील साखर कारखान्यास देत आहेत. यामुळे माळशिरस तालुक्यातील कारखानदारांनी दराबाबत आत्म चिंतन करणे गरजेचे आहे. भविष्यात ऊस दरामुळे माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारी अडचणीत येणार हे नक्की आहे.

> माळशिरस तालुक्यातील साखर कारखानदारांनी ऊसाला ३४०० रुपये एवढी पहीली उचल द्यावी. सर्व साखर कारखाने जुने आहेत. ते उपपदार्थ निर्मीती करतात. त्यामुळे चांगला दर देण्यास काहीच अडचण नाही.
>
> **- अजित बोरकर,**
> अध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, माळशिरस.

कला-साहित्य-संस्कृतीमुळे गावाची खरी श्रीमंती; माजी आ. परिचारक

भडगांवकरांच्या 'आठवणींच्या गंधकोषी' पुस्तकाचे प्रकाशन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.६ डिसेंबर -

श्रीक्षेत्र पंढरपूरला शास्त्रीय संगीताची मोठी परंपरा आहे. ही परंपरा स्वरसाधना संस्थेने अखंड ३५ वर्षे सांभाळली आहे. कला, साहित्य व संस्कृतीमुळेच शहराची खरी श्रीमंती लक्षात येते असे प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

येथील स्वरसाधना मंडळाचे सदस्य प्रदीप भडगांवकर यांनी लिहिलेल्या 'आठवणींच्या गंधकोशी' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. परिचारक यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या वेळी ज्येष्ठ गायक दिलीप टोमके, प्रदीप भडगांवकर, विलास भडगांवकर, अरुण भडगांवकर, सीमा भडगांवकर उपस्थित होते. प्रदीप भडगांवकर



यांनी प्रास्ताविक केले. संगीत सेवेमुळेच ज्येष्ठ कलाकारांची सेवा करण्याचे भाग्य मिळाले आणि त्या आठवणी कायम रसिकांच्या मनात उर्जा देत रहाव्यात याच भुमिकेतून हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी श्री. परिचारक म्हणाले, पुढील काळात कलाक्षेत्रातील स्थानिक तरुण मंडळींनी निश्चित पुढाकार घ्यावा. त्यांच्या पाठीशी कायमच आपले पाठबळ राहिल. पडद्यामागील कलाकारांचे अनुभव हे अतिशय प्रेरणादायी असतात आणि ते अनुभव प्रदीप भडगांवकर यांनी आपल्या लेखनातून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले असल्याचे सांगत या ३५ वर्षांच्या काळातील अनेक जुन्या आठवणींचा ठेवा देखील त्यांनी उलगडत या पुस्तक प्रकाशनास शुभेच्छा देत त्यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रदीप व सीमा भडगांवकर यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर दुधाने, मिलिंद परिचारक, ज्येष्ठ कलाकार दिलीप टोमके यांनी मनोगत व्यक्त करताना आठवणींचा गंधकोश हा आठवणींचा ठेवा पंढरपूर कला रसिक श्रोत्यांसाठी एक ऊर्जादायी आणि प्रेरणादायी ठरेल असे सांगत भंडगांवकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाला शुभेच्छा दिल्या. तुकाराम चिंचणीकर यांनी सुत्रसंचलन केले. प्रवीण ताठे, प्रतिक भडगांवकर, अजीत माने यांनी परिश्रम घेतले.

दमदाटी, शिवीगाळ केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.६ डिसेंबर -

फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दमदाटी शिवीगाळ केल्याप्रकरणी दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी अंदाजे १०.३० वाजता बाबा कादरी मस्जिद परिसरात घडली.

फिर्यादी मो. युसुफ इस्माईल शहापुरे वय ५६, रा. आनंद नगर नई जिंदगी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी अ. जब्बार महेबुब शेख रा. उत्तर कसबा यांनी फोन करून फिर्यादीच्या पत्नीचे सामान खोलीतून बाहेर काढून टाकण्याची धमकी दिली. सदर खोली बांगीसाहेब यांना देणार असल्याचे सांगत शिवीगाळ व दमदाटी केली, असा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर फिर्यादीने आरोपी अ. जब्बार महेबुब शेख तसेच स्वयंघोषित मुतवल्ली असलेल्या आरोपी आसिफ अ. हुसेन शेख (रा. उत्तर कसबा) यांना भेटून खोलीचे कुलूप काढून देण्याची विनंती केली. परंतु दोघांनीही जाणूनबुजून कुलूप उघडण्यास नकार देत फिर्यादीला त्यांच्या कब्जातील खोलीत येणे-जाणे रोखल्याचा आरोप आहे. या घटनेवरून दोन्ही आरोपींवर अडथळा निर्माण करणे, दमदाटी, शिवीगाळ आणि बेकायदेशीरपणे कब्जा रोखण्याचे आरोप ठळकपणे नमूद केले गेले आहेत. या प्रकरणाचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल खरात हे करत आहेत.

लहान बालकांना भीक मागायला लावणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.६ डिसेंबर -

शहरातील महावीर चौक सिग्नलवर लहान बालकांना भीक मागायला लावणाऱ्या महिलेवर सदर बझार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात असल्याची माहिती सहा. पोलीस आयुक्त राजन माने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

शहरात प्रमुख चौकातील सिग्नलवर उभे राहून भीक मागणारी लहान मुले, स्त्रिया, पुरूष यांच्यावर कारवाई करिता अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस अंमलदार व दामीनी पथक विभाग ०१ व विभाग ०२ यांचे पथक नेमण्यात आले आहे.

दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस अंमलदार तसेच दामीनी पथक विभाग ०२ कडील महिला पोलीस अंमलदार सोलापूर शहरातील महावीर चौक या ठिकाणी पेट्रोलिंग करीत असताना चौकातील सिग्नलवरील थांबण्याऱ्या प्रवाशाकडे भीक मागताना एक महिला व तिच्यासोबत ०३ बालके दिसून आली. त्यांच्याकडे चौकशी केली असता महिलेचे नाव जैताबाई महादेव पवार वय अंदाजे ४० वर्षे राहणार पारधी वस्ती, आयटीआय, जुना विजापूर नाका, सोलापूर असे आहे. सदर बालके भीक मागत असताना पथकास मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून बाल कल्याण समिती समोर हजर करून त्यांना बालगृह येथे ठेवण्यात आले आहे.

सदर बालकांना भीक मागायला लावणाऱ्या महिला आरोपी नामे जैताबाई महादेव पवार वय अंदाजे ४० वर्षे राहणार पारधी वस्ती, आयटीआय, जुना विजापूर नाका, सोलापूर हिच्या विरुध्द बाल न्याय अधिनियम २०१५ चे कलम ७६ प्रमाणे सदर बझार पोलीस ठाणे येथे दिनांक ०५ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा रजिस्टर क्र. १०१५/२०२५ दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील, सहा. पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरिक्षक धनाजी शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मसपोनि स्वाती येळे, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पथक तसेच दामीनी पथक विभाग ०१ व विभाग ०२ यांनी यशस्वीपणे केली.

धैर्य आणि निष्ठेच्या बळावर दिव्यांग अविनाश हुलसुरे यांनी घेतले बाबासाहेबांच्या अस्थींचे दर्शन

- **कुणाचीही मदत, आधार किंवा कुबड्या न घेता स्वतःच्या जिद्दीने गेले पहिल्या मजल्यावर**
- **प्रेरणाभूमी परिसरातील एक हृदयस्पर्शी, प्रेरणादायी प्रसंग**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

बुधवार पेठ, मिलिंद नगर येथे सकाळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी परिसरात एक हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी प्रसंग पाहायला मिळाला. दिव्यांग अविनाश हुलसुरे या युवकाने कुणाचीही मदत न घेता स्वतःच्या अंगातील अदम्य इच्छाशक्ती व धैर्याच्या जोरावर पायऱ्या चढून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशास वंदन केले. दिव्यांग असूनही अढळ श्रद्धा आणि असामान्य धैर्याने बाबासाहेबांप्रती असलेला त्यांचा 'भिमप्रेमाचा' संदेश खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरला आहे.

शनिवारी सकाळी महापरिनिर्वाणदिनी मिलिंद नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी समोर तीन चाकी सायकलवरून एक दिव्यांग युवक खाली उतरला. ते कोणत्याही व्यक्तीची मदत, आधार किंवा कुबड्या न घेता स्वतःच्या जिद्दीने पहिल्या मजल्यावर चढले. अस्थिकलशाचे मनोभावे दर्शन घेऊन अभिवादन केले. पुन्हा कुणाच्या आधाराशिवाय पायऱ्यावरून खाली आले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांचा पदस्पर्श लाभलेल्या ऐतिहासिक 'पंचाची चावडी' येथेही त्यांनी अभिवादन केले. त्यानंतर आपल्या तीन चाकी सायकलवरून पुढील कामाला ते मार्गस्थ झाले. अविनाश हुलसुरे यांचा हा निष्ठा, त्याग आणि जिद्दीचा प्रवास पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. दिव्यांग असूनही

अढळ श्रद्धा आणि असामान्य धैर्याने बाबासाहेबांप्रती असलेला त्यांचा 'भिमप्रेमाचा' संदेश खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरला आहे. मागील ७-८ वर्षांपासून, १४ एप्रिल आणि ६ डिसेंबरला प्रेरणाभूमीत नियमितपणे येऊन बाबासाहेबांना अभिवादन करतो. माझं जे काही आहे ते डॉ. बाबासाहेबांनीच दिलं आहे.दरवर्षी इथे नतमस्तक होऊनच माझा प्रवास सुरू होतो. यामुळे मला ऊर्जा आणि बळ मिळते.

भारतरत्न डॉ. आंबेडकर यांचे विचार हेच माझी खरी ताकद , शक्ती आणि प्रेरणा आहे, अशी कृतज्ञतापूर्वक भावना अविनाश हुलसुरे या युवकाने व्यक्त केली.

गुळसडी-भंडारे वस्ती रस्त्याचे अखेर भूमिपूजन; २० लाखांचा निधी मंजुर

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि.६ डिसेंबर-

करमाळा तालुक्यातील गुळसडी येथील भंडारे वस्तीला मुख्य रस्त्याशी जोडणारा महत्त्वपूर्ण मार्ग गेली अनेक वर्षे रखडलेला होता. अखेर या रस्त्याचे भूमिपूजन आज भाजपाचे जिल्हा सरचिटणीस व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांच्या हस्ते झाले.

श्री. चिवटे म्हणाले की मी गेल्या भेटीत हा रस्ता अतिशय बिकट अवस्थेत पाहिला होता. ग्रामस्थांचा त्रास लक्षात घेऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी केली. त्यांनी तातडीने या रस्त्यासाठी २० लाख रुपये मंजूर केले. या निधीमुळे रस्त्याचे काम आता जलद गतीने होईल. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अफसर तात्या जाधव, रामभाऊ ढाणे, तालुकाध्यक्ष काकासाहेब सरडे, उपाध्यक्ष बंडू शिंदे, अमोल पवार, सोमनाथ घाडगे, सचिन गायकवाड, नाना अनारसे, बंडू शिंदे, महेश दिवाण, संजय दुरगळे, अशोक मोरे, वसीम सय्यद यांच्यासह गुरसळी येथील चेअरमन महावीर कळसे, आदम शेख, सरपंच प्रमोद भंडारे, उपसरपंच योगेश भंडारे, राजेंद्र भंडारे, शिवाजी पाटील, दिगंबर भंडारे, सतीश बागल, तानाजी भंडारे , प्रताप पाटील, दत्तात्रय भंडारे , हरिभाऊ भंडारे, महादेव भंडारे, रामभाऊ माने, राहुल जाधव, रणजीत भंडारे, शिवाजी बागल, संजय कुलकर्णी , गणेश महाडीक, भरत गुंड, किरण शिंदे, विनोद इंदलकर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बार्शीत कोयत्याची दहशत, कोयत्याने मोबाईल शॉप फोडले

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि.६ डिसेंबर

बाळेश्वर नाका परिसरातील विघ्नहर्ता मोबाईल शॉपीमध्ये एकाने कोयत्यासह घुसून केलेल्या दहशतीमुळे आज शहरात एकच खळबळ उडाली. कल्याण राजेंद्र म्हेत्रे (वय ३५. रा. कसबा पेठ) यांच्या दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बबलु कसबे याच्या विरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी कल्याण म्हेत्रे हे बाळेश्वर नाका येथे मोबाईल शॉपी चालवतात. दि. ४ डिसेंबर रोजी बबलू कसबे यांच्या पत्नीचा मोबाईल रिचार्ज करण्याच्या कामावरुन किरकोळ गैरसमज झाला होता. यावेळी मोबाईलमध्ये नेट सुरु न झाल्याने त्यांनी शॉपमध्ये येऊन शाब्दिक वाद घातला होता. त्यावर शॉपकिपरने तात्काळ कस्टमर केअरशी संपर्क साधून समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, दुसऱ्या दिवशीही (दि. ५ डिसेंबर) मोबाईल रिचार्ज झाल्याबाबत वाद निर्माण झाला. मात्र सिमकार्डचे स्लॉट बदलताच मोबाईलमध्ये नेट सुरु झाल्यानंतर बबलू कसबे यांच्या पत्नीने मोबाईल घेऊन दुकानातून प्रस्थान केले.

कोयत्यासह दुकानात घुसून काचा फोडल्या

आज दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ११.५० वाजता बबलू कसबे हे दुकानात आले. 'तु माझ्या बायकोला काय बोललास?' असे विचारताच त्यांनी कमरेत ठेवलेला कोयता काढून दुकानदाराच्या काचेच्या काउंटरवर सलग तीन वार केले. काच फुटल्याचा आवाज आणि अचानक झालेल्या हल्ल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर कसबे यांनी दुकानात घुसून फिर्यादीचा शर्ट पकडत, कोयता उगारत 'इथं राहायचं असेल तर नीट राहा',अशी धमकी दिली आणि घटनास्थळावरुन पसार झाले.

सदर आरोपीवर जिल्हाधिकारी सोलापूर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत जारी केलेल्या शस्त्रबंदी आदेशाचा कालावधी (दि. २३ नोव्हेंबर रात्री २० वाजेपासून दि. ७ डिसेंबर रात्री २० पर्यंत) सुरु असताना कोयता बाळगल्याने हा आदेश उघडपणे धुडकावून लावल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेनंतर दुकानदाराने तात्काळ डायल ११३ वर संपर्क करुन पोलिसांत तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

मनपा, झेडपी निवडणुकांचा धुरळा जानेवारीतच

● निवडणुका जानेवारीअखेरच घेण्याच्या आदेशावर सुप्रिमचे पुन्हा शिक्कामोर्तब; युती-आघाड्यांबाबत खलबतं सुरु

तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

नगरपालिका, नगरपंचायतींचे मतदान संपले असून येत्या २१ डिसेंबरला कारभारी कोण याचा निकालही जाहीर होईल. दरम्यान नुकतेच सुप्रिम कोर्टाने पुन्हा एकदा निवडणूक आयोगाला आदेश देत सुनावले आहे की, महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका जानेवारी २०२६ पर्यंत घ्या. त्यामुळे डिसेंबर २०२५ अखेरीसच या निवडणुकांची घोषणा होणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांसह इच्छुकांनी तयारीला लागण्यात काही हरकत नसावी. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये सर्व तत्वं बाजूला ठेवून कोणता पक्ष, कोणत्याही पक्षाबरोबर युती करून कसल्याही परिस्थितीत सत्ता काबीज करायचीच चंग बांधल्याचे दिसून आले. या निवडणुकीत सत्ताधारी-विरोधकांमध्ये राडा दिसला. पण, महायुतीतील मित्रपक्षांमध्ये देखील आरोप-प्रत्यारोप दिसून आले. पक्ष फोडाफोडीच्या प्रकाराने महाराष्ट्राचे राजकारण ढवळत असून आगामी निवडणुकांमध्ये तर हे प्रकार आणखीन वाढण्याचा धोका व्यक्त होत आहे.

सोलापूर महापालिकेच्या पार्श्वभूमीवरील राजकारण पाहिल्यास शहरात भाजपा हा अगदी मजबूत पक्ष आहे. मागील काळात महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता होती. १०२ नगरसेवकांपैकी ४९ नगरसेवक भाजपाचे होते. एकत्रित शिवसेनेचे २१, काँग्रेसचे १४, एमआयएमचे ९, एकत्रित राष्ट्रवादीचे ४, बसपाचे ४, माकप १ असे सोलापूर महापालिकेत पक्षीय बलाबल होते. आगामी निवडणुकांमध्ये देखील भाजपा मजबूत आहे. कारण आता शहरातील तीनही आमदार भाजपाचे आहेत. त्यामुळे भाजपा मित्रपक्ष शिवसेना व राष्ट्रवादी यांना सोबत घेवून महायुती करेल का याबाबत शंकाच आहे. भाजपाचा रागरंग ओळखून आणि नगरपालिका निवडणुकीतील पालकमंत्र्यांच्या राजकीय खेळी पाहून भाजपाचे मित्रपक्ष आता सजग झाले आहेत. अजित पवार राष्ट्रवादीने तर एकला चलो रे चे सूतोवाच केले. जागा वाटपात सन्मान न मिळाल्यास आमचा मार्ग मोकळा राहणार आहे, असे शिवसेनेने आधीच स्पष्ट केले आहे. आता राहिला प्रश्न विरोधकांचा एकेकाळी सोलापूर म्हणजे बालेकिल्ला असलेल्या काँग्रेसची सध्या राजकीय दुरवस्था आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट शहरात दिसायला दणकट पण महापालिकेत नगण्य आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतील वाद शमण्यास तयार नाही. सोलापुरातील काही राजकीय पक्ष असे आहेत की त्या पक्षात कार्यकर्त्यांपेक्षा नेतेच जास्त आहेत. रस्सी जल गयी मगर बल नही गया या म्हणीप्रमाणे राजकीय ताकद घटल्यानंतरही आपसातील हेवेदावे आणि मतभेद, मनभेद नेते विसरायला तयार नाहीत.

महापालिकेत भाजपा आणि काँग्रेस मोठे भाऊ आहेत. त्यामुळे यांचे वर्चस्व असते. पण या पक्षात देखील सर्वकाही आलबेल नाही. पक्षातील अंतर्गत वाद विकोपाचे आहेत. भाजपमध्ये देखील आमदारांमध्येच सख्य नाही तर काँग्रेसमध्ये एकलशाहीमुळे नाराजांची संख्या मुबलक आहे. शिवसेनेत अंतर्गत वाद मोठे आहेत. राष्ट्रवादीतही तोच प्रकार आहे. महायुती-महाविकास आघाडी झाली नाही तर आरोप-प्रत्यारोपांचे राजकीय स्फोट होणार हे मात्र नक्की. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये जिल्ह्यात चांगलीच रणधुमाळी पहावयास मिळणार आहे. एकूण ६८ गट आणि १३६ पंचायत समिती गणांसाठी होणाऱ्या निवडणुका रंगतदार होणार आहेत. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये संस्थानिक प्रस्थापित राजकारणी असल्याने यंदाच्या निवडणुकांमध्ये मिनी मंत्रालयाच्या सत्तेसाठी मोठी चुरस असणार आहे. नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीत राड्यांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माजी नगरसेवकांसह इच्छुक कार्यकर्ते आस लावून बसलेल्या महापालिका आणि जिल्हा परिषदा निवडणुका येत्या महिन्याभरात होण्याच्या शक्यता बळावल्या आहेत. सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार जानेवारी अखेरीपर्यंत या निवडणुका घेणे निवडणूक आयोगावर बंधनकारक आहे. तीन वर्षांच्या गॅपनंतर या निवडणुका होत असल्याने नवइच्छुकांनाही आता मोठी संधी आहे. नगरसेवक अथवा जिल्हा परिषद सदस्य होण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्यांची संख्या हजारोंवर आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीत निवडणुकीच्या मैदानात हजारो उमेदवारांनी आपले नशिब आजमावले असून येत्या २१ डिसेंबरला मतमोजणीनंतर कोण सिकंदर हे स्पष्ट होणार आहे.

पालकमंत्र्यांची राजकीय खेळी काय असणार याची उत्सुकता

नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत ज्यांचा मोठा प्रभाव होता असे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काय राजकीय खेळी असणार याची उत्सुकता भाजपासह मित्रपक्ष आणि विरोधकांना लागली. तशी ती लोकांनाही लागली आहे. या निवडणुकीत तरी पालकमंत्री मित्रपक्षांना सोबत घेतात का नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. शहरात भाजपाचे तीन आमदार असल्याने नगरसेवक पदासाठी उमेदवारी देताना पक्षाची दमछाक होणार आहे. तर इकडे जिल्ह्यात भाजपाचे ५ आमदार असून सांगोल्याचे शेकाप आमदार भाजपाचे घट्ट मित्र झाले आहेत. शरद पवार राष्ट्रवादीची सूत्रे मोहिते-पाटील आणि शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या हाती असणार आहेत. काँग्रेस खा.प्रणिती शिंदे, राष्ट्रवादीसाठी थेट अजित पवार तर शिवसेना एकनाथ शिंदे आणि उबाठाचे उध्दव ठाकरे निर्णय घेतील असे चित्र आहे.

स्थानिक संस्थांच्या निवडणुकात राजकीय पक्ष आपले चिन्ह सोडून कोणाबरोबरही युती, आघाडी करतात आणि सत्तेची खुर्ची आपल्याकडेच राहील यासाठी साम, दाम, दंड याचा वापर करतात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये एकमेव भाजपाने स्वचिन्हावर जास्तीत जास्त ठिकाणी नगराध्यक्ष पदांचे उमेदवार मैदानात उतरविलेले आहेत. त्यामुळे राज्यात भाजपाचीच सरशी होणार यात शंका नाही. पण या निवडणुकींमध्ये झालेले राजकारण पाहता ते महाराष्ट्राच्या राजकारणाला शोभणारे नव्हते, हे मात्र कटूसत्य होय.

केंद्र आणि राज्याच्या सत्तेतील मित्रपक्ष असलेल्यांनी या निवडणुकीत एकमेकांवर चिखलफेक केल्याचे दिसून आले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून असे प्रकार घडल्याने महायुतीत काहीसा बेबनाव असल्याचेही चित्र होते. परंतु निवडणुका संपताच राजकीय नेत्यांनी आपला पवित्रा बदलत निवडणुका संपल्या. आता आपण पुन्हा मित्र असे सांगून लोकांना भ्रमात टाकले. लोक विचार करत आहेत की, लोकशाही देशात मतदाराला खरेच काही महत्व आहे की, निवडणुकांपुरतेच वापर होतो आहे. सर्वोच्च अशा राज्यघटनेने दिलेल्या पवित्र अशा मतदानाच्या अधिकाराचा खरोखर काही उपयोग होतो आहे का, असा प्रश्न सामान्य मतदारांना पडलेला आहे. कारण मतदार मतदान करतो तेंव्हा तो एखाद्या विचाराच्या पक्षाला करतो. पण नंतर मात्र कोण, कोणत्याही पक्षात जातो आणि पुढे वेगळेच राजकारण घडते. त्यामुळे मतदान प्रक्रियेवरील सामान्यांचा विश्वास उडतो की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. यातच भर म्हणजे निवडणूक आयोगाचा कारभार सावळा गोंधळाचा दिसून येतो. मतदार यादीतील प्रचंड घोळ हे थक्क करणारे आहेत. वास्तविक पाहता निवडणूक यादीतील घोळ हे काय आजचे नाहीत, ते वर्षेनुवर्षे चालत आलेले आहेत. परंतु यावेळेस मात्र सर्वच राजकीय पक्षांनी याकडे लक्ष वेधल्याने निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. निवडणूक यादीतील घोळ, दुबार नावे, मृतांची नावे, छायाचित्रांचा घोळ, एकाच कुटुंबातील सदस्यांची वेगवेगळ्या मतदार केंद्रावर होणारे मतदान, मतदार यादीतून आपोआप नाव गायब होणे अशा अनेक घोळांमुळे यंदा निवडणूक आयोग जास्तच चर्चेत आला आहे. न्यायालयाने देखील आयोगाला झापलेय तर मुख्यमंत्र्यांसह सर्वच राजकीय पक्षांनी आयोगावर नाराजी व्यक्त केली आहे. काहींनी तर जाहीरपणे आयोगाची लाज देखील काढलेली आहे. या सर्व प्रकारानंतर तरी आयोगाच्या कामकाजात सुधारणा होते का आणि निवडणुका पारदर्शी होतील का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

रशियन शस्त्रांचे सुटे भाग भारतातच करणार तयार

द्विपक्षीय संरक्षण करारात दोन्ही देशांची मंजुरी

◆ **नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

भारतीय लष्कराकडून वापर होत असलेल्या रशियन बनावटीच्या शस्त्रास्त्रांची भारतातच निर्मिती करण्यास रशियाने मंजुरी दिली आहे. यामुळे शस्त्रांची आयात आणि देखभालीवर होणारा खर्च आणि वेळ वाचणार आहे. उभय देशात झालेल्या द्विपक्षीय संरक्षण करारात याला दोन्ही देशांनी सहमती दर्शविली आहे.

भारत-रशिया यांच्यात द्विपक्षीय संरक्षण करार झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पुतिन यांनी या मुद्यावर चर्चा केली.

भारतीय लष्कर मोठ्या प्रमाणात रशियन शस्त्रांचा वापर करते. या शस्त्रांसाठी लागणारे सुटेभाग रशियावरून आयात करण्यात फार वेळ जात होता आणि याचा परिणाम देखभालीवर होत असे. खरेदी प्रक्रियाही किचकट आणि वेळखाऊ होती. गेल्या अनेक वर्षांपासून भारताकडून हा मुद्दा उपस्थित करण्यात येत होता.

रशियन बनावटीच्या शस्त्रांच्या निर्मितीसाठी संबंधित तंत्रज्ञान भारताकडे सोपविण्यावर रशियाने मंजुरी दिली आहे. तसेच दोन्ही देश संयुक्तपणे मेक इन इंडिया अंतर्गत या शस्त्रास्त्रांची निर्मिती करणार आहेत, असे संयुक्त वक्तव्यात नमूद करण्यात आले आहे. शस्त्रे आणि सुटेभागांच्या निर्मितीसाठी प्रकल्प स्थापण करणे सोबतच मित्र देशांना शस्त्रांची निर्यात करण्यास भारत-रशिया सहमत झाले आहेत. पुतिन भारतात येण्याच्या एक दिवस अगोदर राजनाथ सिंह आणि आंद्रेई बेलौसव्ह या दोन्ही संरक्षण मंत्र्यांमध्ये द्विपक्षीय संरक्षण सहकार्यावर चर्चा झाली. ◀*(वृत्तसंस्था)*

एस-४००, एस-५०० खरेदीत भारताला रस

द्विपक्षीय संरक्षण विषयक चर्चेत भारताने एस-४०० आणि एस-५०० क्षेपणास्त्र प्रणालीच्या खरेदीसाठी उत्सुकता दर्शविली. निर्बंध लादण्याची धमकी अमेरिकेने देऊनही भारताने २०१८ मध्ये एस-४०० खरेदीचा करार केला. तसेच पाचपैकी तीन यंत्रणा भारताकडे सोपविल्या. या चर्चेत भारताने एस-५०० यंत्रणाही खरेदीची इच्छा दर्शविली आहे.

पाकिस्तान-अफगाणिस्तानात पुन्हा जुंपली

सीमेवरील भीषण गोळीबारात चार ठार ● कित्येक जखमी

◆ **काबुल, ६ डिसेंबर**

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात पुन्हा एकदा जुंपली आहे. दोन्ही देशांच्या सैनिकांनी चमन सीमेवर परस्परांवर भीषण गोळीबार केला. यात पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले असून, चार नागरिक ठार झाल्याचा दावा अफगाणिस्तानच्या अधिकाऱ्यांनी केला.

अफगाणिस्तानच्या स्पिन बोल्डक जिल्ह्याच्या गव्हर्नरने गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या संख्येला दुजोरा दिला आहे. पाकिस्तानच्या जिल्हा रुग्णालयांत जखमींना दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे. मात्र, गोळीबारात कुणीही मृत्युमुखी पडले नाही, असा दावा पाकिस्तानने केला.

बलुचिस्तानच्या सीमेवर गोळीबार केल्याचा आरोप दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी परस्परांवर केला. अफगाणी लष्कराने बदानी परिसरात मोर्टारने गोळे डागले, अशी माहिती पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी दिल्याचे 'डॉन' या वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

स्पिन बोल्डक परिसरात पाकिस्तानने हल्ला केल्याचा आरोप अफगाण तालिबानचे प्रवक्ते जबीहुल्ला मुजाहिद यांनी केला. आमच्या सैनिकांनी केवळ प्रत्युत्तर दिल्याचे त्यांनी सांगितले.

अफगाणिस्तानने केलेल्या गोळीबाराच प्रत्युत्त दिले. या व्यतिरिक्त चमन-कंधार मार्गावरही गोळीबार झाल्याची माहिती समोर आली. मात्र, त्याला दुजोरा मिळू शकला नाही, असे डॉनने अधिकृत सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

'आयएसपीआर'चे मौन

रात्री दहा वाजताच्या सुमारास गोळीबार सुरू झाला. तो उशिरापर्यंत सुरू होत. एका महिलेसह तीन जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती चमन जिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षकाने दिली. मात्र, पाकिस्तानी लष्कराची माध्यम शाखा आयएसपीआर किंवा परराष्ट्र कार्यालयाने या मुद्यावर कोणतेही अधिकृत वक्तव्य दिलेले नाही. ■

कुनो राष्ट्रीय उद्यानात चित्याच्या शावकाचा मृत्यू

श्योपूर (मध्यप्रदेश), ६ डिसेंबर

मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात जंगलात सोडण्यात आलेल्या एका चित्याच्या शावकाचा मृत्यू झाला आहे, असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले.

गुरुवारी आंतरराष्ट्रीय चित्ता दिनानिमित्त मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी मादी चित्ता वीरा व तिच्या दोन पिल्लांना उद्यानाच्या मुक्त क्षेत्रात सोडले. रात्रीच्या वेळी आई व भावंडांपासून वेगळे झालेले शावक काही तासांनी मृतावस्थेत आढळले. हे शावक दहा महिन्यांचे होते.

शवविच्छेदन अहवाल मिळाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. वीरा व तिचे दुसरे पिल्लू एकत्र असून ते चांगले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀*(वृत्तसंस्था)*

'बब्बर खालसा'चा निधी गोठवला, संपत्ती जप्त

ब्रिटन सरकारचा दणका

◆ **लंडन, ६ डिसेंबर**

ब्रिटन सरकारने प्रथमच खलिस्तानी दहशतवादी संघटना बब्बर खालसावर थेट कारवाई करीत संघटनेवर आर्थिक प्रतिबंध लादले. संघटनेचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. या माध्यमातून बब्बर खालसाला मिळणारी आर्थिक मदत रोखण्यात आली. ही कारवाई देशांतर्गत दहशतवादविरोधी व्यवस्थेच्या अंतर्गत करण्यात आली.

ब्रिटनमधील शीख व्यावसायिक गुरप्रीतसिंग रेहलवर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती यूके ट्रेझरी विभागाने दिली. भारतात दहशतवादी कारवाया करणाऱ्या संघटनांसोबत जुळलेला असल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याच्या कित्येक संपत्ती गोठवण्यात आल्या तसेच त्याला कंपनी संचालकाच्या पदासाठी अयोग्य असल्याचे घोषित करण्यात आले. यामुळे रेहल कोणत्याही कंपनीचा संचालक बनू शकणार नाही किंवा कंपनी चालवू शकणार नाही. याच प्रकरणात ब्रिटिश सरकारने बब्बर अकाली रेहल समूहाच्या विरोधात संपत्ती जप्तीचा आदेश जारी केला. हा समूह देखील बब्बर खालसाला भरती, शस्त्रास्त्र खरेदी आणि निधी उभारणीसारख्या कारवायांमध्ये सहभागी होता.

आम्ही ब्रिटनच्या आर्थिक प्रणालीचा वापर दहशतवाद्यांना करू देणार नाही. दहशतवादासाठी निधी उपलब्ध करून देणारे जाळे उद्ध्वस्त आम्ही करणार असल्याचे या प्रयत्नातून दिसून येते. कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याचे आणि हिंसाचारात ठामपणे उभे राहण्याचे प्रयत्न या माध्यमातून दिसून येत आहेत. हिंसाचार घडवणाऱ्या कारवायांच्या विरोधात आमची कठोर भूमिका आहे, असे ब्रिटनमधील आर्थिक सचिव लुसी रिग्बी यांनी सांगितले. ◀*(वृत्तसंस्था)*

दहशतवाद विरोधी कायद्यांतर्गत कारवाई

ब्रिटनने ही कारवाई दहशतवाद विरोधी (प्रतिबंध) कायदा-२०१९ च्या अंतर्गत केली आहे. या कायद्याच्या अंतर्गत दहशतवादी कारवायांशी संबंधित व्यक्ती किंवा संघटनांची संपत्ती गोठवण्याचा किंवा त्यांच्यावर आर्थिक प्रतिबंध लादण्याचा अधिकार तपास यंत्रणांना मिळतो. महत्त्वाचे म्हणजे बब्बर खालसाला यापूर्वीच दहशतवादी संघटना घोषित करून त्यावर प्रतिबंध लादण्यात आला आहे. ■

चित्रपट वार्ता

राम गोपाल वर्माने केले उर्मिलाचे कौतुक

मुंबई : राम गोपाल वर्माने अलिकडेच उर्मिला मातोंडकरचे कौतुक केले. उर्मिला ही अतिशय टॅलेंटेड आणि व्हर्सेटाइल अभिनेत्री आहे. म्हणूनच मी तिच्यासोबत अनेक वर्षे काम करीत राहिलो. मी अमिताभ बच्चनसोबतही बरेच काम केले आहे, पण त्यांच्या बाबतीत कोणी नाती जोडत फिरत नाही. 'गन्स ॲण्ड थाईज : द स्टोरी ऑफ माय लाईफ' या पुस्तकातही उर्मिलाबद्दल मनमोकळेपणाने लिहिले आहे. 'मेरी जिंदगी की औरतें' या विभागात त्यानी उर्मिलाने खोलवर छाप पाडली असल्याचे नमूद केले आहे. उर्मिला ही माझ्या आयुष्यातील ती व्यक्ती होती, जिने माझ्यावर मोठा परिणाम केला, असे राम गोपाल वर्माने म्हटले. राम गोपाल वर्माच्या या वक्तव्यानंतर जुन्या आठवणी आणि अफवा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. ■

सचिन पिळगावकरने वयाच्या नवव्या वर्षी घेतली गाडी

मुंबई : मराठी अभिनेता सचिन पिळगावकरने वयाच्या नवव्या वर्षी गाडी विकत घेतली. ही माहिती त्याने स्वतःच एका मुलाखतीत दिली. नऊ वर्षांचा असताना गाडीही चालवायला शिकल्याचे सांगितले. मी नऊ वर्षांचा होतो. त्यावेळी आताचा हा सी-लिंक नव्हता. मी तेव्हा टायकलवाडी इथे राहायचो. टायकलवाडी शिवाजी पार्क इथे येते. मी नऊ वर्षांचा होतो, तेव्हा मी पहिली गाडी खरेदी केली. तिला मॉरिस मायनर बेबी हिंदुस्थान म्हणायचे. या गाडीला बकेट सीट आणि फ्लोअर शिफ्ट गिअर होते. ही पेट्रोलवर धावणारी गाडी होती. तुम्ही ती गाडी चालवायचे कशी, असे विचारले असता सचिन म्हणाला, नाही ड्रायव्हर होता. पण, मी नऊ वर्षांचा असताना, याच वरळी सीफेसवर गाडी चालवायला शिकलो. ■

अरुणाचल प्रदेशात हुतात्मा झालेले ग्रेनेडियर रेजिमेंटच्या १० व्या बटालियनचे मुकेश कुमार यांची बहीण ज्योतीचा विवाह सांबा येथे शनिवारी पार पडला. यावेळी बटालियनच्या सर्व जवानांनी लष्करी पोशाखात विवाहाला हजेरी लावली.

कार-ट्रकच्या धडकेत ५ ठार

छतरपूरः मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यात शुक्रवारी रात्री गुलगंज पोलिस स्टेशनच्या हद्दीत सागर-कानपूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रक आणि कारची धडक झाली. या अपघातात कारमधील एकाच परिवारातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. कारमध्ये सात जण होते. सतना येथील हे कुटुंब शाहगड येथे आयोजित कार्यक्रमासाठी निघाले होते. अपघातानंतर ट्रक चालक वाहन सोडून पळाला होता. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले.

रिलायन्स पॉवर कंपनीविरुद्ध आरोपपत्र दाखल

बनावट बँक हमी प्रकरण

◆ **नवी दिल्ली, ६ डिसेंबर**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) शनिवारी उद्योगपती अनिल अंबानी यांच्या समूह कंपनी रिलायन्स पॉवर लिमिटेड आणि इतर १० उपकंपन्यांविरुद्ध निविदा मिळवण्यासाठी ६८ कोटी रुपयांची बनावट बँक हमी जारी केल्याच्या अवैध सावकारी प्रकरणात आरोपपत्र दाखल केले आहे.

फिर्यादी तक्रारीत नामांकित इतर आरोपींमध्ये रिलायन्स पॉवरचे माजी सीएफओ अशोक कुमार पाल, रिलायन्स एनयू बेस लिमिटेड आणि रोजा पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (रिलायन्स पॉवरच्या उपकंपन्या), रिलायन्स ग्रुपचे कार्यकारी पुनीत नरेंद्र गर्ग, ओडिशास्थित 'शेल' कंपनी बिस्वाल ट्रेडलिंक प्रायव्हेट लिमिटेड, तिचे व्यवस्थापकीय संचालक पार्थसारथी बिस्वाल आणि ट्रेड फायनान्सिंग सल्लागार अमर नाथ दत्ता यांचा समावेश आहे, असे ईडीने सांगितले. बायोथेन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, रविंदर पाल सिंग चड्ढा आणि मनोज भैयासाहेब, पोंगडे हे देखील आरोपींमध्ये आहेत.

शुक्रवारी दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयात मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) तरतुदींनुसार आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे, अशा माहिती अधिकाऱ्यांनी दिली. हा खटला रिलायन्स पॉवरची उपकंपनी असलेल्या रिलायन्स एनयू बेस लिमिटेडच्या वतीने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एसईसीआय) कडून निविदा मिळवण्यासाठी सादर केलेल्या ६८.२ कोटी रुपयांच्या बँक हमीशी संबंधित आहे. कंपनी (रिलायन्स एनयू बेस) पूर्वी महाराष्ट्र एनर्जी जनरेशन लिमिटेड म्हणून ओळखली जात होती. चौकशीत असे आढळून आले की रिलायन्स ग्रुपच्या अधिकाऱ्यांना ही 'बनावट' बँक हमी आहे याची चांगली जाणीव होती. एसबीआयच्या 'बनावट' ईमेल आयडीवरून 'फसव्या' जाहिराती एसईसीआयला सादर केल्या जात होत्या आणि जेव्हा एसईसीआयला फसवणूक आढळली तेव्हा एसईसीआयने फसवणूक केल्याची माहिती दिल्यानंतर रिलायन्स ग्रुपने आयडीबीआय बँकेकडून खऱ्या बँक हमीची व्यवस्था केली, असे ईडीचे म्हणणे आहे.तथापि, एसईसीआयने नवीन बँक गॅरंटी स्वीकारण्यास नकार दिला, कारण ते देय तारखेनंतर सादर करण्यात आले होते. ◀*(वृत्तसंस्था)*

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

रविवार, ७ डिसेंबर २०२५

रोखठोक

दिनेश गुणे

भूमिका, भ्रम आणि संभ्रम...

केवळ राजकारणातच नव्हे आणि केवळ राज्य किंवा देशातच नव्हे, तर जगभरातील कुठल्या ना कुठल्या कोपऱ्यात सध्या जे काही सुरू आहे, ते पाहिले की एक गोष्ट नक्की पटते, ती म्हणजे, काळ मोठा कठीण आला आहे. इंग्लंड-अमेरिकेतील एखादी राजकीय उलथापालथ असो, एखाद्या देशात सुरू झालेली आणि शमलेली जेन-झी नावाच्या नव्या पिढीची नवआंदोलने असोत, एखाद्या देशात कोणा माथेफिरूने एखाद्या शाळेत, मॉलमध्ये किंवा भर रस्त्यात बेछूट गोळीबार करून निष्पापांचे क्रूर बळी घेणे असो, शेजारच्या श्रीलंकेतील किंवा बांगलादेशातील भयावह राजकीय समस्या असोत, रशिया-युक्रेन महायुद्ध असो किंवा महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाला आणि राजकारणाला दररोज मिळणारे नवे कंगोरे असोत. 'आपण बरे की आपले कुटुंब बरे' किंवा, 'माझे कुटुंब एवढीच माझी जबाबदारी' असे समजून सामान्य ज्ञानात भर घालण्यापुरतेच या प्रश्नांकडे पाहायचे ठरविले, तरी या सर्वांचा एकएकटा किंवा एकत्रित फटका थेट प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचतच असतो. महागाई, बेरोजगारी, अशा प्रश्नांचे वेढे आणखीनच घट्ट आवळायला लागतात. चहुबाजूंना समस्या, प्रश्न आणि प्रश्नांचाच महापूर आहे आणि सारे जण संभ्रमात सापडले आहेत. अशा समस्याग्रस्त वातावरणात एखाद्या प्रश्नावर बोलावे की न बोलावे असेही काहीसे शंकेचे काहूर सर्वांच्या मनात सुरू आहे. बोलावे तर काय बोलावे, बोलायचे तर कोणाच्या बाजूने किंवा कोणाच्या विरोधात बोलावे, न बोलावे तर कोणत्या प्रश्नावर न बोलावे किंवा मौनच बाळगावे हे समजणेही कठीण झाल्यामुळे, कोणत्या प्रश्नावर बोलावे, काय बोलावे अथवा कोणत्या प्रश्नावर काहीच न बोलता गप्प राहावे हे समजून घेण्यासाठीदेखील 'जाणकारां'कडेच अपेक्षेने पाहावे लागते. असे जाणकार मोजकेच असतात. कोणत्या प्रश्नावर कोणी कोणती भूमिका घ्यावी, याविषयी ते वारंवार मार्गदर्शन करत असतात. अर्थात, त्यांच्या मार्गदर्शनास मोठे महत्त्वही असते. तुमच्या आमच्यासारख्या सामान्यांच्या बाबतीत, कोणत्याही प्रश्नावर आपण आपल्याच मनाचा आवाज ऐकून अगदी प्रामाणिक भावनेने घेतलेली कोणतीही भूमिकादेखील बरोबरच असेल असे नाही असे वाटते आणि त्या भूमिकेवरील इतरांची पहिली प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आपण ती फार तर कुटुंबासमोर व्यक्त करतो. त्यावर इतरांकडून जेव्हा नापसंतीच्या भावना व्यक्त होतात, कधीकधी थेट खिल्ली उडविली जाते किंवा नाके मुरडली जातात, तेव्हा आपल्याच त्या भूमिकेस मुरडही घालून गप्पदेखील बसतो. या प्रक्रियेत, भूमिका घेणे, त्यावर व्यक्त होणे आणि इतरांस ती पटत नाही असे स्पष्ट झाल्यास गप्प बसणे या सर्व कृती म्हणजे त्या त्या प्रसंगानुसार घेतल्या जाणाऱ्या भूमिकाच असतात. आपली एखादी भूमिका कुटुंबातील सर्वांस पसंत पडली, तर मिळणाऱ्या नैतिक पाठिंब्याच्या जोरावर ती आपण कार्यालयातील सहकाऱ्यांसमोर, लोकल ट्रेनमधील सहप्रवाशांसमोर मांडतो आणि प्रवास संपेपर्यंत त्यावर घमासान चर्चादेखील घडवितो. त्यामुळे वाढणाऱ्या उत्साहाचा परिपाक म्हणजे, पुढे तीच भूमिका ट्विटर, इन्स्टा, फेसबुकसारख्या समाजमाध्यमावरही मांडतो. त्यावरील प्रतिक्रिया अजमावत राहतो. कधी उलटसुलट प्रतिक्रियांचा पाऊस पडतो, कधी चवताळलेले विरोधक आक्रमकपणे ट्रोलदेखील करतात, तर कधी कुणीच काहीच प्रतिक्रिया देत नाही. पण टीका करणे, आरोप करणे, नाराजी व्यक्त करणे किंवा कोणतीही प्रतिक्रिया देणे आणि कोणतीच प्रतिक्रिया न देता केवळ गप्प राहणे हीदेखील ज्याची त्याची भूमिकाच असते. म्हणूनच, आजकाल भूमिका हा केवळ वैयक्तिक मुद्दा न राहता, सामाजिक विषय झाला आहे. राजकारणातच नव्हे, समाजकारणात आणि कुटुंबकारणातही भूमिका घेणाऱ्याची किंवा न घेणाऱ्याची भूमिका व तसे करण्यामागची त्याची भूमिका हा अनेकांच्या औत्सुक्याचा मुद्दा ठरू पाहातो, तो त्यामुळेच!

म्हणूनच, भूमिका हा स्वत:च एक मोठा गमतीदार शब्द आहे. या शब्दाची आणि भूमिकेची असंख्य रूपे असतात. काही वेळा तर, गप्प बसणे हीदेखील एक भूमिकाच असते, हे बऱ्याचदा लक्षात येत नाही. भूमिकेचे दुसरे रूप म्हणजे, जाणकाराच्या भूमिकेत जाऊन, इतरांना भूमिका घेण्याचा सल्ला देणे हे होय! असे केल्याने, एखाद्या विषयावरील स्वत:ची भूमिका मांडली नाही, तरीही जाणकार म्हणून अल्पावधीत मान्यता मिळू शकते. असे जाणकार असा सल्ला कोणत्याही क्षेत्रातील कोणाही व्यक्तीस, समूहास अथवा थेट सरकारासही देऊ शकतात. 'एखाद्या प्रश्नावर गप्प राहू नका, भूमिका घ्या', असा सल्ला जगातील कोणत्याही सरकारला किंवा नेत्याला देण्यामागेही 'सल्लागाराची भूमिका'च असते. एखाद्या प्रश्नावर सल्लागाराने बजावलेली अशी भूमिकाही मोलाची ठरत असते. समाज माध्यमांवरील एखाद्या वादात उड्या घेऊन अनेक जण हिरीरिने आपापल्या भूमिका मांडताना अलिकडे दिसतात. या भूमिकांतून त्या त्या व्यक्तीच्या विचारांची ओळख होते आणि त्याच्यावर एक विशिष्ट शिक्काही बसतो. हा शिक्का त्याच्या राजकीय विचारसरणीची खिल्ली उडविणारा असतो, कधी अशाच भूमिकांमुळे समविचारी समाज-माध्यमकर्मींचे कोंडाळे तयार होऊन एक आभासी मंचावरील आभासी संघटितपणाचेही दर्शन घडते आणि अशा झुंडी विरोधी विचारांच्या कोणत्याही अशाच संघटितांवरही आक्रमकपणे हल्ले करू लागताना दिसतात. मग ते हल्ले परतवून लावण्यासाठी समोरची समविचारींची झुंड आक्रमकपणे दंड थोपटून शब्दयुद्धास तयार होते आणि समाज माध्यमांचे मंच म्हणजे विचारांची रणभूमी होते.

साहित्यिक हा समाजमनाचा आरसा असतो. तसे चित्रकार, पत्रकार, व्यंगचित्रकार असे अनेक जण समाजमनाचेच आरसे असतात. त्यामुळे या सर्वांनीच सध्याच्या काळात कोणती ना कोणती भूमिका घेणे गरजेचेच आहे. विशेषत:, कोणत्याही विषयावरील माध्यमांच्या भूमिकेकडे समाजाचे लक्ष लागलेले असते. कारण त्यातूनच, समाजातील

अन्य घटकांची भूमिका तयार होत असते. हे लक्षात घेता, या सर्वांनी काहीतरी भूमिका घेतली पाहिजे हे योग्यच असते. पण बऱ्याचदा, यातील अनेक जण गप्प बसण्याचीच भूमिका घेतात, तेव्हा या लोकांना भूमिका घ्या असे बजावण्याची भूमिका अशा जाणकारांनाच वठवावी लागते. कोणती भूमिका घ्यावी हा मात्र, प्रत्येकाचा आपापला विषय असतो. कोणताही समंजस माणूस समाजाने, नेत्याने किंवा देशाने कोणत्याही प्रश्नावर, म्हणजे, आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा नैमित्तिक यापैकी कशावरही, कोणती भूमिका घ्यावी असा सल्ला कधीच कुणाच्या माथी मारत नसतो. आपली भूमिका न मांडता, 'भूमिका घ्या' असा सल्ला देण्याची भूमिका बजावणाऱ्या अशा जाणकारांकडे नेहमी सोबत एक 'गुलदस्ता' असतो. आपली भूमिका या गुलदस्त्यात (ताजी) राहील याची काळजी घेणे हीदेखील एक 'प्रासंगिक भूमिका'च असते... असा प्रकार विशेषतः राजकारणात दिसतो. कारण, राजकारणातील कोणावरही कोणत्याही प्रश्नावरील एखाद्या भूमिकेत सातत्य राखण्याचे बंधनकारक नसते. उलट, त्या त्या वेळी, त्या त्या परिस्थितीनुरूप विचार करून प्रासंगिक भूमिका घेणारेच यशस्वी ठरतात, असेही दिसून येते. कारण, जनतेची, म्हणजे समाजाची स्मरणशक्ती अल्पजीवी असते यावर राजकारणाचा नितांत विश्वास असतो. जनतादेखील कधीकधी त्या विश्वासास बळ देणारी भूमिका घेत असते. तीदेखील बहुतांश वेळा प्रासंगिकही असते. राजकारणातही आभासी मंचावरील झुंडींप्रमाणे, प्रत्यक्ष समविचारी म्हणविणाऱ्यांच्या झुंडीदेखील असतात. त्या झुंडी ज्या कोणाकडे आपला नेता म्हणून पाहात असतात, त्याची भूमिका ही त्या झुंडींची भूमिका असते. त्यामुळे, एखाद्या राजकीय पक्षाचा निष्ठावंत किंवा अनुयायी किंवा मतदार म्हणविणाऱ्यास त्याची स्वत:ची भूमिका ठरविण्याचे मानसिक दडपण सहसा येत नाही. आपण ज्या नेत्याच्या भूमिकेस पाठिंबा देतो, त्या नेत्याची प्रासंगिक भूमिका ही त्या त्या वेळी त्या अनुयायांची भूमिका असते. असे झाल्याने, आपल्या नेत्याची अगोदरची भूमिका कोणती होती आणि आता प्रसंगानुसार त्याने घेतलेली नवी भूमिका कोणती याचा विचार करण्याचे कष्ट घेण्याची त्यास कधी गरज भासत नाही.

अशा प्रासंगिक भूमिका घेण्यात महाराष्ट्राचे राजकारण वाकबगार आहे. राज्यातील काही नेत्यांनी प्रासंगिक भूमिका घेतच राजकारणात अनेक दशकांच्या वाटचालीचे टप्पे यशस्वीपणे पार केले आहेत. तर काही नेत्यांना आपली स्वत:ची कोणतीच भूमिका न घेता, समोर येणाऱ्या परिस्थितीनुसार कोणत्याही वेळी कोणतीही भूमिका घेण्यातच आनंद वाटतो. विशेष म्हणजे, ठाम भूमिका, स्पष्ट विचार आणि योग्य राजनीती या त्रिसूत्रीनुसार एका विचाराशी बांधिलकी मानून त्या विचाराशी सुसंगत अशी भूमिका घेणाऱ्यापेक्षाही, प्रासंगिक भूमिका घेत वाऱ्याच्या दिशेचा अंदाज घेत पाठ फिरविणाऱ्यांच्या भूमिकेचे अधिक कौतुक होते. गेल्या दशकभराच्या राजकारणाकडे पाहिल्यास, अशा प्रासंगिक भूमिका घेणाऱ्यांच्या राजकारणाचे सोने झाले असे म्हणता येते. आता नव्या राजकीय परिस्थितीनुसार नव्या भूमिका घेण्याचा आपला अधिकार अबाधित ठेवून नवी भूमिका घेण्याचीही त्यांची तयारी असते. म्हणूनच, राजकारणातील अशा भूमिकांकडे सर्वांचे लक्ष लागलेले दिसते. कोणतीही भूमिका न घेता गोंधळलेल्या मानसिकतेतून काहीतरी करत राहणे हीदेखील एखाद्याची भूमिकाच वाटावी एवढ्या बेमालूमपणे मानसिक गोंधळही साजरा करण्याची भूमिका घेणाऱ्यांचेदेखील वारेमाप कौतुकही होताना दिसते.

मुळात, कोणत्याही प्रश्नावर काही ठाम भूमिका घेण्यासाठी, त्या संबंधित प्रश्नाची सखोल जाण असणे गरजेचे असते, यावर प्रासंगिक भूमिका घेणाऱ्या कोणाचाही विश्वास नसतो. त्यामुळे, त्या त्या प्रसंगात आपण नेमके कोणत्या स्थानी आहोत, याचा विचार करून त्या स्थानाशी सुसंगत अशी भूमिका घेऊन प्रसंग साजरा करण्यावर त्यांचा भर असतो. आपल्याला साखरेच्या राजकारणातले काही कळत नाही, कारण साखरेचा आणि आमचा संबंध केवळ चहात वापरण्यापुरताच असतो असे सांगत महाराष्ट्राच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काहीच कळत नसल्याची प्रांजळ कबुली देऊन उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असतानाही शेतकऱ्यांची मने जिंकली होती. अर्थसंकल्पातले काही कळत नाही, सत्तेवर असताना अर्थसंकल्पाचे कौतुक करायचे आणि विरोधात असताना टीका करायची एवढेच आपल्याला माहीत आहे, असे सांगून त्यांनी प्रासंगिक भूमिका म्हणजे काय तेही दाखवून दिले होते.

विशेषत:, २०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदाच्या वादातून त्यांनी भाजपसोबतची युती तोडून महाविकास आघाडीत प्रवेश केल्यानंतर पक्षाच्या वैचारिक भूमिकेतून केलेले संपूर्ण घूमजाव हा तर राजकीय कोलांटउडीचे ढळढळीत उदाहरणच ठरले. हिंदुत्वाच्या मुद्यावर राजकारण करणे ही आपल्या पक्षाची चूक होती, अशी कबुली देत महाविकास आघाडीवर प्रभाव असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या भूमिकेशी जुळवून घेत उद्धव ठाकरे यांनी भूमिका बदलाचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्यानंतरही, २०२२ मधील शिवसेनेतील मोठ्या फुटीनंतर नव्या परिस्थितीनुरूप नव्या भूमिका घेण्याची वेळ त्यांच्या राजकारणावर ओढवली आणि काही भूमिकांमुळे त्यांच्या राजकारणास माघार घेणेही भाग पडले. विधानसभेच्या निवडणुकीआधी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवा आणि जाहीर करा असे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ठामपणे बजावणाऱ्या ठाकरे यांच्या भूमिकेस काँग्रेस आणि शरद पवार यांनी कोणताच प्रतिसाद दिला नाही हे पाहून त्यांना त्या वेळी ती भूमिका गुंडाळणे भाग पडले होते. याच महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी आपल्या 'लोक माझे सांगाती' या आत्मचरित्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीवर तिखट टीका केली तरीही आघाडीला तडा जाऊ नये अशी भूमिका घेत ठाकरे यांनी त्यावर मौन पाळण्याची भूमिका घेतली.

मौनाची भूमिका अनेकदा शाब्दिक भूमिकेहूनही प्रभावीपणे बोलकी ठरते, असे राजकारणात दिसते. एखाद्या प्रश्नावर कोणतीही एखादी स्पष्ट भूमिका घेतल्याने, धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशी स्थिती ओढवण्याची शक्यता दिसत असेल, तर अनेकदा मौनाची भूमिका घेणे पसंत केले जाते. या मौनाच्या भूमिकेचे अनेक प्रकार असतात. सूचक मौन हा त्यापैकी सर्वांत सोपा आणि सर्वांच्या लक्षात येणारा प्रकार असतो. एखाद्या प्रश्नावर काहीच न बोलता मौन पाळले तर माध्यमांकडून त्यास सहसा सूचक मौन असे म्हटले जाते. या मौनाच्या भूमिकेमुळे अडचणीच्या प्रसंगातून सहीसलामत मोकळे होणे सोपे होते. काही वेळा मौनाच्या भूमिकेला हास्याची जोड दिली जाते. एखाद्या प्रश्नावर काहीच न बोलता केलेल्या केवळ सूचक हास्यातूनही भूमिका स्पष्ट होते आणि तरीही त्यापासून वेळप्रसंगी नामानिराळे होण्याचा मार्गही मोकळा ठेवता येतो. शरद पवार यांच्या भूमिका हा एक गमतीदार मुद्दा महाराष्ट्रात गेल्या पाच-सहा दशकांपासून चर्चिला जात असतो. त्यांच्या बदलत्या भूमिका हाच त्यांच्या राजकारणाचा गाभा आहे, असेही म्हटले जाते. कधी त्यांची भूमिका संभ्रमात टाकणारी वाटते, तर कधी त्यांच्या भूमिकेतून संघर्षाच्या तयारीची चाहूल लागते. कधी ते एखाद्याच्या विरोधाची भूमिका घेतात, तर कधी ज्याच्या विरोधाची भूमिका घेतली त्याच्यावरच स्तुतिसुमने उधळून लोकांना संभ्रमातही टाकतात. कधी एखादी भूमिका ठामपणे मांडल्यानंतरही, नंतर त्याचा ठाम इन्कार करून मी असे बोललोच नव्हतो, असे सांगत त्याचे खापर माध्यमांच्या माथीही मारण्याची कला काही नेत्यांना अवगत असते. त्यामुळे नेत्यांच्या भूमिका हा वेळोवेळी अभ्यासावा असा विषय आहे. पण तो सोपा नाही. तसा अभ्यास करावयाचा असेल, तर आपल्या भूमिका बाजूला ठेवून त्यांच्या भूमिकांकडे लक्ष द्यावे लागते. आता महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा हंगाम सुरू आहे. पुन्हा युती, आघाडीच्या राजकारणाचे वेगळे संकेत मिळत आहेत. नेत्यांच्या स्थायी भूमिका आणि प्रासंगिक भूमिका पडताळण्यासाठी हा सर्वांत चांगला हंगाम असल्याने, भूमिकांचा अभ्यास करणाऱ्यांकरिता ही एक चांगली संधीदेखील आहे.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

भविष्यात पैशाचे महत्त्व शून्य आणि काम ऐच्छिक ठरेल

आर्टिफिशियल इंटेलिजेन्सची संकल्पना प्राचीन काळापासूनची असून यात अनेक कथांचा देखील समावेश आहे. एआयचा औपचारिक अभ्यास हा २० व्या शतकात सुरू झाला. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी सर्वात प्रथम डार्टमाऊथ कॉन्फरन्समध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजेन्स' ही संकल्पना वापरली. येथूनच एआयच्या अभ्यासाला सुरुवात झाली. एआयच्या विकासातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५० मध्ये ॲलन ट्युरिंग यांनी केलेली ट्युरिंग चाचणी. ही चाचणी मशीनची बुद्धिमत्ता क्षमता ही मानवी वर्तनाच्या तुलनेत वेगळी नसते हे स्पष्ट करते. येथूनच, भविष्यातील एआय संशोधन आणि विकासाचा पाया घातला गेला. रोबोटिक्सचे भविष्य खूप महत्त्वाचे आहे, कारण ते मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित बनवेल. रोबोट्स आता केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाहीत, तर ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अधिक स्वायत्तपणे विचार करतील, शिकतील आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेतील. यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन आणि वाहतूक यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या रोबोटिक्स बाजारपेठांपैकी एक आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या आकडेवारीनुसार २०२१ ते २०२४ पर्यंत भारतात रोबोट स्थापनेत सुमारे ८४ टक्के वाढ झाली. वार्षिक औद्योगिक-रोबोट स्थापनेच्या बाबतीत भारत आता जगातील सहाव्या क्रमांकाचा देश आहे. २०२५ मध्ये रोबोटिक्सचे भविष्य हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. कारण या क्षेत्राने सिद्धांताच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अवलंबनात प्रवेश केला आहे.

पुढच्या १०-२० वर्षात एआय आणि रोबोटिक्स इतके प्रगत होतील की जगातील बहुतेक कामं ही मशीन्स करतील. लोक इच्छा असेल तरच काम करतील. जेव्हा मशीनच सर्व गरजा विनामूल्य किंवा अतिशय स्वस्तात पूर्ण करू लागतील, तेव्हा सध्याची चलनव्यवस्था आणि पैशाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होईल. तुमच्या खिशातला पैसा, नोटा आणि बँक कार्ड्स भविष्यात कदाचित काहीही कामाचे राहणार नाहीत. एआय आणि रोबोटिक्स झपाट्याने विकसित झाल्यास पैसा हे फक्त औपचारिक साधन राहील. कारण एआय आणि रोबोटिक्स इतक्या वेगाने प्रगत होतील की, उत्पादनासाठी मानवशक्ती किंवा मोठ्या संसाधनांची गरजच उरणार नाही. भविष्यात ऊर्जा हीच खरी करन्सी ठरू शकते. ऊर्जा ही उत्पादनाची मूळ ताकद असल्याने तिचे महत्त्व पैशापेक्षा जास्त होईल. एलन मस्क यांनी स्कॉटिश लेखक इयान बँक यांच्या कल्चर सीरिजचा दाखला देत एका अशा समाजाचे वर्णन केले आहे की, जिथे काहीच कमी नसते आणि पैसा अस्तित्वातही राहत नाही. सोलर पॉवर्ड एआय आणि स्पेसमधून ऊर्जा मिळवणाऱ्या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अशी दुनिया वास्तवात उतरण्याची शक्यता व्यक्त केली. जग जसं पुढे चाललं आहे, तसं जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात पैसा नाहीसा होईल. नोकऱ्या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच खऱ्या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणाऱ्या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोक कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील.

टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या असे रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. या प्रणाली विकसित होताना मानवी जीवनातील आर्थिक संघर्ष पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मानवांना काम करायचे की नाही हे निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा रोबोट सर्व कामे हाती घेतील तेव्हा सरकारला युनिव्हर्सल हाय इन्कम प्रदान करावे लागेल, जे साध्या मूलभूत उत्पन्नापेक्षा खूप जास्त असेल. येत्या काळात हा बदल अधिकाधिक स्पष्ट होईल.

सुनील शिरपुरे/७०५७१८५४७९

●● ●●

रील ते रिअल

माणसांच्या सभ्यतेचा काळ सांगा किंवा कोणत्या काळात माणसं सभ्य होती याचं उत्तर आपल्याला मिळू शकणार नाही. तसंच मीडियाचा स्तर कुठल्या थरापर्यंत सोशल आणि सभ्य आहे यालाही उत्तर नाही. कुठल्याही गोष्टीचे फायदे आणि तोटे असतात. त्या फायद्यांचा अतिरेक झाला की तोटे सुरू झालेच म्हणून समजा. साध्या साध्या गोष्टींची आवड किंवा छंद म्हणून सुरू केलेला चाळा जेव्हा जीवघेणा ठरतो तेव्हा आवड ही व्यसन होते आणि विवेक नष्ट होतो. सध्या फार कॉमन झालेली गोष्ट म्हणजे समाजमाध्यमांवरची रील हा प्रकार. ह्यापायी अनेकांचे जीव गेल्याच्या बातम्या आपण रोज वाचतो.

अलिकडेच उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात मणिकर्णिका घाटावर कुटुंबासोबत आलेली एक महिला नदीच्या पाण्यात उभी राहून रील बनवत होती. तिचे कुटुंबीय समोरच उभे होते. रीलच्या नादात महिलेचा पाय घसरला आणि ती सगळ्यांच्या डोळ्यादेखत वाहून गेली. तिची मुलगी आई आई करून टाहो फोडत राहिली. यात लहान मुलांनी देखील जीव गमावला आहे. सोशल मीडियावरच्या लाईक्स आणि व्ह्यूज यासाठी लोक कोणत्या थराला जाऊ शकतात आणि त्याचे काय परिणाम होतात हे आपण बघतो, वाचतो. तसेच नवीन ट्रेंड म्हणजे या रील्सच्या नादात कोणत्याही वयातील स्त्री-पुरुष आनंदासाठी सामूहिक रील्स बनवतात. स्वानंदासाठी बनवून आपल्या गटापुरता मर्यादित ठेवून त्याचा आनंद घेतला आणि एंजॉय केले तसेच एक छान आठवण म्हणून जपून ठेवणे काही गैर नाही. परंतु चित्र विचित्र कपडे घालून विकृत अंगविक्षेप करून ती रील सर्वांसाठी समाजमाध्यमांवर खुली करणे आणि त्यात काही गैर न वाटणे हे फार हास्यास्पद आहे. मग त्यावर तितक्याच चावट कॉमेंटचे स्वागत करणे हे कुठेतरी खटकते. फिल्मी लोकांसाठी जेवढे ट्रोल होऊ तेवढे नाव होईल असे गणित असते. परंतु आता सामान्य जन देखील याला फसताहेत. वयस्क महिलाही याला अपवाद नाहीत. मनोरंजनाकरता आनंद घेणे हे ठीक आहे. परंतु नाचता येईना अंगण वाकडे असे अंगविक्षेप करून त्याच रील बनवणे म्हणजे पुढच्या पिढीला काहीही करण्याचे स्वातंत्र्य आहे असे सुचविणे आहे. एकदा एका कार्यक्रमात एका व्याख्यात्यांनी कार्यक्रमाची सुरुवातच या रील्सच्या दलदलीला कोणीतरी आवरा रे अशीच केली होती. एक सेलिब्रिटी तर आपल्या आधीच्या कारकीर्दीचा, पांढऱ्या केसांचा विचार न करता अश्लील अंगविक्षेप करून रील्स वर रील्स टाकत होता आणि टीकेच्या झोडीला पात्र झाला. एवढे वर्ष कमावलेला आदर आणि कौतुकाची जागा टीकेने घेतली. स्वत:करिता केलेल्या छंदाचे बाजारीकरण कशासाठी? संस्कृती, कला, नृत्य, साहित्य, वैश्विक ज्ञान आणि बरंच काही चांगलं शिकविणारे समाजमाध्यम म्हणजे आज कित्येकांच्या उपजीविकेचे साधन झाले आहे. परंतु काही वेळा आपली सद्सदविवेकबुद्धी गहाण ठेवून त्याचा अतिरेक केला तर अपचन होईल आणि आपण भलत्याच अडचणीत सापडू. डिजिटल अरेस्टसाठी गुन्हेगार टपूनच बसले आहेत. ते आपल्याला ब्लॅकमेल करू शकतात. नको तिथे बोलायचे, व्यक्त व्हायचे, सोशल मीडियावर आपले ज्ञान पाजळायचे आणि जिथे संयमाने वागायचे तिथे वाद घालत बसायचे, कुणी आपल्याला किती आणि का सहन करायचे? या मागे सोशल मीडियाला नावे ठेवण्याचा हेतू मुळीच नाही. परंतु त्यावर किती सोशल राहायचे हे ठरविणे आवश्यक आहे.

स्नेहल प्रकाश खंडागळे/नागपूर

●● ●●

जबाबदारांचे बेजबाबदार वर्तन...

आमच्या काळी असं होतं. आमच्या काळी तसं होतं. छान वारं वाहत होत. थंडी खूप पडत होती. आता पहिलेसारखं काही राहिलं नाही. सगळं काही बदललं आहे. अशा प्रकारची अनेक विधानं बरेच ठिकाणी ऐकू येतात. पण काळजीपूर्वक पाहिलं तर निसर्ग अजूनही आहे तसाच आहे. ऋतुचक्राचं त्याचं भान अजूनही टिकून आहे. ठरावीक दिवसापासून पानगळ होणार म्हणजे होणार. झाड निष्पर्ण होणार. ठरावीक तारखेपासून दिवस लहान-मोठा होणार. सांगण्याचे तात्पर्य तो अजून तसाच आहे, आपण मात्र फार बदललो.

सुशिक्षित लोकांनी केलेला कचरा अशिक्षित माणसे उचलतात ही फार मोठी शोकांतिका आहे. आम्हाला कचरा फेकायचं भानच नाही. ओला कचरा, सुका कचरा या गोष्टी तर फार दूर राहिल्या. मागील काही दिवसात मी दोन लग्नकार्यात उपस्थित होतो. एका लग्नात चहा, कॉफी, पाणी पिण्यासाठी सर्रास डिस्पोजेबलचा वापर सुरू होता. दुसरीकडे छान काचेचे प्याले थंड गरम सगळं पिण्यासाठी उपलब्ध होते. साध्या अक्षता देण्यासाठी जाडजूड प्लॅस्टिक त्याला अजून एखाद आवरण काढता काढता मुश्किल. दुसरीकडे छान कापडी पिशवीत अक्षता दिल्या होत्या. सगळं काही सोईस्कर आणि सुटसुटीत. दोन टोपल्या हातावर अक्षता देणं हे तर अतिउत्तमच म्हणावं लागेल. लग्न झाल्यानंतर वधू-वरांच्या अंगावर जे उडवलं जातं ते प्लॅस्टिक पुन्हा गोळा होत नाही. इकडून तिकडे वाऱ्यासोबत छान गावभर फिरत असत. त्याने सांगितलं उडवायचं आणि आपण उडवायच. त्या ऐवजी फुलांच्या पाकळ्या किती छान पर्याय उपलब्ध आहे. निसर्गातूनच घ्यायचं निसर्गालाच द्यायचं. थोडासा विचार जर का चांगला निसर्ग अनुभवलेल्या पिढीने केला तर अजूनही आपण बरंच शहर, हवा सगळं काही स्वच्छ करू शकतो. फक्त आपली इच्छा पाहिजे. थोडासा आग्रह पाहिजे. संघाने पर्यावरण विषयाला हात घातला आहे. ते समजून आपण तसा आग्रह धरला पाहिजे. तरच पुढील पिढीसाठी हवा ही शुद्ध राहील. पाणीही स्वच्छ राहील. कॅन्सरच्या दवाखान्यातील गर्दीही आटोक्यात राहील. या सगळ्या गोष्टींचे वाईट अनुभव येण्यास सुरुवात झालेली आहे. हा बदल मी करणार आणि माझ्यापासूनच करणार. सगळे करतात पण ते चुकीचं आहे हे मला कळलं पाहिजे. एकट्याने काय होणार हा प्रश्न पडतात कामा नये. खारुताईच्या गोष्टीप्रमाणे आपल्याकडे लक्ष आहे देवाचं. सगळं काही भरभरून देणाऱ्या निसर्गाचं थोडंसं भान आपण ठेवावं. या सुंदर बागेला हृदयातून जपावं.

बाबा देशपांडे/ ९४२३६१३२२६

प्रासंगिक

वैभव डांगे

भारतातील ताज्या जीडीपी वाढीचा वेग

भारताचा अलिकडचा त्रैमासिक जीडीपी आकडा- सरकारी अंदाजानुसार ८ टक्क्यांपेक्षा जास्त- पुन्हा एकदा जागतिक निराशावाद्यांना सौम्य पण स्पष्ट संदेश देतो. भारताची अर्थव्यवस्था मेल्याची अफवा फारच अतिशयोक्त होती. जगातील अनेक मोठ्या अर्थव्यवस्था मंदीच्या काठावर चालल्या असताना आणि भू-राजकीय अनिश्चितता जागतिक व्यापारात धुंदी माजवत असताना, भारताने केवळ वाढीचा वेग कायम ठेवला नाही, तर त्यात थोडेसे 'टर्बोचार्जर'ही बसवले आहे.

या वाढीच्या केंद्रस्थानी आहे सरकारचा अविरत पायाभूत सुविधांवरील भर. अलिकडच्या बजेटमध्ये सार्वजनिक भांडवली खर्चात ३० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली असून त्याचा परिणाम आता अर्थव्यवस्थेत स्पष्टपणे दिसतो. राज्यांमध्ये धावणारे नवे महामार्ग, नवीन विमानतळ, रेल्वे आधुनिकीकरणाची विक्रमी गती, बंदर क्षमता वाढ आणि मालवाहतूक मार्गांचे जाळे- यांनी बांधकाम, लॉजिस्टिक्स आणि संबंधित क्षेत्रांना नवसंजीवनी दिली आहे. जागतिक पुरवठा शृंखला आजकाल थोड्या संवेदनशील किशोरवयीन मुलांप्रमाणे- अनपेक्षित, भावनिक आणि लवकर बिघडणाऱ्या- वागत असताना भारताचा देशांतर्गत कॅपेक्सचक्र म्हणजे घरातील समजूतदार वडिलधारी व्यक्तीच ठरला आहे.

उत्पादनक्षेत्रानेही या तिमाहीत उत्तम कामगिरी केली. इलेक्ट्रॉनिक्स, ऑटो आणि फार्मा या क्षेत्रांच्या जोरावर उत्पादन क्षेत्रातील जीव्हीए वाढ चांगली राहिली. २ लाख कोटी रुपयांहून अधिकच्या पीएलआय योजनांनी कंपन्यांना उत्पादन वाढवण्यास प्रवृत्त केले आहे आणि जागतिक पुरवठा साखळीचे विविधीकरण भारताच्या बाजूने जोर धरत आहे. कारखान्यांमध्ये आता मंत्री येणार म्हणूनच दिवे लागतात असे नाही- खरंच काम सुरू आहे. क्षमता वापर ७४ टक्क्यांच्या वर गेला असून वस्तूंच्या किमती कमी झाल्याने उद्योगांना दिलासा मिळाला आहे.

आणि मग, जीएसटी सुधारांचा परिणाम. एकेकाळी जीएसटीमुळे अर्थव्यवस्था

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

नितीन मोहन चव्हाण वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	५५/२०२५	१) नितीन मोहन चव्हाण, वय-४३, धंदा-शेती, रा.चव्हाणवाडी (टें) ता. माढा जि. सोलापूर	१,२३,८२६	२६/१२/२०२५
२	५५/२०२५	२) हर्षवर्धन दत्तात्रय चव्हाण, वय-२८, धंदा-शेती, रा. चव्हाणवाडी (टें) ता. माढा जि. सोलापूर	१,२३,८२६	२६/१२/२०२५
३	५५/२०२५	३) रोहन सुभाष चव्हाण, वय-२५, धंदा-शेती, रा. इरिगेशन कॉलनी, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर	१,२३,८२६	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ते ३ यांची नोटीस पत्त्यावर नाहीत** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

भारत प्रभाकर गोडसे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	६२/२०२५	१) भारत प्रभाकर गोडसे, वय-५६, धंदा- हॉटेल, रा. तांबवे (टें) पो. सापटणे ता. माढा, जि. सोलापूर	९,१५,२७६	२६/१२/२०२५
२	६२/२०२५	३) राजेंद्र रामदास कुटे, वय-५३, धंदा-शेती, रा. भवानी नगर, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर	९,१५,२७६	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ व ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ३ ची नोटीस पत्त्यावर नाहीत** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

सुरज चंद्रकांत गायकवाड वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	६८/२०२५	१) सुरज चंद्रकांत गायकवाड, वय-३२, धंदा-ट्रान्सपोर्ट, रा. गायकवाड वस्ती, अकोले (बु) ता. माढा, जि. सोलापूर	८,६९,७५६	२६/१२/२०२५
२	६८/२०२५	२) सिध्देश्वर दिगंबर गायकवाड, वय-४५, धंदा-शेती, रा. गायकवाड वस्ती, अकोले (बु) ता. माढा, जि. सोलापूर	८,६९,७५६	२६/१२/२०२५
३	६८/२०२५	३) किरण बबन कदम, वय-४०, धंदा-शेती, रा. वेणेगाव (टें) ता. माढा जि. सोलापूर	८,६९,७५६	२६/१२/२०२५
४	६८/२०२५	४) धनाजी बलभिम गायकवाड, वय-३९, धंदा-शेती, रा. गायकवाड वस्ती, अकोले (बु) ता. माढा, जि. सोलापूर	८,६९,७५६	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १,२ व ४ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही व प्रवादी नं. ३ याने नोटीस घेण्यास नकार दिला** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

जितेंद्र बबन तांबिले वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	५६/२०२५	२) मंगेश विठ्ठल जाधव, वय-३३, धंदा- पान शॉप, रा. लोकरे वस्ती, शिराळ (टें) ता. माढा, जि. सोलापूर	१,०२,५८३	२६/१२/२०२५
२	५६/२०२५	३) सचिन कुमार स्वैन, वय-४९, धंदा-हॉटेल, रा. भिमानगर ता. माढा जि. सोलापूर	१,०२,५८३	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ व ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ व ३ यांची नोटीस अपुरा पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

विजय मधुकर जाधव वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	६४/२०२५	१) विजय मधुकर जाधव, वय-३२, धंदा-किरणा शॉप, रा. सरकारी दवाखान्याजवळ, टाकळी पो. आढेगाव ता. माढा जि. सोलापूर	२,६०,३८६	२६/१२/२०२५
२	६४/२०२५	२) आप्पासाहेब दादासाहेब घाडगे, वय-३७, धंदा-मेडीकल शॉप, रा. घाडगे वस्ती, टाकळी ता. माढा जि. सोलापूर	२,६०,३८६	२६/१२/२०२५
३	६४/२०२५	३) महेश सुरेश जाधव, वय-२९, धंदा-शेती, रा. सरकारी दवाखान्याजवळ, टाकळी, ता. माढा जि. सोलापूर	२,६०,३८६	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ते ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

शत्रुघ्न बळी मिस्कीन वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	७०/२०२५	१) शत्रुघ्न बळी मिस्कीन, वय-६५, धंदा-शेती, रा. मिस्कीन वस्ती, मिटकलवाडी ता. माढा जि. सोलापूर	२,१८,३३२	२६/१२/२०२५
२	७०/२०२५	२) अनिल अर्जून तांबिले, वय-५६, धंदा-शेती, रा. हरिनगर, बेंबळे ता. माढा जि. सोलापूर	२,१८,३३२	२६/१२/२०२५
३	७०/२०२५	३) भास्कर ज्ञानदेव सातपुते, वय-५१, धंदा-शेती, रा. चव्हाणवाडी (टें) ता. माढा जि. सोलापूर	२,१८,३३२	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ यांची नोटीस घेण्यास नकार व प्रवादी नं. २ ची नोटीस मुदतीत भेटली नाही व प्रवादी नं. ३ ची नोटीस पत्त्यावर नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

भाऊसाहेब रघूनाथ पावसे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	७१/२०२५	१) भाऊसाहेब रघूनाथ पावसे, वय-३५, धंदा-किराणा शॉप, रा. चांदज ता. माढा, जि. सोलापूर	१,३५,६८१	२६/१२/२०२५
२	७१/२०२५	२) अण्णासाहेब रघूनाथ पावसे, वय-३५, धंदा-शेती, रा. गावठाण, चांदज, ता. माढा, जि. सोलापूर	१,३५,६८१	२६/१२/२०२५
३	७१/२०२५	३) संतोष रामचंद्र लोंढे, वय-४१, धंदा-शेती, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, चांदज ता. माढा जि. सोलापूर	१,३५,६८१	२६/१२/२०२५
४	७१/२०२५	४) पांडुरंग ज्ञानदेव शिंदे, वय-३०, धंदा-पंक्चर शॉप, रा. गावठाण, चांदज ता. माढा, जि. सोलापूर	१,३५,६८१	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ व ४ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

संदिप बाबासाहेब अनपट वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	५८/२०२५	१) संदिप बाबासाहेब अनपट, वय-२६, धंदा-हॉटेल, रा. भोसले वस्ती, बेंबळे ता. माढा, जि. सोलापूर	१,४१,८२९	२६/१२/२०२५
२	५८/२०२५	२) बाबासाहेब रामदास अनपट, वय-६६, धंदा-शेती, रा. भोसले वस्ती, बेंबळे ता. माढा, जि. सोलापूर	१,४१,८२९	२६/१२/२०२५
३	५८/२०२५	३) मंगेश नितीन खटके, वय-२४, धंदा-शेती, रा. टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर	१,४१,८२९	२६/१२/२०२५
४	५८/२०२५	४) ऋषिकेश बाळासाहेब भोसले, वय-२०, धंदा-ट्रान्सपोर्ट, रा. भोसले वस्ती, बेंबळे ता. माढा, जि. सोलापूर	१,४१,८२९	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १,२ व ४ यांचा नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं.३ यांची नोटीस अपुरा पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

सोपान अजिनाथ वाघे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	६५/२०२५	१) सोपान अजिनाथ वाघे, वय-५४, धंदा-शेती, रा. अकलूज रोड, वाघे वस्ती, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर	३३,४९,८६५	२६/१२/२०२५
२	६५/२०२५	२) महेश महादेव कोकीळ, वय-५२, धंदा-व्यापार, रा. पोस्ट ऑफिसजवळ, शुक्रवार पेठ, टेंभुर्णी, ता. माढा जि. सोलापूर	३३,४९,८६५	२६/१२/२०२५
३	६५/२०२५	३) भारत अजिनाथ वाघे, वय-४७, धंदा-शेती, रा. अकलूज रोड, वाघे वस्ती, टेंभुर्णी, ता. माढा जि. सोलापूर	३३,४९,८६५	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ते ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

विक्रम संपत सावंत वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	६१/२०२५	१) विक्रम संपत सावंत, वय-३३, धंदा-हॉटेल, रा. महादेव गल्ली, टिळक रोड, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर	२,२१,०००	२६/१२/२०२५
२	६१/२०२५	२) नंदा संपत सावंत, वय-५२, धंदा-हॉटेल, रा. महादेव गल्ली, टिळक रोड, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर	२,२१,०००	२६/१२/२०२५
३	६१/२०२५	३) संजय सुभाष चव्हाण, वय-४८, धंदा-हॉटेल, रा. चव्हाणवाडी ता. माढा जि. सोलापूर	२,२१,०००	२६/१२/२०२५
४	६१/२०२५	४) सौरभ बाळासाहेब चव्हाण, वय-२९, धंदा-फायनान्स, रा. भोसले वस्ती, बेंबळे ता. माढा, जि. सोलापूर	२,२१,०००	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १,३ व ४ यांची पत्त्यावर नाहीत** या कारणाने **व प्रवादी नं. २ चे नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणारे परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

विरुध्द

जिवराज रामचंद्र क्षीरसागर वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	६६/२०२५	२) अमोल दिनकर कोथमिरे, वय-३७, धंदा-मोबाईल शॉपी, रा. वेणेगांव (टें) ता. माढा जि. सोलापूर	१५,५३,५३३	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्त्वाचे

वाराणसीमध्ये फिट इंडिया संडेज ऑन सायकल

वाराणसी : वाराणसीमध्ये फिट इंडिया संडेज ऑन सायकलची आगामी आवृत्ती भारताचे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०३० चे आयोजन साजरे करण्यासाठी असेल. काशीच्या कला, संस्कृती आणि क्रीडा उत्कृष्टतेचा वारसा पुढे नेत, या कार्यक्रमात पुढील काही कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात येणार आहे. वाराणसीच्या घाट आणि गल्ल्यांमधील उत्साही भावनेचे प्रतिबिंबित करणारे, या आवृत्तीत राष्ट्रीय स्तरावरील फिटनेस सत्रे, झुंबा, नृत्य आणि योग यांचा समावेश असेल, ज्यामुळे ते शहरातील सर्वात मोठ्या फिटनेस उत्सवांपैकी एक बनेल. शेकडो नागरिक, विद्यार्थी, सुरक्षा कर्मचारी आणि सांस्कृतिक उत्साही सहभागी होण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या मार्गदर्शनाखाली डिसेंबर २०२४ मध्ये सायकलवर फिट इंडिया संडे सुरू झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिटनेस का डोस, अधा घंटा रोज' आणि देशव्यापी 'लठ्ठपणाविरुद्ध लढा' या दृष्टिकोनाला ते बळकटी देत आहे. ■

रेल्वेकडून विदर्भाचा पराभव

लखनौ : सय्यद मुश्ताक अली चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत येथे खेळल्या गेलेल्या एलिट अ गटाच्या डे-नाईट साखळी सामन्यात विदर्भ संघाला रेल्वे संघाकडून ५ गड्यांनी पराभव पत्करावा लागला. विदर्भाचा सहा सामन्यातील हा चौथा पराभव आहे व ते ८ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. रेल्वे संघाचा कर्णधार कर्ण शर्माने नाणेफेक जिंकून विदर्भाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. रेल्वेने विदर्भाला मर्यादित २० षटकांत ५ बाद १७२ धावांवर रोखले. रेल्वेने १९.१ षटकांत ५ बाद १७६ धावा काढून आपला विजय साकार केला. विदर्भाच्या अध्ययन डागा (५५) व ध्रुव शोरीने (६८) अर्धशतकी खेळी केली. रेल्वेच्या अटल बिहारी राय व कर्ण शर्माने प्रत्येकी २ बळी टिपले.

रेल्वेला विजयाचे लक्ष्य गाठून देताना नवनीत विर्क (२९), उपेंद्र यादव (२१), आशुतोष शर्मा (३२) व रवी सिंगने (नाबाद ६८) भरीव योगदान दिले. कर्णधार कर्ण शर्माने नाबाद १० धावांची खेळी करत रेल्वेच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

संस्कार, मिथुनसह तन्वी अंतिम फेरीत

गुवाहाटी : संस्कार सारस्वत आणि मिथुन मंजुनाथने शनिवारी गुवाहाटी मास्टर्स बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सरळ गेम जिंकून अंतिम फेरीत धडक मारली. त्यामुळे यजमान देशाला सुवर्णपदक मिळण्याची आशा आहे. महिला एकेरीत उदयोन्मुख स्टार तन्वी शर्माने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत तन्वीने तिसऱ्या मानांकित हिना अकेचीला ४२ मिनिटांत २१-१८, २१-१६ असे दोन गेममध्ये हरवले. संस्कारने ३९ मिनिटांत इंडोनेशियाच्या डेंडी त्रियंस्याला २१-१९, २१-१९ असे पराभूत केले. त्यापूर्वी, मिथुनने ४२ मिनिटांत २२-२०, २१-८ असा विजय मिळवत आपल्या देशाच्या तुषार सुवीरला पराभूत केले आणि अंतिम फेरीत आपले स्थान पक्के केले.

पुरुष दुहेरीत, अव्वल मानांकित पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि साई प्रतीकने इंडोनेशियाच्या प्रसेत्य अँसेलमस आणि रमधन पुलुंग यांच्यावर ३८ मिनिटांत २१-१६, २२-२० असा विजय मिळवला आणि आता विजेतेपदासाठी मलेशियाच्या आरोन ताई आणि कांग खाई झिंग यांच्याशी सामना करावा लागेल. इतर ठिकाणी, अव्वल मानांकित रोहन कपूर आणि रुत्विका शिवानी गड्डे यांना मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत स्थान थोडक्यात हुकले. ■

महिलांच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा आजपासून

सोलापूर, ६ डिसेंबर-

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली महिलांच्या १ लाख बक्षीस रकमेच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस (एकेरी व दुहेरी) स्पर्धेचे आयोजन केले आहे. हि स्पर्धा ७ ते १२ डिसेंबर या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथील एम.एस.एल.टी.ए टेनिस सेंटरच्या मैदानावर सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत खेळविल्या जाणार आहेत . या स्पर्धेत देशभरतातून एकूण ५४ महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे आयोजन सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एस.डी.एल.टी.ए) केले आहे . या स्पर्धेचे उदघाटन रविवार दिनांक ७ डिसेंबर रोजी सकाळी ८. ३० वाजता आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर यांच्या हस्ते होणार आहे. पात्रता फेरीचे सामने रविवारी तर मुख्य फेरीचे सामने सोमवार पासून खेळविले जातील. या स्पर्धेसाठी पर्यवेक्षक म्हणून पुण्याच्या प्रवीण झिटे तर स्पर्धा संचालक म्हणून एम.एस.एल.टी.ए चे संयुक्त मानद सचिव राजीव देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे .

'एल.बी.पी.एम.' महाविद्यालयाच्या चार खेळाडूंची सोलापूर विद्यापीठ संघात निवड

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर -

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील ४ खेळाडूंनी आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघात स्थान मिळविले आहे.

व्हॉलीबॉल विद्यापीठ संघात शारदा बुक्या व प्रगती शिवपूजे यांची तर कबड्डी विद्यापीठ संघात ज्ञानेश्वरी खोसे व वैष्णवी राजमाने यांची निवड झाली आहे. हे संघ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे होणाऱ्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यासोबतच वैष्णवी खोसे हिने जिल्हा कबड्डी संघात स्थान पटकाविले आहे. या खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. भक्तराज जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या यशाबाबत रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्वामी विवेकानंद प्रशालेत क्रीडा सप्ताहास सुरुवात

सोलापूर, दि. ६ डिसेंबर -

नॅब संचलित स्वामी विवेकानंद प्रशाला एमआयडीसी येथे क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन शहर कुस्तीगीर परिषद उपाध्यक्ष प्रा.नरसिंह असादे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ. हणमंत नारायणकर होते. प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले . या क्रीडा सप्ताहात कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, तसेच थलेटिक्स स्पर्धा प्रशालेत घेण्यात येणार आहेत.

प्रमुख अतिथी प्रा. असादे यांनी मनोगतात क्रीडा स्पर्धांचे महत्व, खेळातील उत्तम संधी, खेळामुळे आरोग्य कसे उत्तम राहते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहशिक्षक उज्वला हिंगमिरे, संजय राठोड, गणपती कोळी, खंडू शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक सुभाष माने यांनी केले. मच्छिंद्र सपताळे यांनी आभार मानले.

दत्त प्राथमिक विद्यामंदिर व सोपल प्रशालेमध्ये क्रीडा सप्ताहाचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ६ डिसेंबर-

छत्रपती क्रीडा शिक्षण व समाजसेवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहन ठोंगे यांच्या वाढदिवसानिमित्त दोन्ही प्रशालेमध्ये क्रीडा सप्ताह आयोजन करण्यात होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटन करताना संस्थेच्या सचिवा सौ तेजस्विनीताई ठोंगे, बार्शी नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी बावकर, पर्यवेक्षक शिंदे यांच्या उपस्थित सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व कबड्डीच्या मैदानाचे उद्घाटन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. प्रस्ताविक दत्त प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे यांनी केले. प्रमुख पाहुण्याचे भाषणामध्ये बावकर यांनी शालेय परिसर,वातावरण पाहून आनंद झाला तसेच शाळेचा शैक्षणिक दर्जा उत्कृष्ट असल्याचे समाधान व्यक्त केले व संस्थेचे अध्यक्ष मोहन ठोंगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती संगीता काळे, श्रीमती अरुणा मठपती, श्रीमती ललिता चव्हाण, कसबे, शितल पाटील, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, चंद्रकांत लोखंडे, राहूल ठोंगे, संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संतोष ठोंबरे यांनी मानले.

रोटरी क्लब टेबल टेनिस स्पर्धेचे बक्षीस वितरण

सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

रोटरी क्लब सोलापूर आयोजित खुल्या टेबल स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ सोलापूर लॉन टेनिस संघटनेचे सचिव व ऑलम्पिक संघटनेचे सदस्य राजीव देसाई आणि सोलापूरची कन्या व भारतीय महिला अंध क्रिकेट विश्वविजेता संघाची उपकर्णधार गंगा कदम यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी रोटरी क्लब सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर, सचिव निलेश पोफलिया, सुनील मदन, झेड.एम. पुणेकर आदी उपस्थित होते.

विजयी व उपविजयी खेळाडू :

१२ वर्षे मुली - शिवानी सानप, आरोही पातेड. मुले - वीरेन माळवे अक्षित ऐनापुरे.

१७ मुली-वेदांकिता पाटील, अनुष्का रावत. मुले-राजवर्धन तिवारी. औधूत चौधरी.

महिला -अनुष्का रावत, वेदांकिता पाटील पुरुष- विनोद मगजी, श्रीकांत असावा.

महाराष्ट्र राज्य शूटिंग बॉलसंघाच्या कर्णधारपदी काझी

सतत आठव्यांदा पटकाविले राज्यकर्णधारपद

तभा वृत्तसेवा,
माळशिरस, दि. ६ डिसेंबर-

परभणी येथे झालेल्या राज्यस्पर्धेत सोलापूर जिल्ह्याच्या संघाने आक्रमक खेळ करीत संभाजीनगरच्या संघाला पराभूत करीत अजिंक्यपद पटकाविले .या जिल्ह्याच्या संघातून माळशिरसच्या अमीर काझी याची आठव्यांदा राज्य संघाच्या कर्णधार पदी तर विनायक नाळे याची राज्य संघात खेळाडू म्हणून निवड झाली

परभणी येथे ३९ व्या राज्यस्तरीय शूटिंगबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा संपन्न झाली.या स्पर्धेत सोलापूर जिल्हा पुरुष संघाने आक्रमक खेळ करीत अंतिम सामन्यात संभाजीनगर संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. संघात शोएब बेगमपुरे (कर्णधार), अमीर काझी, गणेश मोरे, फैजान इनामदार, अजय कांबळे, विनायक नाळे, अमन शेख, फरहान लालकोट, ओंकार चक्रनारायण, हीरो शेख, अफरोज काझी, यश वैजनाथ रब्बेवार या खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

जिल्हा संघाने ठाणे ,सांगली,संभाजीनगर या संघाना पराभूत करीत अजिंक्यपद पटकाविले या जिल्हा संघातील अमीर काझी याची राज्य संघाच्या कर्णधार पदी निवड करण्यात आली.तर उत्कृष्ट खेळ करून विनायक नाळे याने संघास विजेतेपद मिळवून दिले त्याची राज्य संघात निवड करण्यात आली .शुटींग बॉलची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माळशिरस मधील खेळाडूंची निवड झाल्याबद्दल सर्वस्तरातून कौतुक होत आहे.तसेच राज्य शुटींग बॉल संघटनेने यशस्वी खेळाडूंचे अभिनदन करून अखिल भारतीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

बीट शालेय स्पर्धेमध्ये सुळेवाडी जि. प. शाळेची कामगिरी

तभा वृत्तसेवा,
पिलीव दि. ६ डिसेंबर-

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे झालेल्या पिलीव बीट शालेय क्रीडा स्पर्धेत सुळेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेने कामगिरी केली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे गट शक्षणाधिकारी सुषमा महामुनी, शिक्षण विस्तार अधिकारी अस्लम इनामदार, केंद्रप्रमुख राजकुमार फासे मुख्याध्यापक नागनाथ शेटे, विनायक आर्वे, गणेश भंडारे श्री.गवळी व श्री. काटे यांनी अभिनंदन केले.

कामगिरी : सांघिक : प्रथम -खो-खो : लहान गट मुली, मोठा गट मुले, मोठा गट मुली,कबड्डी मोठा गट मुले, द्वितीय- खो-खो लहान गट मुले.

वैयक्तिक : धावणे : १०० मीटर धावणे, लहान गट -अंकिता शिंगुदेव दोलताडे (द्वितीय). २०० मीटर धावणे, लहान गट अंकिता शिंगुदेव दोलताडे (प्रथम). १०० व २०० मीटर धावणे : मोठा गट- सुजाता चंद्रकांत माने, आदित्य भागवत सुळे (प्रथम).

कुमार व मुली गटातून सोलापूर, सांगली व धाराशिव उपांत्य फेरीत

५१ वी कुमार व मुली गट राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी
खो-खो स्पर्धा : कुमार गटात पुणे व मुली गटात ठाण्याचीही घोडदौड

असे होणार उपांत्य सामने

कुमार गट : धाराशिव विरुद्ध पुणे, सोलापूर विरुद्ध सांगली.
मुली गट : धाराशिव विरुद्ध ठाणे, सोलापूर विरुद्ध सांगली.

तभा वृत्तसेवा,
अहिल्यानगर, दि. ६ डिसेंबर -

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुन्हाणनगर येथे सुरू झालेल्या ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत उपांत्यपूर्व सामन्यांचा थरार शिगेला पोहोचला आहे. कुमार गटात धाराशिव, पुणे, सांगली व सोलापूर संघानी तर मुलींच्या गटात धाराशिव, ठाणे, सोलापूर आणि सांगली या संघानी उपांत्य फेरी गाठत आपले वर्चस्व सिद्ध केले. सर्व सामने उच्च दर्जाची झुंज, रणनीती व जिद्दीचा उत्तम मिलाफ घडवणारे ठरले. येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत वेग, चातुर्य आणि मनोबळाची खरी परिक्षा पाहायला मिळाली.

उपउपांत्य फेरीच्या मुलांच्या पहिल्या सामन्यात धाराशिवने मुंबईवर १ डाव ३३ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. मध्यंतरासच धाराशिवकडे ५ ड्रिम रनसह ४२-६ अशी मोठी आघाडी होती. धाराशिवकडून जितेंद्र वसावे (३.४० मि. संरक्षण व ६ गुण), विशाल वसावे (३.०० मि. संरक्षण व ४ गुण) राज जाधव (२.२० मि. संरक्षण व तब्बल १६ गुण) यांनी तर पराभूत मुंबईच्या प्रसाद घाडीगांवकर (४ गुण) सामन्यात एकाकी कामगिरीची नोंद केली.

दुसऱ्या सामन्यात सोलापूरच्या धारदार आक्रमणामुळे ठाण्याचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आले. सोलापूरने ४ गुणांनी निसटता विजय मिळविला. सोलापूरकडून शंभुराजे चंदनशिवने १.४० मि. संरक्षण करून आक्रमणात १० गुण मिळवले. सुहान आत्तारने २.१० मि; सिद्धार्थ मानेने १.५० मि. तर अकबर शेखने २.३० मि. संरक्षण केले. ठाण्याच्या आशिष गौतमने दोन्ही डावात प्रत्येकी २ मि. संरक्षण करून आक्रमणात ८ गुण संपादन करून एक हाती लढत दिली. ओंकार सावंतने १ , १.१० मि. संरक्षण करून आक्रमणात ६ गुण मिळवले.

तिसऱ्या सामन्यात मध्यंतरातच २५-१२ अशी आघाडी घेणाऱ्या पुणे संघाने मुंबई उपनगर संघावर २६-२४ असा १ डाव २ गुणांनी मात केली. पुणे संघाकडून शंकर यादव १.४० व १.३० मि. संरक्षण आक्रमणात ८ गुण, श्री वसावेने १.२० व १.४० मि. संरक्षण केले. आदेश पाटीलने १.३० व १.५० मि. संरक्षण करताना आक्रमणात ४ गुण मिळवले. उपनगर संघाकडून अर्जुन सर्जेरावने १.०० मि. संरक्षण करीत आक्रमणात ४ गुण मिळवले.

चौथ्या सामन्यात सांगलीने सातारा संघाला ५०-२४ असे २६ गुणांनी पराभूत केले. विजयी संघाकडून अथर्व पाटीलने १.३० मि. पळतीचा खेळ करत ६ गुण मिळवले. गणेश परेकरने १.४०, २ मि. पळतीचा खेळ करत ६ गुण मिळवले. पार्थ देवकातेने १.३०, १.२० मि. पळतीचा खेळ करत १० गुण मिळवले. तसेच सातारा संघाकडून प्रेम लोखंडेने २ मि. खेळ करत २ गुण तर लोकेश जाधवने १.४० मि खेळ करत २ गुण आणि तबरेज खानने १.४० मि. खेळ करत ८ गुण मिळवले.

मुलींच्या उपांत्यपूर्व सामन्यात सोलापूरने साताऱ्यावर २९-२२ असा ५.२० मि. राखून ७ गुणांनी विजय मिळविला. सोलापूरकडून खेळताना स्नेहा लामकाने ५.१० व १२ गुण, अश्विनी मांडवेने १.३५ मि. संरक्षण व ४ गुण तसेच कल्याणी लामकाने हिने १.५०, १.४५ मि. संरक्षण व २ गुण मिळवले. साताऱ्या कडून संचिता गायकवाडने १.३०, १.४० मि. संरक्षण व ८ गुण मिळवले.

धाराशिव विरुद्ध रत्नागिरी या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात धाराशिव संघाने ३२-२७ असा ५ गुणांनी विजय संपादन केला. धाराशिव संघाकडून मैथिली पवारने ३.५०, ३.४९ मि. संरक्षण करत आक्रमणात १६ गुण मिळवले. सिद्धी भोसलेने १.१० मि. संरक्षण करत आक्रमणात ४ गुण मिळवले. राही पाटीलने १.४० मि. २.२० मि. संरक्षण करून दोन गुण संपादन केले. रत्नागिरीतर्फे सायली कर्लेकरने १.४०, १.२० मि. संरक्षण करत २ गुण, साक्षी लिंगायत १.४० संरक्षण करत २ गुण, श्रावणी सनगरेने १.१० मि., दिव्या सनगले १ मि. खेळ केला. आक्रमणात वैष्णवी फुटकने १० गुण, दिव्या पाल्येने ८ गुण तर तन्वी खानविलकरने ४ गुण मिळवले.

ठाणे विरुद्ध नाशिक या तिसऱ्या सामन्यात ठाणे संघाने १३ गुण आणि ४.३० मिनिटं राखून विजय मिळविला. ठाणे संघाकडून धनश्री कंकने ३.१० मिनिटे संरक्षण केले. श्रुती चोरमारेने २.५५ मि. संरक्षण करत आक्रमणात ४ गुण मिळवले. दीक्षा काटेकरने १.३० मि. संरक्षण करून सहा गुणांची कमाई केली. प्रणिती जगदाळेने २.१०, नाबाद २.३० मि. संरक्षण करून आक्रमणात दोन गुण मिळवले. नाशिक संघाकडून नीलम महाडकरने २.३०, १.१५ मि. संरक्षण करून आक्रमणात दोन गुण मिळवले.

चौथ्या सामन्यात सांगलीने पुण्याला १५-२९ असे १४ गुणांनी नमविले. सांगली कडून श्रावणी तामखडे हिने ३.३० मि. संरक्षण केले. धनश्री तामाखडेने २.५० मि. संरक्षण व आक्रमणात ४ गुण, चाफे सानिका २.५० मि. संरक्षण व आक्रमणात २ गुण तर कृत्तिका अहिरने ३.४० मि. संरक्षण व आक्रमणात २ गुण मिळवले. पुण्याकडून अपर्णा वर्धेने २.२० मि. संरक्षण, धनश्री लव्हाळने १.५० मि.संरक्षण व ४ गुण मिळवले.

बाजार समितीत गुळाचे दर ४ हजारांवर; गुळाचा गोडवा वाढला

मकर संक्रांती, श्री सिध्देश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर दर वाढण्याची शक्यता

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ डिसेंबर-

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुळाची आवक वाढत आहे. शनिवारी बाजार समितीत सुमारे ३५० डाग गुळाची आवक झाली. लिलावात प्रति १० किलोच्या गुळाच्या ढेपेला ४,००० ते ४,५०० रुपये पर्यंतचा घाऊक दर मिळाला. आगामी मकर संक्रांत आणि सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर गुळाची आवक आणखीन वाढेल, तसेच मागणी वाढून देखील दर वाढतील अशी शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, सोलापूर बाजार समितीत धाराशिव, लातूर तसेच बीड या मराठवाड्यातून गुळाची आवक होत आहे. तर सोलापूर शहर व जिल्ह्यातील स्थानिक बाजारपेठेत तसेच गुजरात आणि मध्य प्रदेश या राज्यामध्ये गुळाची विक्री होत आहे. गुराळची संख्या कमी प्रमाणात झाल्याने गुळ बनवण्याची प्रक्रिया मंदावली आहे. गतवर्षी याच महिन्यात पाच हजाराहून अधिक गुळाचे डाग विक्रीसाठी बाजार समिती दाखल झाले होते. परंतु यंदाच्या वर्षी आवक घटली आहे. येत्या आठवड्याभरात आवक आणखीन वाढेल, असेही यावेळी सांगण्यात आले. गुराळ बनवण्यासाठी कामगारांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु कामगारांचा तुडवडा असल्याने शेतकरी गुळ बनवण्याकडे प्राधान्य क्रमाने लक्ष देत नसल्याचे जाणवत आहे. यामुळेच सोलापूर जिल्ह्यात एकही गुराळ चालवला जात नाही. सर्व गुळ हा मराठवाड्यातून मागवला जातो. विशेषतः धाराशिव बीड आणि पुणे जिल्ह्यातील खेडेगावात गुराळ चालवले जातात. गुळ बनवण्याची प्रक्रिया लेंदी आणि खर्चिक असल्याने, त्याचा मोबदला मिळावा तितक्या प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे शेतकरी याकडे विशेष लक्ष देत नसल्याचेही यावेळी व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले.

गुळाची आवक वाढली

सोलापूर बाजार समितीत गुळाची आवक वाढत आहे. आगामी गड्डा यात्रा आणि मकर संक्रांती लक्षात घेता तिळगुळ तसेच शेंगाच्या पोळीसाठी गुळाची मागणी असते. त्यामुळे सध्या गुळाची मागणी वाढत आहे. सोलापूर बाजार समितीत गुळाला लिलावात कमीत कमी ३,५०० ते जास्तीत जास्त ४,५०० तर सर्वसाधारण ४,००० असा घाऊक दर मिळत आहे.

- संगमेश्वर बिराजदार,
गुळ व्यापारी बाजार समिती सोलापूर.

भविष्यात दर आणखीन वाढण्याची शक्यता

सण उत्सव यात्रा कालावधीत विविध खाद्यपदार्थ बनवण्यासाठी गुळाची आवश्यकता असते. अशातच मकर संक्रांतीला तिळगुळ आवश्यक असतो. त्यामुळे गुळापासून चिक्की, तिळगुळ आणि रेवड्या बनवल्या जातात. त्यासाठी घाऊक किरकोळ तसेच घरगुती गुळाची मागणी वाढवून दर वाढण्याची शक्यता आहे.

- आनंद दुलंगे,
गुळ व्यापारी बाजार समिती सोलापूर.

निमगाव-गारवाड नवीन रस्त्यावर खड्डेच खड्डे

पिलीव, दि. ६ डिसेंबर- माळशिरस तालुक्यातील निमगाव ते गारवाड हा रस्ता राज्य मार्ग असून या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे २०२३ व २०२४ मध्ये झाले. निमगावपासून ७ किलोमीटर पर्यंत रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून गारवाड, चांदापुरी ,तरंगफळ, पठाणवस्ती आदि गावाला जाणारा प्रमुख रस्ता आहे. या परिसरात ऊसाचे क्षेत्र मोठे असल्याने ऊस वाहतुक मोठ्याप्रमाणात आहे. शाळेत जाणारी मुले व ग्रामस्थांसाठी या रस्त्यावरून प्रवास करणे धोकादायक आहे. अकलूज येथील बांधकाम विभागाकडे याबाबत रितसर तक्रार देऊनही आधिकारी याची दखल घेत नाहीत. सबंधीत ठेकेदाराने या याची देखभाल करणे गरजेचे असताना ते करीत नाहीत. नवीन केलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट पध्दतीने झाल्याने बांधकाम खात्याविरूध्द ग्रामस्थांनी अंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	कर्जाचे प्रकार	कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	कलम १३ (२) सूचना तारीख	कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम
1	१४७३९१३८९	मालमत्ता तारण कर्ज	१. आकाश विठ्ठल मोरे २. पपिता विठ्ठल मोरे	२६.११.२०२५	रुपये ८,५०,५४९.०४/-
मालमत्तेचा पत्ता: ग्रामपंचायत मिल्कट नंबर ८५८ चे सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण २५०० चौ. फूट. गावात वसलेले: चिकमहुड, ग्रामपंचायतीच्या हद्दीत चिक महुद, उप-विभाग: सांगोला, दि: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०६, आणि सीमा: पूर्व: रामचंद्र मोरे पश्चिम: रामचंद्र मोरे दक्षिण: पोपट रुपनर उत्तर: रस्ता					
2	१४५५०५२०३	मालमत्ता तारण कर्ज	१. अतुल दत्तात्रय मोरे २. स्नेहा अतुल मोरे	१६.११.२०२५	रुपये ७,६८,१६१.९६/-
मालमत्तेचा पत्ता: ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ८६१, एकूण ९०० चौ. फूट क्षेत्रफळ असलेले सर्व मालमत्तेचे तुकडे आणि पार्सल, चिकमहुड गाव येथे स्थित, ग्रामपंचायत चिकमहुडच्या हद्दीत, तालुका: सांगोला, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०६, आणि सीमा: पूर्व: रस्ता पश्चिम: श्री. सागर मोरे उत्तर: श्री. नितीन मोरे दक्षिण: श्री. विष्णू मोरे					
3	१४८१०३४०९	मालमत्ता तारण कर्ज	१. तात्यासो मुरलीधर निंबाळकर २. मुरलीधर नामदेव निंबाळकर	२६.११.२०२५	रुपये ९,५९,६६८.६२/-
मालमत्तेचा पत्ता: ग्रामपंचायत मिल्कट क्र. २/२ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण ४२०० चौ. फूट., गाव येथे वसलेले: बलवडी, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: बलवडी, उप-विभाग: सांगोला, दि: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०८ पूर्व: संतोष पांडुरंग निंबाळकर पश्चिम: गणेश कृष्णदेव निंबाळकर उत्तर: खवजेवाडी ते बलवडी रोड दक्षिण: पोपट दत्तात्रय शिंदे					
4	१५६३६१४०८	मालमत्ता तारण कर्ज	१. विशाल दगडू चव्हाण २. वैष्णवी विशाल चव्हाण	२६.११.२०२५	रुपये ९,७१,५५३.५५/-
मालमत्तेचा पत्ता: ग्रामपंचायत मिल्कट क्र. ११९/२ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण ३६०० चौ. फूट., गावात वसलेले: येलमार मांगेवाडी, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: येलमार मांगेवाडी, उप-विभाग: सांगोला, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०७, आणि सीमा:- पूर्व: बाबासाहेब मल्हारी जाधव उत्तर: दशरथ सीताराम चव्हाण पश्चिम: जव्हाण रोड, दक्षिण रोड					

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : ०७/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

निधन वृत्त...

पद्मिनी इंगळे

पिलीव, दि. ६ डिसेंबर-
माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती हद्दीत पद्मिनी शंकरराव इंगळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले .त्या ८९ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त वन परिमंडळ अधिकारी शिवाजीराव इंगळे यांच्या मातोश्री होत.

रुक्मिणी पाटील

सोलापूर, दि. ६ डिसेंबर-
रुक्मिणी विठ्ठल पाटील (रा.तामदर्डी (बोराळे) ता. मंगळवेढा, जि.सोलापूर) यांचे दि. ५ डिसेंबर रोजी वयाचा ८० व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. मुख्यमंत्री कार्यालयातील कार्यकारी अधिकारी कृष्णात अशोक पाटील यांच्या त्या आजी होत.

विद्याधर कांबळे

माळशिरस, दि. ६ डिसेंबर-
येथील विद्याधर कांबळे (वय २९वर्षे) यांचे हुदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई,वडील, पत्नी, भाऊ, दोन मुले,एक मुलगी असा परिवार आहे. ते येथील भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत होते.

जयश्री पल्ली

सोलापूर, दि. ६ डिसेंबर-
दत्तनगर येथील रहिवासी जयश्री उमाकांत पल्ली (वय ७६) यांचे शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसस्कार करण्यात आले.

डॉ.दिलीपकुमार इंगवले

सांगोला,दि.६ डिसेंबर -
शिक्षण आणि कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार मच्छिंद्र इंगवले (वय- ६८) यांचे शनिवार दि.६ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. डॉ.विजय इंगवले यांचे ते भाऊ होत. रविवारी सकाळी ११ वा. सांगोला स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास वीस वर्षांचा कारावास

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी विशेष न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी आरोपीस वीस वर्षे कठोर कारावास व वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

अंबादास लक्ष्मण गावडे (वय ३६ , राहणार मंद्रूप तालुका दक्षिण सोलापूर) असे शिक्षा झालेल्या चे नाव आहे. याबाबत पीडितेच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादी वरून मंद्रूप पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

यातील पीडिता ही तीन मे २०२० रोजी घरातून निघून गेल्याने तिचे नातेवाईक तिचा शोध घेत होती त्यावेळी पिडीता ही अंबादास गावडे यांच्या घरातून येताना दिसली त्यामुळे नातेवाईकांना संशय आल्यानंतर घरी आल्यानंतर त्यांनी पिडीतेला विश्वासात घेऊन विचारपूस केली त्यावेळी पिडीतेने सांगितले की अंबादास गावडे याने पीडीतेला घरात बोलावून तुझ्या घरच्यांना मारून टाकीन अशी धमकी देत तिच्याशी शरीर संबंध केली असे सांगितले असा प्रकार आरोपीने वारंवार केला असल्याचेही पिडीतेने सांगितले त्यामुळे याबाबत मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक गणेश पिंगूवाले यांनी आरोपीस अटक करून तपास केला व न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले याची सुनावणी विशेष न्यायाधीश सुरवसे यांच्यासमोर झाली साक्षीदारांच्या साक्षी व सरकारी वकिल शीतल डोके यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीश सुरवसे यांनी आरोपी गावडे यास वीस वर्षे कठोर कारावास व वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याप्रकरणी सरकारच्या वतीने एडवोकेट शीतल डोके, ॲड. प्रकाश जन्नू यांनी काम पाहिले कोर्ट भैरवी म्हणून पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार जाधव, प्रिया जाधव, पोलीस शिपाई पूजा काळे,अनिता काळे यांनी काम पाहिले.

दादासाहेब रोंगे यांचे निधन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.६ डिसेंबर -
संत विचारपीठाचे सचिव, स्वेरीचे माजी अध्यक्ष आणि विद्यमान सदस्य तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त अधिकारी दादासाहेब रोंगे (वय ६३) यांचे शुक्रवारी रात्री दीड वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झालं. त्यांच्यावर खर्डी या त्यांच्या मुळगावी शनिवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाठीमागे पत्नी, एक विवाहित मुलगा, विवाहित मुलगी, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.

विवाहितेचा छळ; पाच जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर : माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी शिरीन सैफअली शेख (रा. उस्ताद अपार्टमेंट, बेगम पेठ) यांच्या फिर्यादीवरून पती सैफअली, सासरे फारुख, चाची सासू शैरून, चाचा सासरे अन्वर, रुईना शेख (सर्व रा. तेलंगी पाच्छा पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

पर्यावरण मंजुरी प्राप्त सूचना

लेवो केमी LLP हे प्लॉट क्रमांक F-19, MIDC - चिंचोळी औद्योगिक परिसर, चिंचोलिकाटी गाव, मोहोळ तालुका, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र येथे स्थित असून, त्यांनी पर्यावरण मंत्रालय, वन व हवामान बदल (MoEF&CC) यांच्याकडून पर्यावरण मंजुरी (EC) प्राप्त केली आहे. फाईल क्रमांक IA-J-11011/223/2022-IA-II(I) दिनांक ०५ सप्टेंबर २०२३. अधिक माहितीकरिता भेट द्या: www.parivesh.nic.in

लेवो केमी LLP तर्फे

श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर
श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड, सोलापूर, महाराष्ट्र
फोन नं. २३७४६७८

जा. न. प्रसिध्दीकरण/२६१३
दिनांक : ०६/१२/२०२५

जाहीर प्रसिध्दीकरण

श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूरच्या श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील भुसार बाजारातील ऑफिस ईमारतीच्या पश्चिमेकडील एक, ओपन स्पेस नं.२ च्या पश्चिमेकडील एक, प्लॉट नं. सी/४९ या दक्षिणेकडील एक ही तीन स्वच्छतागृहे आहे त्या स्थितीत चालविण्यास द्यावयाची आहेत.

तरी ज्यांना सदरची स्वच्छतागृहे चालविण्यास घ्यावयाची आहेत त्यांनी आपली दरपत्रके दिनांक २२/१२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयात सादर करावीत. सदर मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

कमी अगर जास्त दराचे कोणतेही दरपत्रक मंजूर अगर नामंजूर करण्याचा अगर रद्द करण्याचा अधिकार बाजार समितीने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देण्याची जबाबदारी बाजार समितीवर नाही.

सही/- सचिव
सही/- सभापती
श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः तालुका माढा पैकी मौजे कुर्डूवाडी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि माढा पैकी मौजे कुर्डूवाडी येथील सि.स.नं. २६६ याचे क्षेत्र २०८.00 चौ.मी., यासी चतुसिमा पुर्वेस- रस्ता, दक्षिणेस-विजयकुमार शहा, पश्चिमेस- प्रशांत शहा, व उत्तरेस- लक्ष्मीआईचे मंदीर व सि.स.नं. २७२, येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री आगरचंद कुशालचंद धोका, राहुल आगरचंद धोका, आनंद आगरचंद धोका, यांचे मालकी कब्जेवहिवाटीची आहे. आमचे अशिल सागंली अर्बन को. ऑप बँक लि. शाखा कुर्डूवाडी, ता. माढा, या बँकेकडे घरबाधंकामासाठी व इन्शुरन्स प्रीमीयरसाठी कर्जाची मागणी केली व आमचे अशिल पतसंस्थेने अटी व शर्तीवर र.रु. ४५,८०,000/- चे कर्ज मंजूर केले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालक श्री आगरचंद कुशालचंद धोका, राहुल अगरचंद धोका, आनंद आगरचंद धोका, यांनी दिलेला आहे. सदर कर्जास सदर मिळकत ही कर्जदार म्हणुन गहाणखत करुन देण्याची तयारी श्री आगरचंद कुशालचंद धोका, राहुल अगरचंद धोका, आनंद आगरचंद धोका यांनी घेतलेल्या कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत खरेदीखत, कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही कोणचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली आहे. ता. ०६/१२/२०२५

सही/-
ॲड. श्री. प्रसाद जा. कुलकर्णी
पॅनल ॲडव्होकेट
बी.एस.एल.एलएल.बी
पत्ता-लक्ष्मी नृसिंह, ७३०/२/४४/अ
सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी,
मो.नं. ९४२३३३२०४८

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नंबर २४०/१ यासी नविन सर्व्हे नंबर ३५/१ यापैकी करली नगर मधील प्लॉट नंबर ५३ यासी मिळकत नंबर ६८१४९९ याचे एकुण क्षेत्र ९२.९३ चौ. मीटर अथवा १000 चौ. फुट इतकी आहे. सदर जागेत लोडबेअरींग स्वरुपातील बांधकाम असून यात (४) चार खोल्या, संडास बाथरुम अंतर्भूत आहे. यातील लाईट व बोअर कनेक्शनसह.

यासी चतुः सीमा :-
पुर्वेस :- प्लॉट नं. ५४ दक्षिणेस :-प्लॉट नं. ५५
पश्चिमेस :-रस्ता उत्तरेस :-प्लॉट नं. ५१
येणेप्रमाणे चतुःसीमेतील मिळकत घरजागा.

ही मिळकत घरजागा अ. कादर मोदीनसाब शिपाई, रा.६२५, साखर पेठ, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही मिळकत घरजागा आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे, तरीही वर नमूद मिळकत संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, बारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०६/१२/२०२५

सही/-
ॲड. राजरतन द. श्रीराम
ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६
अशिलातर्फे

जाहीर नोटीस
ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
जालिंदर मच्छिंद्र उबाळे वगैरे -- जाबदार/प्रतिवादी

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	८०/२०२५	१) जालिंदर मच्छिंद्र उबाळे, वय-५७, धंदा- शेती व हॉटेल, रा. उबाळे वस्ती, रांझणी ता. माढा, जि. सोलापूर	६,८३,१२३	२६/१२/२०२५
२	८०/२०२५	३) गिरीष केरु लोभे, वय-५०, धंदा-किरणा दुकान, रा. भिमानगर ता. माढा जि. सोलापूर	६,८३,१२३	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ व ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ याची नोटीस बजावणीचा रिपार्ट आला नाही व प्रवादी नं. ३ याची नोटीस पत्त्यावर नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

जाहीर नोटीस
ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
योगेश नरहरी टोणपे वगैरे -- जाबदार/प्रतिवादी

अ. क्र.	लवाद अर्ज नंबर	प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
१	७९/२०२५	१) योगेश नरहरी टोणपे, वय-२८, धंदा-हॉटेल, रा. करमाळा रोड, कुटे वस्ती टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर	६,४६,९२८	२६/१२/२०२५
२	७९/२०२५	२) नरहरी विष्णू टोणपे, वय-६२, धंदा-शेती, रा. शिराळ (मा) ता. माढा, जि. सोलापूर	६,४६,९२८	२६/१२/२०२५
३	७९/२०२५	३) जोतीराम शंकर पाटील, वय-४४, धंदा-मार्बल शॉप, रा. करमाळा रोड टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर	६,४६,९२८	२६/१२/२०२५
४	७९/२०२५	४) समाधान बाळासाहेब पाटील, वय-३५, धंदा-शेती, रा. करमाळा रोड, पाटील वस्ती, टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर	६,४६,९२८	२६/१२/२०२५

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ व २ यांचे नोटीस बजावणीबाबत रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ३ व ४ ची नोटीस अपुरा पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

जाहीर नोटीस
ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
पांडुरंग महादेव कासवेद वगैरे -- जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे सर्व 'रेकॉर्ड' येणार एका क्लिकवर

सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन करण्याचे काम सुरु

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ डिसेंबर -

शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधी सर्व नोंदी पूर्णपणे डिजिटल होणार आहेत. 'महा ई-ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट सिस्टिम' या प्रणालीअंतर्गत प्रशासकीय विभागांतील नव्या कर्मचाऱ्यांच्या भौतिक सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन सुरू होत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेमधील कर्मचाऱ्यांचे नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतचे सर्व सेवाविषयक व्यवहार एकाच प्रणालीद्वारे एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या सर्व विषयांच्या फाइल्समध्ये एकसूत्रता यावी, कोणतीही फाइल व प्रकरण गहाळ होऊ नये, या उद्देशाने जिल्हा परिषदेने ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती, बढती, प्रशिक्षण, रजा, वेतनवाढ आणि इतर सेवा-संबंधित तपशील यांचा एकत्रित आणि अधिकृत दस्तऐवज यांचा समावेश सेवापुस्तिकेत असते. डिसेंबर अखेरपर्यंत सर्व दस्तऐवजांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे.

सेवापुस्तकांच्या डिजिटायझेशनमुळं वेतन, प्रमाणपत्रे, पेन्शन वेळेवर मिळणार आहे. जिल्हा परिषदेने वर्ष २०११ मध्ये सेवापुस्तक ऑनलाइन केले होते. मात्र, पुढे त्याचा वापर योग्य पध्दतीने होऊ शकला नाही. मात्र, आता शासनस्तरावरून सेवापुस्तकांचे डिजिटायझेशन होत असल्याने भविष्यात कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मागील काही दिवसांपासून सामान्य प्रशासन विभागाकडून डाटा एन्ट्रीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

माहिती राहणार गोपनीय

सीईओ कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भौतिक सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन करण्याचे काम सुरु आहे. डिसेंबरअखेरपर्यंत हे काम पूर्ण करणार आहोत. या नव्या प्रणालीतील माहिती गोपनीय राहणार आहे, असे जि.प.सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेतील वर्गनिहाय कर्मचारी

वर्ग क ११९१८
वर्ग ब ६६९
वर्ग ड ६११
एकूण १३१९८

'त्या' महापालिका अधिकाऱ्यांचे निलंबन टाळून बदली केली : डॉ.ओमप्रकाश शेटे

'आयुष्मान'साठी हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिला कारवाईचा इशारा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार सुरु असलेल्या आयुष्यमान भारत योजनेसाठी सोलापूर महापालिका प्रशासनाची व योजनेच्या जिल्हा समन्वयकांची कामगिरी असमाधानकारक दिसून आली होती. असा प्रकार दोन-तीन वेळा निदर्शनास आल्याने महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांना खडे बोल सुनावले. त्या अधिकाऱ्याचे निलंबनच करणार होतो. मात्र सहानुभूतीने विचार करून त्या अधिकाऱ्याची शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी बदली केली असल्याची माहिती आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी दिली.

आयुष्यमान भारत उपक्रमाचे राज्य मिशनचे अध्यक्ष डॉ. शेटे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद घेवून मनपा अधिकाऱ्यांच्या आयुष्मान भारत योजनेच्या काम काजाबाबतची पोलखोल केली होती. सोलापूर ग्रामीणमध्ये ही योजना चांगल्या प्रकारे राबतेय. मात्र शहरातील नागरिकांसाठी मनपा अधिकारी नीट काम करीत नसल्याची त्यांची खंत होती. मनपाचा एकही कर्मचारी, अधिकारी बैठकीस उपस्थित नव्हता. यावरुन ते चांगलेच संतापले होते. भविष्यात आयुष्मान योजनेच्या कामात हयगय करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांनाही सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

सध्याही शहरातील अनेक सामान्य नागरिकांना काही रूग्णालयातून या योजनेचा लाभ मिळत नाही, हे वास्तव आहे. अशा रुग्णालयांबाबत तक्रारी आल्यास त्यांच्यावरही शासन स्तरावरून कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शुक्रवार,दि.५ डिसेंबर रोजी डॉ. शेटे सोलापूर दौऱ्यात आल्यानंतर त्यांनी जिल्हा समन्यवक दिपक वाघमारे यांच्यावरील कारवाईबाबत सविस्तर माहिती घेतली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांवर कसलीच कारवाई झाली नसल्याचे त्यांना समजले. तेव्हा त्या अधिकाऱ्याची बदली केल्याचे डॉ.शेटे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले.

आयुष्यमान भारत योजनेचा राज्याचा अध्यक्षपदाचा पदभार घेतल्यापासून डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी सोलापुरात तीन वेळा बैठका घेतल्या. पहिल्या व दुसऱ्या बैठकीस महापालिका प्रशासनाची कामगिरी सुमार दिसली. तिसऱ्या बैठकीस महापालिका प्रशासनाचा एकही प्रतिनिधी उपस्थित नव्हता. योजनेसाठी आवश्यक क्षमतेने गती न दिल्याने या योजनेचे जिल्हा समन्यवक दिपक वाघमारे यांची नंदूरबारला बदली करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांवर कडक कारवाई

सर्वसामान्य, गोरगरिब रुग्णांवर मोफत उपचार होण्यासाठी शासनाची आरोग्य योजना कार्यान्वित आहे. सोलापुरातील अनेक मोठ्या हॉस्पिटलमध्ये अशा योजना लागू असताना सुध्दा लाभार्थी रुग्णांवर मोफत उपचार केले जात नसल्याच्या तक्रारी अनेक संघटनांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे उपचार नाकारणाऱ्या रुणालयांवरही कडक कारवाई करण्याचा इशारा डॉ.ओमप्रकाश शेटे दिला आहे.

कांदा बाजारपेठ बंद

डॉ.आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी माथाडी कामगार चैत्यभूमीत दाखल

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ डिसेंबर

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध माथाडी कामगार संघटनांनी आज शनिवार दि.६ डिसेंबर रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई येथील चैत्यभूमीला बाबासाहेबांच्या दर्शनासाठी दाखल झाल्याने सोलापूर बाजार समितीमधील कांदा बाजार पेठ एक दिवसासाठी बंद ठेवण्यात आली. एक दिवसाच्या बंदमुळे बाजार समितीचे लाखोंचे उत्पन्न तसेच कोटींची उलाढाल ठप्प झाली. दरम्यान, कामगार संघटनांच्या निवेदनाद्वारे सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील कांदा बाजारपेठेला एक दिवस सुट्टी देण्यात आली. रविवारी साप्ताहिक सुट्टी असल्याने सोमवारी बाजारपेठ सुरळीत होईल अशी माहिती बाजार समिती प्रशासनाने दिली. एरवी गजबजलेली कांदा बाजारपेठ शनिवारी पूर्णतः बंद ठेवल्यामुळे सर्वत्र शुकशुकाट पहावयास मिळाला.

सोलापूर महानगरपालिका निवडणूकसंदर्भात भाजपची आज बैठक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.७ डिसेंबर-

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने रविवार, दि.७ डिसेंबर २०२५ रोजी सिव्हील चौक परिसरातील भाजपा कार्यालय येथे महत्वाची बैठक बोलाविण्यात आली आहे, असे सांगण्यात आले.

सोलापूर महानगरपालिका निवडणूक प्रमुख रघुनाथ कुलकर्णी, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी प्रभागनिहाय रणनीती, संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणूक मोहिमेची प्राथमिक रुपरेषा याविषयी माहिती देणार आहेत. याबाबत चर्चा करण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकीस सरचिटणीस प्रा.डॉ.नारायण बनसोडे, डॉ.शिवराज सरतापे, उपाध्यक्षा विजया वड्डेपल्ली, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रंजिता चाकोते, सर्व पदाधिकारी, मोर्चा-आघाडी सेल प्रमुख, मंडल अध्यक्ष उपस्थित होते.

मनोरमा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्रीकांत मोरे

मसाप पुणे पश्चिम शाखा; मनोरमा साहित्य मंडळीच्या वतीने २५ डिसेंबरला संमेलन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर व मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात दि.२५ डिसेंबर रोजी होणाऱ्या एकदिवसीय मनोरमा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

कोटणीस नगर येथील मनोरमा कॉन्फरन्स सभागृहात डिजिटल मीडिया संपादक संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली सभेत एकमताने ही निवड करण्यात आली. यावेळी मनोरमा साहित्य पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष प्रा. राजशेखर शिंदे, मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे, मनोरमा साहित्य मंडळीच्या महिला उपाध्यक्षा अस्मिता गायकवाड यांच्यासह प्रा.डॉ. कविता मुरूमकर, पद्माकर कुलकर्णी, मारुती कटकधोंड, बदिउज्जमा बिराजदार, राजेंद्र भोसले, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, तात्यासाहेब पवार, उमाकांत चौंडे, विजय कालेकर, अभिराम सराफ, शिल्पा कुलकर्णी, कविता कुलकर्णी, नीलकंठ करंडे, पुरुषोत्तम साखरे, सुनील पाटील, संध्या हेब्बाळकर आदी उपस्थित होते. संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोरे म्हणाले, मराठी भाषेची जननी संस्कृत आहे. तिचा प्रचंड मोठा विस्तार झाला असून ती भाषा आपण जपली पाहिजे. मराठी भाषेला नैतिकतेचे अधिष्ठान आहे. गेल्या २६ वर्षात मनोरमा परिवाराने साहित्य क्षेत्रातील २५० जणांना सन्मानित केले आहे. मराठी भाषेचे संवर्धन आणि जागर झाला पाहिजे. सर्वांच्या सहकार्याने संमेलन यशस्वीरित्या पार पाडू.

यावेळी शोभा मोरे, अस्मिता गायकवाड यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रा.राजशेखर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले.

श्रीकांत मोरे यांची साहित्य सेवा अखंड

ज्येष्ठ पत्रकार राजा माने म्हणाले, श्रीकांत मोरे यांची अखंड साहित्य सेवा चालू आहे. गेल्या २६ वर्षाची ही चळवळ असून यामध्ये मोरे यांचे अमूल्य योगदान आहे. त्याचे साहित्य मुक्तछंदामध्ये आहे. कथा, कविता, ललित लेखन या सर्व प्रकारात त्यांचे नैपुण्य आणि गुणवत्ता आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवणारा हा माणूस बँकेचे कामकाज सांभाळून मराठी साहित्य क्षेत्रात सेवा करत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड व्हावी, अशी योग्यता त्यांच्याजवळ आहे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे आणि अन्य शिवसैनिक.

रेल्वे ब्रिज पूर्णपणे बंद; पोलिसांनी काढले पर्यायी मार्गाचे आदेश

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.६ डिसेंबर-

भय्या चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते मरिआई चौक दरम्यानचा रेल्वे ब्रिज जुना व जीर्ण झाल्याने तो पाडून त्याजागी नवीन ब्रिज उभारण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याने हा मार्ग संपूर्णपणे वाहतुकीसाठी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील अधिनियम २२ व कलम ३३(१)(ब) नुसार जारी केलेल्या आदेशानुसार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी ००.०१ वाजेपासून ते ८ डिसेंबर २०२६ रोजी २४.०० वाजेपर्यंत या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येणार आहे.

सोलापूर शहरातून लोकशाहीर आण्णाभाऊसाठेयांच्यापुतळ्यापासून मरिआई चौकाकडे जाताना १९२२ मध्ये बांधलेला रेल्वेचा जुना पूल आहे. त्यावेळी मंगळवेढा ते पंढरपूर आणि कोल्हापूरच्या अन्य शहरांना जोडण्यासाठी पूल बांधला होता.

१०३ वर्षे जुना फुल सध्या वाहतुकीसाठी धोकादायक असुरक्षित झाला आहे. त्यामुळे १४ डिसेंबर रोजी तो पाडण्यात येणार आहे त्यासाठी आधुनिक हायड्रोलिक ब्रेकर, काँक्रीट क्रशर आणि कटिंग मशीन वापरून हा पूल तोडला जाणार आहे त्यामुळे या मार्गावरील पूर्ण वाहतूक दुसरीकडून वळविली आहे. सुरुवातीला काही दिवस पर्यायी मार्गावर सोलापूर शहर पोलिसांची अंमलदार वाहतूक निर्माण करणार आहेत. पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी हे आहेत चार पर्यायी मार्ग

१) मरिआई चौक ते एसटी स्टँड रोड : या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या दुचाकी, चारचाकी वाहनांसाठी मरिआई चौक-शेटे नगर रेल्वे बोगदा-खमितकर अपार्टमेंट, एमएसईबी ऑफिस-निराळे वस्ती-छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड.

२) मरिआई चौक ते रेल्वे स्टेशन रोड : मरीआई चौक-नागोबा मंदिर-रामवाडी पोलीस चौकी-रामवाडी दवाखाना-रामवाडी ग्रीन गोडाऊन-मोदी बोगदा-जांबुमुनी चौक-मोदी चौक-कुमार चौक रेल्वे स्टेशन.

३) मंगळवेढा रोड : मंगळवेढाहून-हैदराबाद- तुळजापूर-विजयपूर-पुण्याकडे जाणाऱ्या वाहनधारकांना व या रोडने मुंबई मंगळवेढ्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांना नवीन विजापूर रोड ते केगाव बायपासचा वापर करता येईल.

४) देगाव व दमाणी नगर : देगाव व दमाणी नगर परिसरातील रहिवाशांना सोलापूर शहरात ये-जा करण्यासाठी जगताप हॉस्पिटल-सीएनएस हॉस्पिटल-जानकर नगर-नवीन रेल्वे बोगदा-अभिमानश्री नगर-अरविंदधाम वसाहत-जुना पुना नाका ते इच्छितस्थळी जाता येईल.

निराळे वस्तीत आज शासकीय योजनांचे शिबीर

सोलापूर, दि.७ डिसेंबर-

सुमित भोसले मित्र परिवार आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्रमांक ७ मधील सर्वसामान्य नागरिकांसाठी रविवार, ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता निराळे वस्ती येथील जुने विठ्ठल मंदिर येथे शासकीय योजनांविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची ई-केवायसी, 'आयुष्यमान भारत' कार्ड, 'प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना, कामगारांसाठी 'ई-श्रम कार्ड' यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचे फॉर्म मोफत भरुन दिले जाणार आहेत, **दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने** यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात येणार आहे, असे संयोजक जयहिंद चळवळीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुमित भोसले यांनी सांगितले.

मेहता शाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा

सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

मेहता प्राथमिक शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. सर्वप्रथम मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर व प्रमुख अतिथी डॉ. नागनाथ येवले यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिज्योती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. वशिष्ठ खजुरकर या विद्यार्थ्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वेशभूषा अतिशय हुबेहूब साकारली होती. सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. मधुरा छत्रे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. इयत्ता दुसरी देवगिरी गटातील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील एक प्रसंग व नृत्य सादर केले. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकरांचे कार्य भाषणाद्वारे सांगितले. रोहिणी माशाळकर यांनी गोष्टीरूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील प्रसंग सांगितले. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी देखील कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले. तर आभार सुभाषिनी पिल्ले यांनी मानले.

मंद्रुप पोलिस ठाणे आयोजित कार्यक्रमात हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.७ डिसेंबर-

मंद्रुप पोलिस ठाण्याच्या वतीने दत्त जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडले. दरम्यान, मंद्रुपमधील विठाई नगर येथील श्रींच्या पालखीचे आगमन झाल्यानंतर पालखी पूजन करुन भक्तगणांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. मंद्रुप पोलिस ठाणे येथील वटवृक्षाखाली दत्ताची दैनंदिन पूजाविधी केली जायची. मात्र, सुमारे २५ वर्षांपुर्वी विठाई नगर येथे दत्त मंदिराची स्थापना करण्यात आली, असे सांगण्यात आले. मंद्रुप पोलिस ठाणे येथे दरवर्षी दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येते. यावेळी सर्व कर्मचारी स्वेच्छेने भक्तांसाठी महाप्रसादाची सोय करतात. गावातील व परिसरातील शेकडो भक्त यात सहभागी होतात. लोकांच्या सहभागामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना काम करण्याची नवी उर्जा मिळते, असे मंद्रुप पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांनी सांगितले. अनेक वर्षांपासून मंद्रुप पोलिस ठाणे येथे दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येते. यावेळी पोलीस ठाणे येथे हिंदु मुस्लीमसह सर्व कर्मचारी एकत्र येऊन उत्सवात मग्न होतात. परिसरातील शेकडो भक्तांसाठी महाप्रसादाची उत्तम सोय करण्यात येते. हिंदु मुस्लीम एकतेचे प्रतीक म्हणून या उत्सवाला महत्व आहे, असे दत्त जयंती उत्सव समितीचे प्रमुख राजकुमार आतार यांनी सांगितले.

व्यापाऱ्याला २ लाख ५१ हजारांचा गंडा

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.६ डिसेंबर-

जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत व्यापाऱ्यांची आर्थिक फसवणूक करणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'कृष्णा मार्केटिंग' नावाचे दुकान चालवणाऱ्या संशयित आरोपी विक्रमसिंग राजपुत याने एका व्यापाऱ्यास तब्बल २ लाख ५१ हजार २०१ रुपये गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी शकील रहिम मंगलुर (वय-३४, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, २ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांच्या घरी पेमेंट संदर्भात चौकशी केली असता आरोपीचा मोबाईल बंद लागत होता. त्यामुळे फिर्यादीने व्हॉट्सॲपवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर 'कृष्णा मार्केटिंग' या दुकानावर प्रत्यक्ष भेट दिली असता दुकान पूर्णपणे बंद असल्याचे दिसून आले. आजूबाजूच्या व्यापाऱ्यांकडून चौकशी केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी विक्रमसिंग राजपुत याने अनेक व्यापाऱ्यांकडून माल उचलूनही पैसे न देता दुकान अचानक बंद करून पसार झाल्याचे स्पष्ट झाले

संशयित आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून डब्ल्यूपीसी शीट माल उचलून घेतला आणि त्यानंतर कोणतेही पेमेंट न करता फसवणूक केली आहे. संबंधित प्रकारामुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

भरधाव कारच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

सोलापूर, दि.६ डिसेंबर-

हैदराबाद रोडवरील हॉटेल जगदंबा येथे प्रांत विधीसाठी रस्ता ओलांडताना भरधाव आलेल्या चारचाकी कार (क्रमांक एम.एच.१३.इ.एस.२२५०) या चालकाने त्याच्या ताब्यातील कार रस्ता ओलांडणाऱ्या तरुणाला जोरदार धडक दिली आणि त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. भागवत व्हनमाने (वय-२३) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी सत्याप्पा माळाप्पा सोनटक्के (वय-३७, रा.रामपूर, ता.दक्षिण सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी सत्यपाल सोनटक्के याचा चुलत भाचा भागवत व्हनमाने (वय-२३) हा हॉटेल जगदंबा येथे प्रांत विधीसाठी रस्ता ओलांडताना ओलांडत होता. यावेळी भरधाव आलेल्या चार चाकी कारने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने, अतिवेगाने चालवून भाचा भागवत यास धडक देऊन त्यास जखमी करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

चांदण्याची छाया, कापराची काया, माऊलीची माया होता माझा भीमराया!

विविध पक्षसंघटना, संस्थांच्या वतीने अभिवादन

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.६ डिसेंबर-

चांदण्याची छाया, कापराची काया
माऊलीची माया होता, माझा भीमराया!

या काव्यपंक्तीप्रमाणे कृतज्ञतेची भावना व्यक्त करत विविध पक्षसंघटना, सामाजिक संस्था-संघटना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मनोभावे अभिवादन केले. रक्तदान करुन महामानवास आदरांजली वाहण्यात आली. सामुदायिक बुध्दवंदनाही घेण्यात आली. दरम्यान, भारतीय बौध्द महासभा समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोलापूर शहरातील पार्क स्टेडियम जवळील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि मिलिंद नगर येथील अस्थिविहार प्रेरणाभूमी याठिकाणी अभिवादन करण्यासाठी अलोट गर्दी झाली होती.

ब्लड फॉर बाबासाहेब : ब्लड फॉर बाबासाहेब या घोषवाक्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयच्या शासकीय रक्तपेढीमार्फत हुतात्मा स्मृती मंदिर येथे रक्तदान शिबीर पार पडले. डॉ.औदुंबर मस्के, डॉ.प्रदीप गाडगीळ, डॉ.स्वाती मुने यांच्या मार्गदर्शनाखालीशिबीर घेण्यात आले.

विविध संस्थांच्या वतीने रक्तदान : डॉ. आंबेडकर पुतळा परिसरात बुध्दराष्ट्र प्रतिष्ठान, भीमशक्ती बहुउद्देशीय मागासवर्गीय सामाजिक संस्था, परिवर्तन सामाजिक संस्था यांसह विविध संस्थांच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले.

भीमगीत आदरांजली : डॉ.बाबासाहेब आंबेडकर कलाकार समिती व विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलाकार समितीच्या वतीने भीम गीत आदरांजली कार्यक्रम पार पडला.

भारतीय बौध्द महासभा : भारतीय बौध्द महासभा सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने डॉ.आंबेडकर चौक येथील पुतळ्याजवळ सामुहिक बुध्दवंदना घेण्यात आली. याप्रसंगी समता सैनिक दलाने मानवंदना दिली. दरम्यान, मिलिंद नगर प्रेरणाभुमी अस्थिविहार येथे शुक्रवारी रात्री ११.३० वाजता सूत्तपटनाचा कार्यक्रम झाला. यावेळी भन्ते सारीपुत, भन्ते बोधीपाल, अण्णासाहेब वाघमारे, निर्मला कांबळे, धम्मरक्षिता कांबळे, नागसेन माने, मीनाक्षी बनसोडे, धम्मपाल माने, गौतम जगझाप, दत्ता सिध्दगणेश, पुंडलिक काकडे, राजेंद्र माने, बाबु रणखांबे, सखाराम रणखांबे, सुखदेव रणदिवे, आशा शिवशरण, नंदा काटे, कमल सोनवणे, जनार्दन मोरे, विजय साळवे, रमा ढावरे, रंजना दिलपाक, राजेंद्र माने, जगन्नाथ शिंगे, विशाल गायकवाड, सुमेध डोलारे, विशाल ढेपे, जीवक माने, कल्पना बाबरे, मालन माने, विशाल गायकवाड, झुमरा गायकवाड, सुमन वाघमारे, देविदास लंकेश्वर उपस्थित होते.

पुस्तकांसह विविध स्टॉल्सवर गर्दी

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पार्क चौक अर्थात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पुस्तकांसह फोटो, कॅलेंडर, पूजा साहित्य व इतर साहित्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. या सर्व स्टॉल्सवर खरेदीसाठी मोठी गर्दी दिसून आली. येथे मोठ्या प्रमाणात पुस्तकांची विक्री झाल्याचे सांगण्यात आले.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना : राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष विजयकुमार भांगे, कार्याध्यक्ष सी.एस. स्वामी, संघटक प्रमुख बाळकृष्ण पुतळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजा सोनकांबळे, बाळकृष्ण पुतळे, शिवानंद चडचण, समीर हुडेवाले, वैशाली जेधे आदी उपस्थित होते.

बहुजन समाज पार्टी : बहुजन समाज पार्टीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रदेश सचिव ॲड.संजीव सदाफुले, आप्पासाहेब लोकरे, बबलू गायकवाड, शहराध्यक्ष देवा उघडे, रशिद सरदार, अमर साळवे, सुहास सुरवसे, इंद्रजीत वाघमारे, इरफान मैंदर्गी, मिनाज शेख, जालिंदर मसलखांब, नितीन क्षीरसागर, सचिन तुळसे, रोहन बनसोडे, राजु सुरवसे, अतिश वाघमारे, सचिन गायकवाड उपस्थित होते.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ :

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या जिल्हा शाखेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष मनीष सुरवसे, जिल्हा सरचिटणीस अरविंद जेटीथोर, कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, संघटक अर्चना जनबंधू, प्रशांत भडकुंबे, शाहू दावणे, शरण अहिवळे, अरुण भालेदार, गणेश कांबळे, प्रदीप कांबळे, विकास रणदिवे, महेश इंगवले, दिलीप सोनटकले, संतोष बेळ्ळे उपस्थित होते.

पीबी ग्रुप : पीबी ग्रुप अर्थात प्रबुध्द भारत तरुण मंडळ संचलित बीबी ग्रुपच्या वतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस श्रीमंत जाधव व सुभना स्वाके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, गौतम नागटिळक, बाळू शिंदे, राजाराम लोखंडे, धनंजय गायकवाड, दत्ता कांबळे, सुमित चंदनशिवे, आदर्श कापुरे, नरेश कोपुलोलू, श्रीपती गायकवाड, सिध्देश्वर दुपारगुडे, विजय शिवशरण, जितेंद्र शिवशरण, जितेंद्र भूताळे उपस्थित होते.

छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठान : छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठानच्यावतीने रावजी सखाराम हायस्कूल व मनपा शाळा क्रं.११ च्या विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. तत्पुर्वी डॉ.आंबेडकर यांच्या अस्थी कलशास फौजदार चावडी पोलिस स्टेशनचे निरीक्षक तानाजी दराडे व गंगाधर सरवदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन आले. यावेळी अतिश बनसोडे, उत्तम आबुटे, शशीकांत बाबरे, आर.के. बाबरे, महादेव तळमोहिते, सोमा आबुटे, देवा उघडे, आकाश इंगळे, कांत उघडे, सचिन वाघमारे, विशाल माने, संग्राम आखाडे, ऋतुराज सरवदे, रवी व्हनकस्तुरे, आनंद भालेराव, वीरसेन जाधव, रोहन बनसोडे, अतिश वाघमारे, मिनाज शेख, प्रतिक लोकरे, दिपक बडेकर, अनुराग सुतकर उपस्थित होते.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी आज होणार मतदान

एकूण १० मतदान केंद्र, १०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा,
बार्शी दि.६ डिसेंबर -

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रविवार, दि.७ रोजी मतदान होणार आहे. बार्शी व वैराग येथील एकूण १० मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडणार आहे. यासाठी एकूण १०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांनी दिली.

सहकारी संस्था मतदान संघातील ११ जागा, ग्रामपंचायत मतदार संघातील ४ जागा व हमाल व तोलार मतदार संघातील १ जागा अशा एकूण १६ जागांसाठी निवडणूक लागली आहे. रविवार, ७ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ यावेळेत मतदान होणार आहे. सोमवार, दि. ८ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून बार्शीतील उपळाई रोडवरील आदित्य कृष्णा मंगल कार्यालय येथे मतमोजणी होणार आहे.

मतदान शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला असून प्रत्येक मतदान केंद्रावर सीसीटीव्ही लाईव्ह कॅमेरा यंत्रणा बसवण्यात आलेली आहे. मतदान प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण करण्याची व्यवस्था केलेली आहे. मतदानास येताना मोबाईल फोन सोबत आणता येणार नाही. मतदाराने स्वतःची ओळख पटवण्यासाठी मूळ कागदपत्र सादर केल्याशिवाय मतदान करता येणार नाही.

तालुक्यातील काही गावे बार्शीला तर काही गावे वैराग येथील केंद्राला जोडण्यात आलेली आहेत. बार्शी येथील नवीन मराठी शाळा येथील दोन केंद्रात व वैरागमधील एक अशा एकूण तीन केंद्रात या मतदारसंघातील एकूण १०३९ मतदारांची मतदानाची सोय करण्यात आले आहे. हमाल व तोलार मतदार संघातील १०२५ मतदारांची मतदानाची सोय बार्शीतील नवीन मराठी शाळा येथील दोन केंद्रात करण्यात आली आहे.

बार्शी परिसरातील गावातील मतदारांची सोय नवीन मराठी शाळा तीन केंद्रात तर वैराग परिसरातील गावातील मतदारांची सोय वैराग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक १ येथील दोन केंद्रात करण्यात आलेली आहे.

या मतदारसंघातील एकूण १६४३ मतदारांची सोय बार्शी व वैराग येथील केंद्रावर मतदानाची व्यवस्था करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले.

सहकारी संस्थांच्या निवडणुकांना लागला 'ब्रेक'

* स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे सरकारचा निर्णय

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ डिसेंबर -

नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका आणि आगामी काळात होणाऱ्या अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे प्रशासकीय यंत्रणेवरील कामाचा ताण वाढला आहे. त्यामुळे राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था वगळता अन्य सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण होईपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दरम्यान, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे, त्यांचा कार्यक्रम आहे, त्या टप्प्यावरच स्थगित करण्यात आला आहे.

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत राज्य प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते. सध्या राज्यामध्ये नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका झाल्या असून त्यांचा निकाल प्रलंबित आहे. त्याचबरोबर येऊ घातलेल्या अन्य स्थानिक निवडणुकांमुळे संबंधित प्रशासकीय तसेच पोलिस यंत्रणा या निवडणूक प्रक्रियेमध्ये गुंतलेल्या आहेत.

परिणामी सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलिस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता या बाबतीत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

पदाधिकारी निवडीस मुभा

या स्थगिती आदेशातून सहकारी संस्थांच्या निवडणुकीनंतर पहिली व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यास सूट देण्यात आली आहे. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष तसेच अन्य पदाधिकारी यांनी पदाचा राजीनामा दिला असेल, तसेच त्यांचा मृत्यू किंवा अपात्रता या कारणांमुळे एखादे पद रिक्त झालेले असेल, तर या पदावर या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यास मुभा देण्यात आली आहे.

शासनाला आहे अधिकार

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम अन्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळी येत असल्यामुळे कोणत्याही संस्थांच्या निवडणुका घेणे गरजेचे किंवा लोकहिताचे नसेल तर त्या पुढे ढकलण्याचा अधिकार शासनाला आहे. त्यानुसार या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कारवाई सुरु ठेवता येणार

सदस्याचा राजीनामा, मृत्यू किंवा अपात्रता या कारणांमुळे संचालक मंडळातील नैमित्तिकरित्या रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकांची निवड करण्यासही मुभा देण्यात आली आहे. 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया, मतदार यादी प्रसिध्दीचा टप्पा सुरु असलेल्या संस्थांना अंतिम मतदार यादी प्रसिध्द होईपर्यंतची कार्यवाही सुरु ठेवता येणार असल्याचे सांगण्यात येते.

विविध मागण्यांसाठी महिलांनी काढला ग्रामपंचायतवर मोर्चा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

मंद्रुप येथील वॉर्ड क्रमांक ५ मधील महिलांनी वारंवार ग्राम पंचायतीकडे तक्रार करूनही समस्या सोडविण्यात येत नसल्याने शुक्रवारी देशमुख नगरमधील महिलांनी थाळी वाजवत ग्रामपंचायतीवर मोर्चा काढला. देशमुख नगर येथून ग्रामपंचायतीविरोधात घोषणा देत ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिया मांडला.

अपुरा व खंडीत पाणीपुरवठा, रस्त्यावर खड्डे व घाणीचे साम्राज्य तसेच अनेक दिवसापासून दिवाबत्ती बंद यासह विविध समस्यांसाठी महिलांनी कार्यालया समोर बैठे आंदोलन केले. समस्या सुटल्याशिवाय माघार घेणार नाही म्हणत महिलांनी एक तास आंदोलन केला. यावेळी ग्रामपंचायत प्रशासनाकडून वारंवार आश्वासन देऊनही समस्या सुटत नसल्याने पदाधिकारी व प्रशासनाला धारेवर धरले. ग्रामपंचायतीमध्ये सत्ताबदल झाल्यानंतर तीन वर्षापासून नागरीकांना त्रास सहन करावे लागत आहे. वॉर्डाचे सदस्य नागरीकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आरोप करीत महिलांनी ग्रामपंचायत सदस्य सुधाकर कोरे यांना वेठीस धरले. दोन दिवसात समस्या सोडविण्याचे आश्वासन दिल्यावर आंदोलन स्थगित केले.

पेट्रोल पंपाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला बळ

महिला लिलया पार पाडताहेत जबाबदारी

तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

एक छोटसं 'पणती' जसं साऱ्या अंधारावर मात करते. तसं पण'ती'रुपी आजच्या महिला विविध क्षेत्रे पादाक्रांत करताना दिसत आहेत. इतकेच नव्हे तर ज्वलनशील पदार्थ म्हणून गणल्या जाणाऱ्या पेट्रोलच्या पंपाचे संचलन करण्याकामी महिला पुढाकार घेतल्याचे दिसून येते. सोलापूर महापालिकेच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या सात रस्तास्थित सीटी बस डेपो येथील पेट्रोल पंपावरील महिलांची कार्यप्रणाली पाहिले असता या पंपाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला बळ मिळाल्याचे स्पष्ट होते.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, रोजगाराची नवी संधी उपलब्ध करून देणे, पारंपारिकपणे पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात महिलांना पुढे आणणे या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या या पंपाचे उद्घाटन दि.२६ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले. या पंपावर दोन-तीन नव्हे तब्बल १४ महिलांची नेमणूक करण्यात आली. तत्पुर्वी या महिलांना डफरीन चौकातील सुपर पेट्रोल पंपावर तीन दिवसांचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणादरम्यान ग्राहक सेवा, सुरक्षा नियम, मशीन ऑपरेशन, डिजिटल पेमेंट प्रणाली, आपत्कालीन परिस्थितीमध्ये कसे प्रतिसाद द्यावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सात रस्तास्थित सीटी बस डेपो येथील पेट्रोल पंपावरील महिला आता अत्यंत कौशल्याने आणि आत्मविश्वासाने काम करताहेत. येथील पंपाच्या पर्यवेक्षिका पदासह ग्राहकांच्या वाहनांमध्ये पेट्रोल भरण्याची जबाबदारी महिला अगदी लिलया पार पाडत आहेत. त्यामुळे या पेट्रोल पंपाचे संचालन पुर्णतः महिलांच्या हाती असल्याचे दिसून येते.

या पंपावर व्यवस्थापकांपासून कॅशियर, तांत्रिक सहाय्यक, पंप ऑपरेटर तसेच सुरक्षारक्षक-सर्व पदांवर फक्त महिलांचीच नेमणूक करण्यात आली आहे. व्यवस्थापक निगार शेख या सध्या प्रसुती रजेवर असल्याने ब्रह्मदेव माळी यांच्याकडे ही जबाबदारी तात्पुरती सोपविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

येथील सर्व महिला कर्मचाऱ्यांना या पेट्रोल पंपाचे व्यवस्थापक ब्रम्हदेव माळी यांचे सहकार्य-मार्गदर्शन लाभते. सुरक्षा दृष्टिकोनातून पंपावर सीसीटीव्हीची अत्याधुनिक व्यवस्था, फायर सेफ्टी उपकरणे, २४ तास आपत्कालीन सहाय्य उपलब्ध ठेवण्यात आले आहे. दुपारी २ ते रात्री १० शिफ्टमध्येही महिला आत्मविश्वासाने ड्युटी करतात. यावरुन पेट्रोल पंपाच्या माध्यमातून स्थानिक महिलांना स्थिर रोजगारच मिळत नाही, तर त्यांना आर्थिक स्वावलंबनासोबतच समाजात एक नवे स्थानही मिळत असल्याचे स्पष्ट होते.

महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हा प्रकल्प एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून, शहरातील महिला कार्यरतांनी आपली क्षमता सिध्द केल्याचे समाधान व्यक्त केले आहे. सर्वच महिला कार्यरत असलेला हा पेट्रोल पंप शहरातील प्रगतीशील विचारांचा आणि सकारात्मक बदलांचा नवा प्रतीक बनला आहे. या पंपाचा यशस्वी प्रारंभ पाहता, शहरातील इतर भागांतही महिला संचालित प्रकल्पांची गरज असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

सोलापूर शहरातील पहिला इ पिंक पेट्रोल पंप

सोलापूर महापालिकेच्या तत्कालीन आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या पुढाकारातून सदर पंप सुरु करण्यात आले. सोलापूर शहरातील पहिला इ पिंक पेट्रोल पंप म्हणून येथील पंपाकडे पाहिले जाते.

'या' महिला पाहतात येथील काम

लक्ष्मी शेंडगे, अश्विनी गायकवाड, पूनम कोळी, अंजना नारायणकर, रोहिणी माडकर, राधिका ताकमोगे, निशा काळे, संगीता वाघमारे, पद्मा साई, रुपा मादगुंडी, लक्ष्मी बडगू, रुपला गायकवाड, अर्चना गायकवाड, निर्मला संकपाळ.

आमचा आत्मविश्वास दुप्पट झाला

आम्हाला सुरुवातीला थोडी भीती होती की, ग्राहक कसा प्रतिसाद देतील. पण पहिल्याच दिवशी मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आमचा आत्मविश्वास दुप्पट झाला. महिला अत्यंत नीटनेटकेपणाने काम करतात, अशी पावती ग्राहकांकडून मिळत असल्याचे पंपाच्या पर्यवेक्षिका लक्ष्मी शेंडगे यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

ज्ञानामृत आनंदलहरी १२८९

तरी ज्ञेय ऐसें म्हणणें । वस्तूतें येणेचि कारणें ।
जें ज्ञानें वांचूनि कवणें । उपायें नये ।।

अर्जुनाने, भगवंताकडून ज्ञान, अज्ञान म्हणजे नमके काय ते सर्व जाणून घेतले आहे. आता अर्जुनाला ज्ञेय जाणून घ्येण्याची इच्छा झाली आहे. खरे म्हणजे भगवंतांनी अर्जुनाला ज्ञेय म्हणजे काय ? हे यापूर्वीच सांगीतले आहे. तरीपण सविस्तरपणे ज्ञेय जाणून घ्येण्याची अर्जुनाची इच्छा पाहून भगवंत त्याला ज्ञेयाबद्दल बोलत आहेत. ब्रम्हवस्तूला ज्ञेय म्हटले जाते, असे भगवंतांनी अर्जुनाल यापूर्वीच सांगतीले आहे. ब्रम्हवस्तुला ज्ञेय का म्हणायचे, हे सांगतांना भगवंत म्हणाले, तरी ज्ञेय ऐसें म्हणणें । वस्तूतें येणेचि कारणें । जें ज्ञानें वांचूनि कवणें । उपायें नये ।। अर्थात ज्ञानावाचून इतर कोणत्याही उपायांनी जे जाणले जात नाही किंवा जे समजत नाही ती ब्रम्हवस्तू म्हणजे ज्ञेय होय. असे भगवंतांनी अर्जुनाला सांगीतले. ब्रम्हवस्तुचे म्हणजे ब्रम्हाचे ज्ञान झाले असता कांही जाणून घ्येण्याची शिल्लकच राहत नाही. हे जाणने म्हणजे नित्यानंद स्वरूप होणे होय. ज्ञेय जाणणाऱ्याकडे आहे, नाही ही परिभाषा शिल्लक राहत नाही. विचारशक्तीची वाट यांच्या ठिकाणी आपोआप मोडली जाते. रांजण, मडकी, घडा इत्यादी ठिकाणी पृथ्वीतत्व भरून उरलेले असते. त्याप्रमाणे सर्वांमध्ये, सर्वांकाराने ज्ञेय भरून उरलेले असते. ज्ञेय जाणणाऱ्याकडे व्दैत नावाची भाषा शिल्लक राहत नाही. गुळाची गोडी गुळाच्या ढेपीत असते, पण ती ढेपीच्या आकाराची नसते. त्याप्रमाणे गुण व इंद्रिय म्हणजे ब्रम्ह म्हणणे चुकीचे असते. दुधाची स्वरूप जोपर्यंत टिकते, तोपर्यंत तुपही दुधावरच असते. परंतू तूप म्हणजे दुध नव्हे. त्याचप्रमाणे ब्रम्ह व्यापक असल्यामुळे विकारात आहे आणि म यायेच्या कारणाने विकारी देखिल आहे. परंतु परमार्थत: ते ब्रम्ह कुटस्थ नित्य असंग असल्याने विकारस्वरूपमात्र नाही, हे विसरता कामा नये. नामरूपाचा संबंध, जाती क्रियादिक भेद, हे सर्व आकाराला आहेत, ब्रम्हाला नाहीत. कारण ब्रम्ह हे अमुर्त, कार्यकारण भाव रहीत व अमुर्त उपसंग आहे. ब्रम्हाला गुणरूप नाही. गुणांचा गंधही ब्रम्हाला नसतो. निगुर्ण असणाऱ्या ब्रम्हाविषयी लोक गुणांचा भोग दाखवित असतात. ते खरे म्हणजे चुकीचे असते. विविध ठिकाणच्या अग्नीतून जशी एकच उष्णता भेदरहीत रूपाने असते. त्याप्रमाणे ब्रम्ह चराचर प्राणीमात्रात भेदरहीत असते. सर्व प्राणीमात्रात सारखेच ब्रम्ह आहे, हे विसरू नये. जे अविनाशत्व धर्माने आणि सुक्ष्मत्व धर्माने सर्वांना व्यापून आहे, ते दुसरे तीसरे काही नसून ज्ञेय आहे. असे माऊली सांगतात हजारो मडक्यात चंद्र प्रकाश बिंबला तरी त्यात काही भेदभाव असत नाही. त्याप्रमाणे ब्रम्ह भेदभाव रहीत आहे. समुद्र हा काठाला, मध्यभागी वेगवेगळी गोडी देत नाही. तो सर्वत्र सारखीच गोडी ठेवतो. त्याप्रमाणे ब्रम्ह सर्व ठिकाणी सारखेच भरून उरलेले आहे. मीठागारातील राशीत प्रत्येक खाड्याला सारखीच गोडी असते, त्याप्रमाणे ब्रम्हाचे आहे, असे माऊली सांगतात. ज्ञेय जाणणाऱ्या व्यक्ती भेदभावरहीत होतो, असे माऊलींनी सांगीतले आहे. भेदभावरहीत होणारा व्यक्तीच स्वत:ही आत्मानंदी होतो व इतरांनाही सुख देतो. हे सत्य असल्याने आपण ज्ञेय जाणून घ्यायला हवे. जय जय राम कृष्ण हरी.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सुप्रभात

आजचा दिवस

वार : रविवार
दि. ७ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशिर्ष कृ. तृतीया
ऋतु - हेमंत
नक्षत्र- पुनर्वसु (२८.११)
योग - शुक्ल (२०.०७)
करण - वणिज (०७.५०)
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००

दिनविशेष -
संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय ८.१२. ध्वज दिन.
२०००: थोर समाजसेवक बाबा आमटे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला.
२००३: हिंदी चित्रपट अभिनेते देव आनंद यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला.

डॉ. आंबेडकरांमुळे गरिबांच्या अर्थव्यवस्थेला बळकटी: प्रा. कांबळे

तभा वंत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

बाजारपेठा सक्षम करणा-या अर्थव्यवस्थेतून भांडवलशाही आणि मुठभर उच्चभ्रू लोकांचे हित होते.त्यामुळे सर्वसामान्य वंचित सम हाच्या, गरीबांच्या स्वाभिमानाने जगण्यासाठीचा विचार केंद्रस्थानी ठेवून अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा नवा दृष्टीकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला दिला आहे, असे प्रतिपादन प्रा.एम.आर. कांबळे यांनी केले. डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभाग आणि कास्ट्राइब जिल्हा परिषद कर्मचारी संघाच्यावतीने यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये आयोजीत करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात प्रा.कांबळे बोलत होते.उच्च पदस्थ नोकऱ्या मिळत असताना देखील डॉ.आंबेडकर यांनी वकीली व्यवसायावर आपला उदरनिर्वाह चालवित संपुर्ण आयुष्य दिन दुबळ्या वंचितांसाठी झिजवले. संविधानात अभिप्रेत असणारी सामाजिक आणि आर्थिक समता निर्माण करण्यासाठी सर्वांनी आपल्या परीने रहावे तीच खरी आदरांजली डॉ. आंबेडकर यांना ठरेल असेही प्रा.कांबळे यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकिले यांनी केले.यावेळी कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यकारी अभियंता खराडे, कास्ट्राइब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण क्षिरसागर, राज्य उपाध्यक्ष गिरीश जाधव, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन सोनकांबळे,स्वीय सहाय्यक नदाफ यांच्यासह समाज विभागातील कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण श्रावस्ती यांनी तर आभार विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांनी केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेबांना मानवंदना

शहरातील विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटनांतर्फे महापरिनिर्वाण दिन साजरा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक क्रांतीचे प्रणेते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील विविध संस्था, शाळा, महाविद्यालय, संघटनांतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. विविध उपक्रमांनी शहर परिसरात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये महापरिनिर्वाण दिन प्रशालेचे प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, बसवराज कोरे, भारत राऊत, संतोष स्वामी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रशालेतील स्नेहल भालेराव, समिक्षा सुतार, संस्कृती ताकमोगे, सत्याप्पा कोळी, तेजस्विनी सन्नके, सोहम गुमते, आराध्या कलबुर्गी, रितिका राऊतराव, भीमबाई जमादार,समृद्धी गिराम,आकांक्षा जाधव, अथर्व चक्रे,तमन्ना जमादार, विश्वजीत बनसोडे या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. त्यानंतर प्रशालेतील शिक्षिका प्रिया पसारे,सुनीता गंगौडा यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन, शिक्षण व कार्य या विषयावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले तर सूत्रसंचालन भाग्यश्री स्वामी यांनी केले तर आभार रमेश आगवणे यांनी मानले.

समता सैनिक दल

महपरिनिर्वाण दिनानिमित्त समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. समता सैनिक दलाच्या जीओसी सुमित्रा केरू जाधव माजी जी. ओ. सी. आणि जेष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर, महासचिव अनिल जगझाप यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाचे सुचित्रा थोरे, ज्येष्ठ सैनिक विठ्ठल थोरे, अंगद जेटीथोर,माणिक आठवले, बाळासाहेब मस्के, संभाजी तळभंडारे,रत्नदीप कांबळे,मुकुंद चंदनशिवे, चंद्रकांत कोळेकर, सुनिल डांगे, विनोद जाधव, भारत आवारे, अंकुश बनसोडे, शाहू दावने, बिगलर समाधान रसाळ, अरुण भालेदार, सुरज प्रक्षळे, सुजित हावळे, प्रज्वल डोळसे, शिवशरण, प्रीती जाधव, वर्षा जाधव उपस्थित होते.

एकात्मता सामाजिक संस्था

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एकात्मता बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यात आली. डॉ. आंबेडकरांच्या समता व एकतेच्या विचारांना अनुसरून, देशमुख पाटील वस्ती येथील सर्व जातीधर्मातील महिलांनी एकत्र येऊन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिन शिराळकर उपस्थित होते. याप्रसंगी अभिवादन करण्यासाठी रेणुका शिराळकर, वंदना बनसोडे, अमृता बनसोडे, नकुशा ताकभाते, संगीता शिखरे, सोनिया शिराळकर, अंबिका गुंड आणि उषा बनसोडे उपस्थित होते.

महावितरण कार्यालय

महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय कोंडगुळी, सहाय्यक अभियंता अजय चव्हाण, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, निलकंठ कांबळे, दिनेश बळवंत, गुंडप्पा बनसोडे, सोमनाथ कोनाळे, स्वप्निल कोरे, नितीन कोळी, प्राजक्ता राऊतराव उपस्थित होते.

शिवालय शैक्षणिक संकुल

शिवालय शैक्षणिक संकुल मध्ये युगपुरुष भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त साजरा करण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व मेणबत्ती प्रज्वलित करुन संस्थेच्या प्राचार्या कांचन वाघचवरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्या वाघचवरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला. सूत्रसंचालन राजकुमार शिंदे यांनी केले तर आभार सुभाष चव्हाण यांनी मानले.

पाकणी जि.प.शाळा

पाकणी, (ता.उत्तर सोलापूर,जि.सोलापूर) जि. प. प्रा. शाळा पाकणी येथे RWE (Rural gricultural Work Experience) कार्यक्रमांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आदरपूर्वक साजरा करण्यात आला. याप्रसंगी RWE कार्यक्रमातील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्याची, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या विचारांची माहिती ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा होता. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरत शिंदे, उपाध्यक्ष सेनाजी वाघमारे, मुख्याध्यापिका कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी सागर यादव, वैभव पाटील, समर्थ जाधव, दीपक खारे,विक्रम सांगळे, पवन वाघमोडे, तुषार घोडके उपस्थित होते.

बीएसएनएल कार्यालय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोलापूर जिल्हा टेलिफोन भवन, बीएसएनएल कार्यालयात भावपूर्ण अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या कार्य, विचार आणि सामाजिक योगदानाला वंदन करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान म हाप्रबंधक श्रीकांत मुब्रूखाणे यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी कार्यालय अधीक्षक (प्रशासन विभाग) सुजित हावळे, उपमहाप्रबंधक विठ्ठल कुलकर्णी, अनिता पाटील, उमेश शिंदे, श्रीधर अतनूर, संतोष जेटगी, बिराजदार, त्रिंबके, रवी लिंगनूर, प्रवीण कवडे, राजेश तेलगावकर, अमित पोटफोडे, कुमार आळगीकर, ए. शेख, व्ही. माने, प्रशांत कवडे, अंकोलीकर उपस्थित होते.

उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय

उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेच्या मार्गदर्शिका दीप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख माधवी खोत यांची उपस्थिती होती. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी सहशिक्षिका सारिका महाडिक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. याप्रसंगी इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी सांची आबुटे, चंचल जेटीथोर, सलोनी भंडारे यांनी भाषणे सादर केली. यावेळी राष्ट्रभाषा हिंदी ऑलिंपियाड परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रीती वऱ्हाडे तर आभार सोनल आळंद यांनी मानले. संविधानाच्या सामूहिक वाचनाने कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला.

राष्ट्रीय वक्ते पुष्पेंद्रजी कुलश्रेष्ठ यांचे आज व्याख्यान

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्यावतीने राष्ट्रप्रेमी राष्ट्रीय वक्ते पुष्पेंद्रजी कुलश्रेष्ठ यांचे रविवार दि. ७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात भारत का भविष्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजी नगरचे देवगीरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर दादा शितोळे हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. अशी माहिती अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.

भारतीय राजकारण आणि भारतीय इतिहासाची मांडणी करणारे ज्येष्ठ पत्रकार तथा अखंड हिंदु राष्ट्राचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्नशील असलेले सामाजिक कार्यकर्ते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांच्या वाणीतून भारतीय इतिहास तसेच भारताचे भविष्य यावर विचार ऐकण्याची संधी सोलापूरकरांना महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अनेक वर्षे पत्रकार म्हणून सेवा बजावल्यानंतर पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी वैचारीक चळवळ उभी करण्यासाठी सुरू केलेले कार्य कौतुकास्पद आहे. अखंड हिंदु राष्ट्राचे स्वप्न पाहून नव्या पिढी समोर भारतीय परंपरा आणि इतिहास मांडण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्याचाच भाग म्हणून सोलापूरकरांना त्यांचे विचार ऐकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.बौध्दिक व्याख्यानाचा लाभ सोलापूरकरांना व्हावा या हेतुने महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने भारत का भविष्य या विषयावर त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी कार्यरत आहेत. व्याख्यानाला येणार्या नागरीकांच्या सोईसाठी हुतात्मा स्मृती मंदिराच्या आवारात स्क्रीन, खुर्च्या आणि स्पिकरची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री दत्त समर्थ निर्गुण धाम येथे दत्त जयंती साजरी

अक्कलकोट, दि. ६ डिसेंबर-

श्री दत्त समर्थ निर्गुण धाम श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे समिती अध्यक्ष स्वामीनाथ पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पहाटेपासून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळी ठीक दहा ते बारा दरम्यन श्री स्वामी समर्थ भजन मंडळ समर्थ नगर अक्कलकोट यांचा सुमधुर असा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. भजन मंडळाचे प्रमुख दीपक अण्णाराव पोतदार यांच्या गायनाने वातावरण भक्तीमय होऊन गेले. गुलाल पडला. श्री दत्त महाराजांची बाल मूर्तीला पाळण्यात घालण्यात आले. महाआरती करून महाप्रसाद वाटप करण्यात आले. समितीचे अध्यक्ष स्वामीनाथ पोतदार यांच्या हस्ते दीपक पोतदार व मनोज अतनुरे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भजन मंडळातील श्याम सुंदर पोतदार, प्रकाश पोतदार, धनश्री पोतदार, अनुराधा पोतदार, भाग्यश्री मचाले, विमल साठे, विजयालक्ष्मी अतनुरे, शरयू पोतदार, काशिनाथ पोतदार, दाजीराम शिरसाट, सिद्धेश्वर भंडारे, स्वरांजली पोतदार, मनोहर हंचाटे, नागनाथ परळकर उपस्थित होते.

बोधिवृक्ष सामाजिक संस्था

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून बोधिवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने मार्गदर्शक विकेश इंगळे व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आकाश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गांधीनगर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सम ाजासाठी, देशासाठी, मानवतेसाठी रक्तदान हे सर्वात पवित्र कर्तव्य समजणाऱ्या ५६ रक्तवीरांनी या शिबिरात पुढाकार घेऊन रक्तदान करत महापरिनिर्वाण दिनाला मानवसेवेची प्रेरणादायी जोड दिली. सर्व समाज, सर्व जाती, सर्व धर्मातील बांधवांनी एकत्रितपणे येऊन एक राष्ट्र - एक मानवता या बाबासाहेबांच्या महान विचारांचा वारसा जपला. रक्तदान शिबिर यशस्वी केल्याबद्दल सर्व रक्तदात्यांचे, स्वयंसेवकांचे व उपस्थित म ान्यवरांचे बोधिवृक्ष सामाजिक संस्थेतर्फे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, तालुका प्रमुख राजकुमार शिंदे, माजी नगरसेवक प्रकाश कोडम, श्री सिद्धेश्वर बाजार समितीचे चेअरमन गफार चांदा, माजी नगरसेवक दत्तू बंडपट्टे, माजी नगरसेवक नारायण मशाळकर, अन्वर बागवान, अंकुश बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

'त्या' २६० शिक्षकांचे दीड कोटी परत करा

मुंबई उच्च न्यायालयाचे सीईओंना आदेश

तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे
कुर्डूवाडी, दि. ६ डिसेंबर-

डिसेंबर २००७ पूर्वी संगणक परिक्षा पास न झाल्याने शासनाने तत्कालीन २६० शिक्षकांची सुमारे १ कोटी ४७ लाख ६८ हजार २७० रूपये रक्कम वसुल केली होती. याविरोधात दाखल अर्जावर सुनावणी करत उच्च न्यायालयाने ती रक्कम शिक्षकांना परत करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांनी जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांतर्फे त्या २६० प्रा.शिक्षकांना रक्कम देण्याचे आदेश दिल्याची माहीती जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष राजाराम चव्हाण यांनी दिली.

शासनाने ५ मे २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३१/१२/२००७ पुर्वी राज्यातील सर्व शासकीय कर्मचा-यांनी संगणक परिक्षा पास होणे बंधनकारक केले होते मात्र या परिक्षेत सोलापूर जिल्ह्यातील अनेक शिक्षक अपात्र झाले. अपात्र झालेल्या सर्व कर्मचा-यांच्याकडून २७/११/२०२० च्या शासन निर्णयानुसार पेन्शनविक्री व उपदानामधून मिळणा-या रकमेतून वसुली करण्यात आली. या वसुलीची रक्कम ५० हजार ते ३ लाखापर्यंत होती. शासनाच्या या निर्णयाला जिल्हा सेवा निवृत्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संघटनेकडून जिल्हाध्यक्ष राजाराम चव्हाण यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हाण दीले.या अपिलाचा निकाल उच्च न्यायालयाकडून २४ फेब्रू.२०२५ रोजी सेवानिवृत्त शिक्षकांच्या बाजूने लागुन मुख्याधिकारी सोलापूर यांना सर्व शिक्षकांना वसुली परत करण्याचे आदेश दिले असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.त्यानसार सोलापूर जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी २४ नोहें.२०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व पं.स.च्या गटविकास अधिकारी यांना पत्रक काडून सर्व शिक्षकांची वसुल केलेली रक्कम परत करणेबाबतचे आदेश दीले आहेत. या संपुर्ण प्रक्रीयेम ध्ये रामचंद्र पाटील,दत्तात्रय पवार, लिंबराज जाधव, श्रीमंत गुंड,आशोक भांजे व सर्व तालुक्याचे अध्यक्षांनी प्रयत्न केले. मुख्यकार्यकारी जंगम यांच्या आदेशामुळे निवृत्त शिक्षकांमध्ये सम ाधानाचे वातावरण आहे.

महापरिनिर्वाण दिन

कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी प्राथमिक विद्यालय यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरम शेट्टी उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक विभाग सहप्रमुख निशिगंधा सोमेश्वर यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान याविषयी माहिती दिली. यावेळी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी, राजनंदिनी सोलंकर, श्वेता सुतार, वैभवी बगले पाटील, स्मिता बिराजदार या विद्यार्थ्यांनीनी मनोगते व्यक्त केली. यावेळी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रूपाली शहा, कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यानी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. कार्यक्रमास पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, सेमी विभागाचे दिगंबर जगताप, कुमार जाधव, पूजा कडबगावकर, श्रीदेवी मायनाळे, रविकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील, सागर मठदेवरु उपस्थित होते. सूत्रसंचालन निशिगंधा सोमेश्वर यांनी केले तर आभार पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे यांनी मानले.

मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालय

मोडनिंब (ता.माढा) येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले. मोडनिंब शहरातील ग्रामपंचायत कार्यालय, शासकीय कार्यालये, विविध शैक्षणिक संस्था, विद्यालये, खासगी, सहकारी संस्था, राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी पुष्पांजली अर्पण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच लक्ष्मी पाटील, ग्रामसेवक कांबळे, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, कैलास तोडकरी, सोमनाथ माळी, दत्तात्रय सुर्वे, बाबुराव सुर्वे, उपसरपंच अमित कोळी, शिवाजी सुर्वे, बालाजी वाघमारे, चांगदेव वरवडे, डॉ. प्रशांत कोल्हे,राहुल पाटील, संजीव शिंदे, अमर ओहोळ, चंद्रकांत गिड्डे, सदाशिव पाटोळे, संतोष पाटील, सतीश ओहोळ, अतुल गाडे, निवृत्ती मराळ, उदय जाधव, किरण तोडकरी, बिभीषण गायकवाड उपस्थित होते.

भिम प्रतिष्ठानकडून अभिवादन

महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवडॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भीम प्रतिष्ठानतर्फे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथे अभिवादन करण्यात आले. प्रतिष्ठानतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण करून विविध सामाजिक क्षेत्रात काम करण्यात आले. त्यामध्ये प्रतिष्ठान तर्फे विविध शाळा महाविद्यालयांना संविधानाची पुस्तके देऊन भारतीय राज्यघटनेचा महत्त्व पटवून देण्यासाठी पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. त्यासोबतच शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचारधारा भिम प्रतिष्ठानच्या माध्यमातून कार्यरत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्माण निमित्त महामानवास अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक दलितमित्र. बाबा बाबरे, अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, सचिव अकबर शेख,ड विशाल मस्के, ॲड. स्वाती मस्के, प्रेम अंकुश, सौदागर देवगन, उषा कांबळे, कल्पना चव्हाण, प्रभाकर बाबरे उपस्थित होते.

कोठारी हायस्कूल

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड, प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक सुधीर दुर्गे, टी.एम. पवार उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य प्रशालेतील मृणाली रेउरे, गौतमी जानराव, सृष्टी कोळी या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतात सांगितले. प्रशालेतील सहशिक्षक डी.बी. भांजे यांनी डॉ. बाबासाहेबांचे विचार व कार्य याबद्दल माहिती सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस.ए.दुर्गे यांनी डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य मनोगत सांगितले. सूत्रसंचालन एस.ए. बिडवे तर आर.डी. जानापुरे यांनी आभार मानले.

उपळवटे येथे द्राक्ष उत्पादकांसाठी मार्गदर्शन शिबीर

द्राक्ष संशोधन केंद्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना लाभदायी

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि.६ डिसेंबर-

उपळवटे (ता. माढा) येथे कृषीनिष्ठ परिवार माढा तर्फे आयोजित द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. परिसरातील शेकडो द्राक्ष उत्पादकांनी उपस्थित राहून नवीन संशोधन, हवामान बदल, मृदा आरोग्य आणि आधुनिक बाग व्यवस्थापनावरील मौल्यवान माहितीचा लाभ घेतला.

शिबिराचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. आर. जी. सोमकुंवर, माजी संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे आणि डॉ. अजयकुमार उपाध्याय, प्रमुख शास्त्रज्ञ (मृदा विभाग), राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी द्राक्ष बागेतील हवामान बदलाचे परिणाम, कार्बन सेवाक्षमता, मृदेमधील सूक्ष्म जीविक विविधता, निर्यातक्षम गुणवत्ता आणि स्मार्ट शेती तंत्रज्ञान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विठ्ठलगंगा चेअरमन धनराज शिंदे यांनी विठ्ठलगंगा शेतकरी उत्पादक कंपनीने हाती घेतलेल्या क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत जास्तीत जास्त

शेतकऱ्यांनी द्राक्ष बाग लागवडी करिता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या मध्ये सहभाग घ्यावा याबाबत माहिती दिली.

यावेळी प्रास्ताविक निवृत्त जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी प्रास्ताविक केले व कृषीनिष्ठ परिवाराचे म ार्गदर्शक नितीन कापसे यांनी जमलेल्या शेतकऱ्यांना यापुढे ही अश्या प्रकारचे उपक्रम चालू ठेवू आवश्यक अश्या प्रकारचे कार्यक्रम प्रभावी पणे राबविण्यचे अभियान हाती घेऊ असे सांगून आभार व्यक्त केले. शेतकऱ्यांना उत्पादन-स्थैर्य, मृदा आरोग्य सुधारणा आणि गुणवत्तावाढीसाठी कोणती पावले उचलावीत यावरही मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. उपस्थित शेतकऱ्यांनी या ज्ञानसत्राचे मनापासून स्वागत केले व असे उपयुक्त उपक्रम सातत्याने राबवावेत अशी मागणीही व्यक्त केली.

कृषीनिष्ठ परिवार माढा तर्फे आयोजक नितिन कापसे सर्व शेतकऱ्यांचे तसेच तज्ज्ञांचे मनः पूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

यावेळी डॉ.सोमकुंवर, डॉ. उपाध्ये, विठ्ठलगंगा चे चेअरमन धनराज शिंदे निवृत्त जिल्हा कृषी अधीक्षक बाळासाहेब शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती सुहास पाटील खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडू नाना ढवळे, कृषीनिष्ठ चे नितीन कापसे, निमगाव चे मा. सरपंच रविंद्र शिंदे, प्रगतशील शेतकरी बालाजी गव्हाणे,पोपट खापरे, नानासाहेब देशमुख, जैन इरिगेशनचे किरण पाटील, गजानन कोटकर, बार्शी येथील शिवाजी कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी, माढा, पंढरपूर, बार्शी, करमाळा तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

नवीन मराठी शाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा

सोलापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या म हापरिनिर्वाण दिनानिमित्त वैराग (ता. बार्शी) येथील नवीन म राठी प्राथमिक शाळा, दत्तनगर येथे त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक संतोष भडंगे तसेच शिक्षक संतोष शिंदे, अशोक डोळसे, विजयकुमार केदार, मनोज मुरकुटे उपस्थित होते. त्यांच्यासह प्रशालेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी महामानवाच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

शंकरलिंग प्रशालेत महापरिनिर्वाण दिन

तभा वृत्तसेवा,
वळसंग, दि. ६ डिसेंबर-

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला.

याप्रसंगी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते करून त्यांना प्रशालेतर्फे अभिवादन करण्यात आले. पूजनानंतर प्रशालेतील काही विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भाषण केले. याप्रसंगी उत्कृष्ट भाषण व गीत गायन केलेल्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्य देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैराम डगी, निलकंठ कवटगी,विरेश थळंगे, प्रा. संतोष शिंदे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे,मल्लिनाथ गौडगाव, शिवराज अष्टगी,अजय माणकोजी,प्रा.शरणय्या मसुती, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे,प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी,विनोद दुधगी, सुनिता कुर्ले आदींचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन व आभार बसवराज दुधगी यांनी मानले.

उर्दू शाळेत फूड फेस्टिव्हलचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-

महानगरपालिका मुलांची उर्दू केंद्र शाळा क्रमांक पाच शाळेमध्ये फूड फेस्टिवल कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात खालिद मणियार, अय्युब नलामंदू, मज़हर अलो ळी, इम्तियाज नदाफ हे प्रमुख म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी २३ स्टॉल्स लावले. यामध्ये गुलाब जामुन, दहीवडा, कस्टर्ड, पाणीपुरी, कबाब, समोसे इत्यादी पदार्थांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी स्वतः विक्री करून पाककला, व्यवहार कुशलता, नफा-तोटा, दर ठरविणे तसेच खरेदी-विक्री यांसारख्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाच्या कौशल्यांचे प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक आफरीन शेख, जिनत पगडीवाले, रूपाली कांची, शबाना जामदार, महबूबी शहापुरे, नाझिया रजभरे, इमरान जमादार, शहाबुद्दीन रचभरे, महादेवी कालीकोटी यांचे योगदान लाभले.

६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा; सोलापूर केंद्रातून 'बरड' प्रथम

तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. ६ डिसेंबर-

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत सोलापूर केंद्रातून महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी मर्यादित या संस्थेच्या बरड या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच राजश्री विश्वकल्याण मल्टिपर्पज सोसायटी, जुळे सोलापूर या संस्थेच्या राहिले दूर घर माझे या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे सोलापूर केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-

शोध क्रिडा, सांस्कृतिक, सामाजिक संस्था, कुडुवाडी या संस्थेच्या मी देव या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक अनिल कोलप (नाटक-बरड), द्वितीय पारितोषिक अभिजित केंगार (नाटक-खिच्याक), तृतीय पारितोषिक डॉ. सायली सुर्वे (नाटक-मी देव) प्रकाश योजना प्रथम पारितोषिक शाम चव्हाण (नाटक-हॅलो राधा, मी रेहाना), द्वितीय पारितोषिक गणेशसिंह मरोड (नाटक-स्पायडरमॅन), तृतीय पारितोषिक अमोल कुलकर्णी (नाटक-माईंडस्केप) नेपथ्य : प्रथम पारितोषिक बाळकृष्ण निमसुडकर (नाटक-मी देव), द्वितीय पारितोषिक प्रतिक तांदळे (नाटक-खिच्याक), तृतीय पारितोषिक उमा निमसुडकर (नाटक-ब्लॅक अँड व्हाईट) रंगभूषा प्रथम पारितोषिक ज्योती चिमटे (नाटक-बरड), द्वितीय पारितोषिक रेणूका बडवे (नाटक-मनमंदिरा) तृतीय पारितोषिक बाळू काशिद (नाटक-घुंगरु) संगीत दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक ऋतिक गायकवाड (नाटक-मी देव), द्वितीय पारितोषिक अमृत ढगे (नाटक-ब्रेकिंग न्युज) तृतीय पारितोषिक स्वप्निल बोरकर (नाटक-हॅलो राधा, मी रेहाना) वेशभूषाः प्रथम पारितोषिक आराध्या फुलारी (नाटक-स्पायडरमॅन), द्वितीय पारितोषिक

सुजाता चिक्का (नाटक-राहिले दूर घर माझे), तृतीय पारितोषिक अजिंक्य चव्हाण (नाटक-एक नार गांव बेजार), उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक संतोष सुर्वे (नाटक-मी देव) व रुपाली राऊत (नाटक-बरड), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे खुशी खडलोया (नाटक-खिच्याक), दीप्ती इंगळे-सिध्दम (नाटक-राहिले दूर घर माझे), आदिती सरदेशमुख (नाटक-ब्रेकिंग न्युज), अश्विनी तडवळकर (नाटक-हॅलो राधा मी रेहाना), ऋतुराज आरसीद (नाटक-द माईंडगेम), नितीश फुलारी (नाटक-स्पायडरमॅन), अमोल देशमुख (नाटक-या नावाच काय करायच?), दत्ता वाघमारे (नाटक-ब्लॅक ॲण्ड व्हाईट).

दि. ६ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत १८ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून दीप चहांदे, सुधीर सेवेकर आणि श्रीमती मधुरा टापरे यांनी काम पाहिले. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या नाटकांच्या संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले.

संघाची जगावेगळी कार्यपध्दती

मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग – ११

– डॉ. सचिन लादे, पंढरपूर
पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.
मो.क्र.७५८८२१६५२६

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचा मूळ उद्देश राष्ट्राचे परमवैभव हा आहे. आपला भारत देश विकसित झाला पाहिजे, स्वावलंबी बनला पाहिजे, आधुनिक भाषेत सांगायचे तर महासत्ता बनला पाहिजे, या देशातील प्रत्येक नागरिक सुखी - समृद्ध व संपन्न बनला पाहिजे, संघाचे अंतिम ध्येय हेच आहे. या ध्येयासाठी कोणतीतरी कार्यपद्धती अवलंबवावी लागणार होती. या ध्येयपूर्तीसाठी प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या संस्कारी व्यक्ती निर्माण होण्याची गरज आहे, ही गरज भागविण्यासाठी दैनंदिन शाखा हे साधन तयार करण्यात आले. दैनंदिन शाखा ही संघ कार्यपद्धतीची विशेषता आहे.

संघाच्या शाखेतून राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी व्यक्ती निर्माण केले जाते. संघाची शाखा हे संस्कार केंद्र आहे, या संस्कार केंद्रातून व्यक्तीची जडणघडण केली जाते. आपल्या राष्ट्राचा स्वभाव लक्षात घेऊन, आपल्या पुरातन संस्कृतीचा संदेश लक्षात घेऊन आपले राष्ट्र वैभवशाली बनविण्यासाठी कशा प्रकारे काम करावे लागेल याचा विचार करून या कामासाठी सक्षम ठरू शकतील अशा व्यक्तीचे निर्माणकार्य संघ शाखेतून केले जाते. संघाची शाखा विकसित करण्यासाठी लोक संपर्क करणे, बैठका घेणे, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घडवून आणणे, वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने एकत्रिकरण करणे, बौद्धिक कार्यक्रम - उत्सव घेणे, निवासी तसेच अनिवासी शिबिरांचे आयोजन करणे, छोट्या छोट्या गटांमध्ये कार्यकर्त्यांच्या चर्चा घडवून आणणे अशा अनेक गोष्टी कराव्या लागतात. संघ कार्यात या सर्व कार्यासाठी गृहस्थी कार्यकर्ते, विद्यार्थी कार्यकर्ते तसेच पूर्णवेळ कार्यकर्ते काम करताना दिसून येतात. दैनंदिन संघ शाखा ही संघ कार्यपद्धतीची विशेषता आहे, ताकद आहे व या कार्यपद्धतीच्या साधनाद्वारेच संघाला आपले ध्येय गाठावयाचे आहे. राष्ट्रासाठी - समाजासाठी दैनंदिन काम करण्याची संघाची कार्यपद्धती खरोखरच जगावेगळी आहे. संघ कार्यपद्धतीच्या वैशिष्ट्यामुळेच संघ वैशिष्ट्यपूर्ण कोणत्याही संघटनेच्या कार्यपद्धतीवरच त्या संघटनेचे यश व त्या संघटनेला मिळणारा मान अवलंबून असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कार्यपद्धती ही खरोखरच इतरांपेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे म्हणूनच संघ हा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. व्यक्तीनिर्माण या प्रमुख संकल्पनेवर संघाची कार्यपद्धती अवलंबून आहे. स्वार्थ, प्रसिद्धी, अहंकार यांना कोठेही स्थान नसते. संघाचे सरसंघचालक हे देखील प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी पत्रकार परिषदा घेत नाहीत अथवा उठसुठ कोणतेही वक्तव्य करीत नाहीत. संघाच्या स्वयंसेवकामध्ये निस्वार्थीपणा हा म हत्त्वाचा गुण असतो. प्रसिद्धीपासून कोसो दूर राहून काम करणे हा स्वयंसेवकांचा स्वभाव असतो तर सेवेचा भाव असल्यामुळेच त्यांच्यामध्ये अहंकारही दिसून येत नाही, त्यामुळेच इतर संघटनांपेक्षा संघाच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये लगेचच नजरेत भरतात. संघाची कार्यपद्धती ही संस्कारप्रधान आहे. कोणतेही काम भावनेवर आधारित अथवा क्षणिक उत्साहाच्या भरात होणारे नाही. मिळावे घेऊन, मिरवणुका काढून, घोषणाबाजी करून अथवा काही विशिष्ट प्रश्नांवर जनमत भडकावून संघटन उभे राहू शकत नसते व आपले ध्येय साध्य होऊ शकत नसते याची संघाला पूर्ण जाणीव असल्यामुळेच संघ नित्य स्वरूपामध्ये दैनंदिन शाखेच्या म ाध्यमातून सातत्याने कार्यरत आहे. वरील सर्व गोष्टींपेक्षा आपल्या कामावर निष्ठा ठेवून सतत काम करण्याचा संघाचा स्वभाव आहे, त्यामुळेच संघाची कार्यपद्धती ही यशस्वी होताना दिसून येते. निस्वार्थी कार्यकर्ते निर्माण व्हावेत अशीच संघाची कार्यपद्धती आहे. इतर संस्था अथवा संघटनांमध्ये प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या स्वार्थासाठी कार्यरत असतो, परंतु संघ या प्रकारच्या स्वार्थापासून दूर आहे. संघामध्ये येणारा प्रत्येक जण निस्वार्थपणे राष्ट्र व समाजसेवा करण्याच्या भूमिकेतूनच आलेला असतो. एखादा व्यक्ती काही स्वार्थ घेऊन संघ कार्यात आला तर तो टिकत नाही अथवा संघ शाखेतून त्याच्या वृत्तीमध्ये बदल घडून येतो. संघ स्वयंसेवक हे कोणाचाही द्वेष करीत नाहीत. शुद्ध सात्विक प्रेम हे संघाच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य आहे. संघ कामातून कोणताही स्वार्थ साधला जात नाही, प्रसिद्धी मिळत नाही तरीही स्वयंसेवक केवळ शुद्ध सात्विक प्रेमामुळेच संघ कार्यात टिकून आहेत. शुद्ध सात्विक प्रेमाने ते एकमेकांशी बांधले गेल्यामुळे सातत्याने स्वयंसेवक एकमेकांच्या आधाराने व सहकार्यातून काम करताना दिसून येतात. संघामध्ये कोणीही नेता नसतो अथवा कोणत्याही व्यक्तीची पूजा केली जात नाही, त्यामुळे संघातील प्रत्येक स्वयंसेवक केवळ आणि केवळ स्वयंसेवकच असतो. तो कोणाचाही अनुयायी नसतो तर सर्वजण एकमेकांचे सहकारी असतात, त्यामुळे संघ कार्यात येणारी व्यक्ती या कार्यपद्धतीतून घडत जाते व समाज व राष्ट्राची सेवा करण्यासाठी तयार होते. इतर संघटना अथवा संस्थांपेक्षा संघाची ही कार्यपद्धती खरोखरच वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे म्हणूनच संघ हा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

CMYK

आपला
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

विहिंपच्या सामाजिक समरसता आयामतर्फे डॉ. आबेंडकरांना अभिवादन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ डिसेंबर-
विश्व हिंदू परिषदेच्या सामाजीक समरसता आयामच्या वतीने आज दि. ६ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणाभूमी अस्थिविहार येथे अस्थिकलशाचे दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेच्या विविध आयमाचे कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, रमेशजी बेंबळकर, चन्नाबसवेश्वर सोलापुरे, अमित सारोळकर, प्रवीण जिल्हा, अभय कुलथे, विकास कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते.

महत्त्वाचे

जुळे सोलापुरात मंगळवारी ब्राह्मण महिला मेळावा

घटस्फोटित वधू-वर परिचय अंकाचे प्रकाशन

उद्योजिका सुवर्णा पेठे यांच्यासह १४ जणींना महिलारत्न पुरस्कार जाहीर

सोलापूर, दि.६ डिसेंबर-
येथील कौस्तुभ वधू-वर सुचक केंन्द्रातर्फे मंगळवार दि.९ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता जुळे सोलापूर येथे सकल ब्राह्मण महिला मेळावा होणार आहे. यामध्ये १४ कर्तबगार महिलांना 'जुळे सोलापूर महिलारत्न' पुरस्कार देण्यात येणार आहे.

यावेळी घटस्फोटीत वधू-वर परिचय अंकाचे प्रकाशन तसेच 'विवाह समस्या : काल-आज-उद्या' या विषयावर हभप श्रीकांत महाराज अरोळे यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान होणार आहे. येथील भारती विद्यापीठजवळील मांगल्य मंगल कार्यालयात हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १४ महिलांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये पेठे फुडसच्या उद्योजिका सुवर्णा पेठे, अश्विनी कुलकर्णी, स्मिता देशपांडे, प्रा.शुभदा देशपांडे, शैलजा देशपांडे, अनिता कुलकर्णी, वि.मो. मेहता माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, अनुजा कुलकर्णी, नमिता थिटे, देऋब्रा संस्थेच्या महिलाध्यक्षा हेमा चिंचोळकर, सरिता कुलकर्णी, माधुरी तांदळे, ॲड.शर्वरी रानडे, प्रिया कुंभकोणी यांचा समावेश आहे. हभप आरोळे महाराज यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी सहयोग ब्राम्हण सेवा संघाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, ब्रम्हगर्जना प्रतिष्ठान व भगवान परशूराम जयंतीचे संस्थापक विक्रम ढोनसळे, ज्येष्ठ पत्रकार रविन्द्र नाशिककर यांची प्रमुख उपस्थिती आहे. हा कार्यक्रम सर्वासाठी खुला असून सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जुळे सोलापूर महिला समन्वयक ॲड. शर्वरी रानडे यांनी केले आहे.

मोडनिंब व्यापारी कमिटीच्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

मोडनिंब, दि.६ डिसेंबर-
महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन कायदा १९६३ आणि महाराष्ट्र कृषी पणन नियम १९७३ मध्ये दुरुस्ती करण्यात यावी. यासह विविध मागणी करिता महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीकडून महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. या बंदमध्ये सहभागी होत मोडनिंब व्यापारी कमिटीच्या वतीने शुक्रवार दि. ५ डिसेंबर रोजी मोडनिंब (ता. माढा) येथे बंद पाळण्यात आला. यास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोडनिंब मार्केट यार्ड मधील सर्व दुकान व्यापारी असोशियन पुणे यांनी केलेले आव्हानाला प्रतिसाद म्हणून बंद पाळण्यात येत आहे असल्याचे पोपट दोभाडा यांनी सांगितले. व्यापारी संघटनांनी महाराष्ट्रव्यापी बंद पुकारला होता. या बंदला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत आपले व्यवहार व्यवहार बंद ठेवले. यावेळी सतीश सुर्वे, सतीश शहा, रविकांत शहा, प्रवीण पाटील उपस्थित होते.

हिवाळी अधिवेशनात मोडनिंब एमआयडीसीला गती द्या

रणजितसिंह शिंदे यांची पालकमंत्री गोरेंकडे मागणी

तभा वृत्तसेवा,
मोडनिंब,दि.६ डिसेंबर-
माढा तालुक्यातील मोडनिंब हे शहर राष्ट्रीय महामार्गावर असून ब्रॉडगेज रेल्वे लाईन शेजारी आहे. स्थानिक लोक व व्यापाऱ्यांच्या अनेक वर्षाच्या मागणीनुसार या ठिकाणी शासनाने नवीन एमआयडीसी मंजूर केली. परंतु भूसंपादनाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. येत्या हिवाळी अधिवेशनात एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.

याबाबत उद्योगमंत्री उदय सामंत व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून बैठक घेण्याचेही त्यांनी निवदेनात म्हटले आहे. यावर पालकमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवून काम मार्गी लावण्याची ग्वाही दिली आहे. मोडनिंब येथील २८०.६७ एकर व सोलंकरवाडी येथील ६३.४७ एकर अशी एकूण ३४४ एकर जागेची क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पाहणी करून भू-निवड समितीकडून अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. शासनाच्या उच्च अधिकार समितीने या प्रस्थापित क्षेत्रास मान्यता दिलेली असून, या क्षेत्राचा कंटूर सव्हें झाला आहे. या भागातील औद्योगिक विकासाला चालना मिळून तालुक्यातील शेकडों सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार आहे. सदर नवीन एमआयडीसी होण्यासाठी महामंडळाचे प्रकरण ६ लागू झालेले आहे. परंतु संयुक्त मोजणी व भूसंपादनाची कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आली नाही. मोडनिंब येथील नवीन एमआयडीसीचे प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी उद्योग विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे सोमवार दि.८ डिसेंबर पासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी रणजितसिंह शिंदे यांनी केली आहे. माढा तालुक्यातील अरण सबस्टेशन अंतर्गत जाधववाडी, बैरागवाडी व तुळशी येथे नवीन लिंक टाकणे तसेच सोलंकरवाडी सबस्टेशन अंतर्गत मोडनिंब-कुरणखोरा येथे शेतीपंपांसाठी नवीन लिंक लाईन मंजूर करण्याबाबत रणजितसिंह शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली. अपुरा व अनियमित वीजपुरवठा होत असल्याने ही कामे तातडीची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या निवेदनाची दखल घेत पालकमंत्री गोरे यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंत्यांना पुढील कार्यवाही तात्काळ सुरू करण्याचे स्पष्ट आदेश दिल्याने संबंधित भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. जाधववाडी (ता. माढा) येथील खंदारे पाझर तलावात सिना माढा योजनेतून पाणीबंद पाईपलाईन करून भरणे साठी कालवा ते पाझर तलाव पर्यंत ६०० मी. चारी खोदाई करण्यासाठी डी.पी.डी.सी अंतर्गत निधीची तरतूद करावी. या कामाची मागणी निवेदनातून करण्यात आली.तसेच माढा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामाच्या संदर्भात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सोबत चर्चा झाली असल्याचे सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी सांगितले.

बार्शी कृउबा समिती व्यापाऱ्यांचा एक दिवसीय संप

बाजार समितीची दीड कोटींची उलाढाल ठप्प

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ६ डिसेंबर-
महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या आवाहनानुसार, शुक्रवार दि. ५ डिसेंबर रोजी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीतील अडत व भुसार व्यापाऱ्यांनी लाक्षणिक एकदिवसीय संप पुकारला. या संपामुळे बार्शी बाजार समितीतील एक दिवसाची सुमारे दीड कोटींची उलाढाल ठप्प झाली.

संप असूनही शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये याची जबाबदारी व्यापाऱ्यांनी घेतली. या बंदची कल्पना नसलेल्या शेतकऱ्यांनी बाजार समितीत शेतमाल आणल्यास, तो शेतमाल व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानात उतरुन घेतला. मात्र खरेदी-विक्रीचे व्यवहार, लिलाव आणि सौदे दिवसभर स्थगित ठेवण्यात आले होते. भाजीपाला व कडबा बाजार वगळून इतर सर्व शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार पूर्णपणे बंद राहिले. बार्शी मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब कथले यांच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांच्या वतीने तहसीलदार यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

व्यापाऱ्यांच्या प्रमुख मागण्या

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीतर्फे पुढील मुद्द्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. १) अन्नधान्य व खाद्यान्न वस्तूंवर ५% GST लागू झाल्याने राज्य सरकारला महसूल मिळत आहे, त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती कर (सेस) रद्द करावा. २) २६ ऑगस्ट २०२४ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीतील अनिर्णित विषयांवर तातडीने बैठक घेऊन निर्णय घ्यावेत. ३) राष्ट्रीय बाजार समिती अधिनियमातील त्रुटी दूर करण्यासाठी कृती समितीसोबत त्वरित चर्चा करावी. ४) झचउ कायद्यातील सुधारणाबाबत कृती समितीने सुचवलेल्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा. ५)अन्नसुरक्षा व मानदे कायद्यातील जाचक तरतुदी रद्द कराव्यात आणि अनुचित कारवाईला प्रतिबंध करावा. ६) दिलेल्या आश्वासनानुसार PMC परवाने ऑनलाइन उपलब्ध करुन द्यावेत. अन्यथा राज्यातील व्यापारी परवाने नुतनीकरण करणार नाहीत. महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देत, बार्शीतील व्यापाऱ्यांनी आजचा लाक्षणिक बंद यशस्वीपणे पाळला.

माळीनगरमध्ये १७५ जणांचे रक्तदान; चेअरमन गिरमे यांच्या वाढदिनानिमित्त आयोजन

तभा वृत्तसेवा,
माळीनगर, दि.६ डिसेंबर-
येथील दि.सासवड माळी शुगर फॅक्टरीचे चेअरमन, माळीनगर फेस्टिव्हलचे मुख्य संयोजक राजेंद्र गिरमे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत शिबिरात १७५ जणांनी रक्तदान केल्याची माहिती शिबिर प्रमुख डॉ.भूषण म्हेत्रे यांनी दिली.

रक्तदान शिबीर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके यांच्या अध्यक्षतेखाली तर कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले पतसंस्थेचे व्हा.चेअरमन महादेव एकतपुरे यांच्या हस्ते करण्यात यावेळी माळी शुगर चे संचालक विशाल जाधव, शुगरकेन चे चेअरमन अमोल ताम्हाणे , व्हॉ. चेअरमन कपिल भोंगळे, एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे, शिरीष फडे, डॉ. रवींद्र शिंदे , रिंकू राऊत, डॉ भूषण म्हेत्रे उपस्थित होते. तसेच सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेमध्ये वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर, महात्मा फुले पतसंस्था, शुगरकेन सोसायटी, माळीनगर मल्टिस्टेट को -ऑप, माळीनगर विकास मंडळ , व्यापारी मित्र मंडळ यांनी सहकार्य केले.

पोखरापूर जिल्हा परिषद ओबीसी गटातून भाजपच्या शंकर वाघमारेंचे नाव आघाडीवर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-
मोहोळ नगरपालिका निर्मितीपूर्वी मोहोळ व पोखरापूर अशा दोन पंचायत समिती मिळून मोहोळ जिल्हा परिषद गट होता आणि शिवसेना भाजपा युती सतत तिथे जिंकत राहिली होती. मात्र मोहोळ नगरपालिका निर्मिती नंतर नव्यानेच निर्माण झालेला पोखरापूर जिल्हा परिषद मतदारसंघ यंदा तालुक्यात एकमेव ओबीसी राखीव गट झाला आहे, बाकी सर्व गट सर्वसाधारण जाहीर झाले आहेत. भाजपला अनुकूल असणाऱ्या या गटात भाजपाचा उमेदवार म्हणून भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे निवडणुकीच्या मैदानात उतरणार असून, या मतदार संघातील काही प्रमुख कार्यकर्त्याकडून त्यांचे नाव पुढे येत आहे.

यावेळी नव्याने रचना झालेल्या या गटात एक पंचायत समिती ही सतत प्रस्थापितांच्या विरोधातील तर दुसरी पंचायत समितीमध्ये माजी आमदार राजन पाटील यांच्या प्रभावात असल्याचे दिसत आहे. वडाचीवाडी, गलंदवाडी, पासलेवाडी, बीटले अशी काही गावे राजन पाटील यांच्या प्रभावाखालील या मतदारसंघात समाविष्ट झालेली आहेत. वाघमारे यांच्या रूपाने मोहोळ तालुक्यात प्रथमच कमळ चिन्हावर भाजपाचा पहिला पंचायत समिती सदस्य म्हणून ते निवडून आले होते. जिल्हा परिषदेसाठीही त्यांनी यापूर्वी प्रयत्न केला होता मात्र थोडक्या मताने त्यांना पराभव पत्करावा लागला होता. यावेळी त्यांनी जोरात तयारी सुरू केली असून, आजतागायत या नवीन मतदारसंघात त्यांनी ३ राऊंड पूर्ण करून जनतेच्या समस्या, अडचणी जाणून घेतल्या आहेत. तसेच सौंदणे ग्रामपंचायत निवडणुकीतही त्यांनी पाच वर्ष सरपंच म्हणून व भाजपाचा पहिला सरपंच म्हणून काम केले आहे. गेल्या सहा निवडणुकीत सौंदणे ग्रामपंचायतमध्ये त्यांनी भाजपाच्या गटाचे प्रतिनिधित्व ठेवले आहे. स्वतः पंधरा वर्ष ग्रामपंचायत सदस्य म्हणून देखील काम केले आहे. मागील वेळी टाकळी सिकंदर जिल्हा परिषद गटातून त्यांनी कडवी झुंज दिली होती. मात्र तो जि. प. गट वेगळा होता आता नवीन रचनेत त्यांचे सौंदणे हे गाव व त्यांचा प्रभाव असणारी काही गावे यावेळी पोखरापूर जिल्हा परिषद गटात आहेत. त्यामुळे त्यांनी पोखरापुर जिल्हा परिषद लढण्याची तयारी सुरू केली असून, संघटन कौशल्याच्या जीवावर आपली दावेदारी त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे दाखल केली आहे. पोखरापूर जिल्हा परिषद गटात १७ गावे येतात. यामध्ये पोखरापुर व सय्यद वरवडे हे दोन पंचायत समिती गण येतात. यामध्ये सय्यद वरवडे गणात सौंदणे, तांबोळे, सय्यद वरवडे, ढोकबाभुळगाव, वडवळ, नजिक पिंपरी, राम हिंगणी तर पोखरापुर पं. स. गणात पोखरापुर, खवणी, कोन्हेरी, यावली, चिखली, हिवरे, वडाची वाडी, बिटले, गलंदवाडी पासलेवाडी या गावांचा समावेश आहे. देशात व राज्यात भाजपची सत्ता असल्यामुळे येथील सिंचनाचा प्रश्न, रस्त्याचे प्रश्न, विजेचा प्रश्न असे सर्व प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. इतकेच नाहीतर वाघमारे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धनंजय महाडीक, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्ह्यातील भाजपचे सर्व आमदार आणि प्रदेश व जिल्हा स्तरावर संघटनेत काम करणारे पदाधिकारी यांचेशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्यामुळे त्यांना उमेदवारी मिळण्यात अडचण येणार नाही असे बोलले जात आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत प्रचंड प्रतिकूल परिस्थिती असताना देखील त्यांनी दोन्ही वेळेला सर्वांना सोबत घेवून तेथून चांगले मताधिक्य पक्षाला दिले होते. संघटन कौशल्य, शांत, संयमी, अभ्यासू आणि उत्तम वक्तृत्व यांच्या जोरावर त्यांची पोखरापूर या जिप गटात प्रभावी दावेदारी मानली जात आहे.

बड्या नेत्यांच्या प्रवेशामुळे भाजपाचे वाढले बळ

मोहोळ तालुक्यातील मातब्बर नेते माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने यांच्यासह हजारो समर्थकांसह नगरपालिका निवडणुकीपूर्वी भाजपात प्रवेश केला आहे. त्यामुळे तालुक्यात भाजपा नगरपालिका निवडणुकीत नंबर वनवर राहील तसाच कौल जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये देखील मोठा प्रभाव राहू शकतो. या बड्या नेत्यांमुळे आता भाजपाचे बळ वाढले असल्याने आणि कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांच्या इच्छेखातर यावेळी मी जिल्हा परिषदेच्या राजकीय आखाड्यात उतरत आहे.

- शंकर वाघमारे, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष

बोरामणी जिल्हा परिषद मतदारसंघात भाजपाकडून 'नेताजीभाऊ' उतरणार आखाड्यात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ डिसेंबर-
लोकसभा, विधानसभा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत भाजपा युवा नेते नेताजी खंडागळे यांनी पक्ष कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना सोबत घेवून उळे-कासेगाव येथून भारतीय जनता पार्टीला चांगले मताधिक्य देण्याचा प्रयत्न केला होता. त्यांचे पक्षासाठीचे संघटन कौशल्य, शांत, संयमी, अभ्यासू, उत्तम वक्तृत्व आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी दिवसरात्र परिश्रम करण्याची तयारी असल्याने 'नेताजीभाऊं'ची बोरामणी या जिप गटात प्रभावी व प्रबळ दावेदारी मानली जात आहे. त्यातच विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मतदारसंघातील विविध गावात त्यांनी केलेली विविध कामे, घेतलेली विविध शिबिरे यामुळे नेताजी खंडागळे यांच्या नावाची कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांतूनही चर्चा सध्या सुरू झाली आहे.

बोरामणी मतदारसंघ तसा तर २००९ पूर्वी दक्षिण सोलापूर मतदारसंघाला जोडला होता. २००९ नंतर दक्षिणची काही गावे अक्कलकोट मतदासंघाला जोडली गेली. यामुळे बोरामणी हा गटही अक्कलकोट मतदारसंघात गेला. अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर मतदारसंघावर तशी तर काँग्रेसचीच सत्ता नेहमी राहायची. मात्र आ. कल्याणशेट्टी यांनी २०१९ ची निवडणूक जिंकून यामध्ये मोठा बदल केला. ते दोनवेळा आमदार झाले आणि राज्यात आणि केंद्रातही भाजपाचीच सत्ता असल्याने त्यांनी या भागासाठी मोठा निधी खेचून आणून बरीच विकासात्मक कामे केली आहेत. बोरामणी जिल्हा परिषदेचे दावेदार असलेल्या खंडागळे यांनीही २००७ साली सह्याद्री फाऊंडेशनची निर्मिती करून उळे-कासेगाव परिसरात विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविले. गोरगरिबांच्या मुलांना शैक्षणिस साहित्य पुरविणे, शेतकरीबांधव, कामगारांच्या विविध अडचणी सोडविणे, गावातील नागरिकांचे आरोग्य, पाणी, रस्ते, दिवाबत्तीचे प्रश्न सोडविल्याने गावकऱ्यांनी उळे ग्रामपंचायतीत त्यांच्या पॅनलला भरघोस मतदान केले आणि ग्रा. पं. वर भाजपाचा भगवा फडकावला. यानंतर खंडागळे यांनी हळूहळू बोरामणी मतदारसंघात २०२२ पासून विकासकामे करण्यास सुरूवात केली. बोरामणी मतदारसंघात आ. कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली खंडागळे यांनी त्यांच्या सह्याद्री फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध गावात रक्तदान शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप, नेत्ररोग आणि आरोग्यविषयक विविध शिबिरे घेतली आहेत. इतकेच नाहीतर अनेक गरीब नागरिकांची मोतीबिंदूची मोफत ऑपरेशन्स करून दिली आहेत. यामुळेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत यंदा युवा नेते नेताजीभाऊ उतरणार असून, या मतदार संघातील काही प्रमुख कार्यकर्त्याकडूनही त्यांचे नाव पुढे येवू लागले आहे. त्यातच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह पालकमंत्री जयाभाऊ गोरे, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. विजयकुमार देशमुख, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार,जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्यासह भाजपाच्या काही वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे चांगले सूत जमू लागले आहे. या त्यांच्या नेटवर्कचा फायदा भविष्यात या मतदारसंघात विकासकामे करताना त्यांना होणार आहे. देशात व राज्यात भाजपची सत्ता असल्यामुळे येथील सिंचनाचा प्रश्न, रस्त्याचे प्रश्न, विजेचा प्रश्न असे सर्व प्रश्न आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून सोडविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे.

पक्षश्रेष्ठींनी संधी दिली तर सोनं करून दाखविन

या मतदारसंघात उळे, कासेगाव, पिंजारवाडी, मुस्ती, तांदुळवाडी, बोरामणी, संगदरी, दोड्डी, मुळेगाव, मुळेगाव तांडा, बक्षी हिप्परगे, वडजी, वरळेगाव, गंगेवाडी, उळेवाडी आदी जवळपास १५ गावे आणि काही तांडे आहेत. मी या सर्वच गावात ३ ते ४ राऊंड घेवून जनतेच्या समस्या जाणून घेतल्या आहेत; त्या-त्या भागातील विविध प्रश्नांवर चर्चाही केली आहे. इतकेच नाहीतर आपल्या हातून जे शक्य होईल ते देण्याचा प्रयत्नही केला आहे...मोठ्या कामांसाठी नागरिकांना आश्वासितही केले आहे. यासाठी पक्षश्रेष्ठींनी मला उमेदवारी द्यावी...त्या संधीच मी सोनं करून दाखविन.

- नेताजी खंडागळे, उळे उपसरपंच तथा भाजपा युवा नेते.